साप्ताहिक

# माणूस

२९ सप्टेंबर ८४/दोन रुपये



## आंध्र पुनःपुन्हा लोकशाहीचा 'खून' का होतो?

## काश्मिरातील 'लोकशाही' मूठभर घराण्यांचा पैशाचा 'खेळ'





या पुढील अंक

## दिवाळी अंक

साप्ताहिक

**माणूस**

¤

**वर्ष : चोविसावे**

**अंक : अठरावा**

¤

**२९ सप्टेंबर १९८४**

**किंमत : दोन रुपये**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

¤

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**: पत्ता :**

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

**सुरेश नावडकर**



# मुंबापुरी

## □ हॅट्स ऑफ ... रामोजीराव

'प्रिया' लोणच्याची चव तुम्ही कधी घेतली आहे का? आम्ही तर ह्या ब्रँडवर बेहद्द खूष आहोत. बेडेकर आणि कुबल यांपेक्षाही आम्हाला हे लोणचे अधिक जहाल आणि चविष्ट वाटते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे 'प्रिया पिकल्स' ही कंपनी आंध्रमधील 'इनाडू' ह्या वृत्तपत्रसमूहाचे संस्थापक आणि संपादक रामोजीराव यांच्या मालकीची आहे. 'इनाडू' हे आंध्रमधील सर्वाधिक लोकप्रिय तेलगु वृत्तपत्र आहे. खप साडेतीन ते चार लाख. त्याची इंग्रजी आवृत्ती न्यूजटाइम. हिचे सरक्युलेशन आहे दीड लाख! याखेरीज रामोजीराव यांच्या मालकीचे एक हॉटेल. एक जाहिरातकंपनी आणि एक फळांचे रस हवाबंद डब्यांतून निर्यात करणारी कंपनीही आहे.

एन. टी. रामारावांना आंध्रच्या मुख्यमंत्रीपदावरून काढण्यात आल्या दिवसापासून त्यांची या पदावर पुनः प्रस्थापना होईपर्यंत इनाडू आणि न्यूजटाइम या वृत्तपत्रांनी ज्या प्रकारे भास्करराव यांच्या सरकारशी लढा दिला त्याला वृत्तपत्रांच्या नजिकच्या इतिहासात तोड नाही. सत्ताधारी पक्षाच्या दुष्कृत्यांचेही समर्थन करण्यासाठी अक्षरांचे वळण बदलणारे पत्रकार खूप मिळतील; परंतु मूलभूत लोकशाही मूल्यांची जोपासना करण्यासाठी लेखणी झिजविणारे पत्रकार विरळा!

सोळा ऑगस्ट ते सोळा सप्टेंबर या एक महिन्याच्या काळात भास्कररावांनी रामोजीरावांवर वेगवेगळ्या प्रकारे दडपण आणण्याचे प्रयत्न केले. रामोजीरावांनी 'तेलगुदेसम' ह्या पक्षाला त्याच्या स्थापनेपासून पाठिंबा दिला आहे. इनाडू आणि न्यूजटाइम बंद पडल्यावर आपल्या विरुद्ध तयार होणारे जनमत रोखणे आणि कॉंग्रेस आयच्या मदतीने रामारावांचे आमदार विकत घेणे भास्कररावांना शक्य झाले असते. यासाठी रामोजीरावांना ठार मारण्याची धमकीही देण्यात आली. त्यांच्या मित्रांनी त्यांना सल्ला दिला की, हैद्राबादमधील त्यांचे संपादकीय कार्यालय त्यांनी सुरक्षिततेसाठी विजयवाडा येथे हलवावे. रामोजीरावांनी त्याला नकार दिला; पण तळमजल्यावरील कार्यालय त्याच इमारतीत पाचव्या मजल्यावर नेले. इनाडूच्या इमारतीवर हल्ला करून मुद्रणयंत्रसामग्रीची मोडतोड करण्याची एक योजना देखील आखण्यात आली होती; पण असा हल्ला झालाच तर त्याला तोंड देण्यासाठी प्रेसच्या दरवाज्याशी बाके आणि खुर्च्या ह्यांचे अडथळे उभे करून दररोज छपाई पार पाडली जात असे. इमारतीच्या आजूबाजूसही सक्त पहारा ठेवावा लागत होता.

राज्यपाल रामलाल यांच्या आशीर्वादाने ज्या दिवशी भास्करराव सत्तेवर आले. त्याच्या दुसऱ्या दिवशी न्यूज टाइमचा मथळा होता, 'The Great Betrayal' आणि पहिल्या पानावरच्या साइन्ड एडिटोरियलचा मथळा होता 'Kick Them Out' त्यात रामलालबद्दल त्यांनी लिहिले 'It is the world's second oldest profession that of a procurer आणि ज्या दिवशी नवे राज्यपाल एस. डी. शर्मा ह्यांनी रामारावांना मंत्रिमंडळ बनविण्याचे निमंत्रण दिले त्या दिवशी न्यूजटाइमच्या दोन हेडलाइन्स होत्या. एक मास्टहेडवर आणि एक मास्टहेड खाली. पहिली हेडलाइन होती Historic Battle Won' आणि त्याच्या खाली 'NTR BACK AT THE HELM' त्या दिवशीही रामोजीरावांचे पहिल्या पानावर संपादकीय होते. त्याचा मथळा होता, 'Triumph of Democracy'.

मुबापुरीत हैद्राबादचा हा पेपर चर्चगेटला रात्री आठ-साडेआठला पोहोचतो. या महिनाभराच्या काळात एच् व्हिलरच्या स्टॉलवर इनाडू आणि न्यूजटाइमसाठी तोबा गर्दी उसळत असे. या नगरीतील आध्रवासी तर या वृत्तपत्राच्या दहा-दहा पधरा-पंधरा कॉपीज एका वेळी विकत घेत असत.

सोळा सप्टेबरला सकाळी अकरा वाजता राज्यपाल शर्मा यानी रामारावाना राजभवनावर बोलाविले तो दिवस रविवार होता. हैद्राबाद शहरात कर्फ्यू जारी होता; पण भास्करराव मत्रिमंडळ गडगडल्याची बातमी बाहेर पडताच लोक रस्त्यावर आले. त्यांनी इनाडूच्या इमारतीला वेढा घातला छपाई थाबवून पत्रकाराना आणि कामगाराना पेढे वाटले. न्यूज टाइमच्या बातमीतलेच एक वाक्य आहे... 'For once gaiety ran riot in Hydrabad.'–Hats off to you Ramoji Rao– to you and your reporting team !

–विष्णु जयदेव

# श्री भगवान उवाच....

**श्री अर्जुन उवाच**

काय भगवता, आज काय जाहले ?
भल्या पहाटेच बोलावणे केले ?
कोण तुझ्याकडे येऊन गेले ?
काय कामा ?

सकटी पडला आहे कोण राजा ?
की रुष्ट झाली तुझ्यावरी प्रजा ?
अबला किंवा कोणी करी धावा तुझा ?
प्राणसंकट पातले ॥

की छेडली आता पुन्हा लढाई ?
मस्ती कौरवाची उफाळून येई ?
चाप-बाण घेऊन येतो मग मीही ।
नि.पाता दुर्जनाच्या ॥

पण तू का ऐसा झाला निश्चल ?
जरा तरी देवा मनातील बोल ।
बाहुचे तुझिया सपले का बळ ?
आज अचानक ॥

काय देवा आता तुज समजवावे ?
दु ख तुझे माझ्या ध्यानी कसे यावे ?
म्या पामराला कैसे आकळावे ?
बोलल्याविण तूं ॥

**श्री भगवान उवाच**

नाही बा पार्था, असे काही झाले ।
शकानी खुळचट तुला ग्रासले ।
मन माझे मात्र झाकोळून आले ।
पाहुनी मृत्युलोक ॥

**श्री अर्जुन उवाच**

काय म्हणता तुम्ही मृत्युलोकी होता ?
कशास देवा आता यातना घेता ?
की पुन्हा जन्मायची जागा शोधता ?
परित्राणा साधूच्या ॥

की भक्त कोणी गटगळचा खाई ।
भवसागरी नौका भरकटत जाई ।
दिसे ना काठ काही उपायी ।
स्मरे तुम्हा ?

**श्री भगवान उवाच**

नाही रे मूढा, असे काही झाले ।
सारे सागतो मी, काय पाहिले ।
बोल कुणाचे काय ऐकले ।
मृत्यूलोकी विहरता ॥

भारतदेशी एक प्रदेश जाण ।
आध्र म्हणूनी ओळखती थोर-लहान ।
असे स्वराज्याचा मोठा अभिमान ।
प्रजेला तिथल्या ॥

तेथे कुणी एक थोर अभिनेता ।
लोकरजनाचा आद्य प्रणेता ।
कलेसाठी जन्म वाहून घेता ।
सार्थकी याचा ॥

प्रभू रामचद्र माझा अवतार एक
इतिहास सारा तुजसी ठाउक
पारायण त्याचे अजूनही देख ।
चालतसे भू-लोकी ॥

याने हे रूप केले धारण ।
नेसली वल्कले, हाती धनुर्बाण ।
निघाला मारण्या दुष्ट रावण ।
जन्मलेला कलियुगी ॥

जनतेला त्याचा मोह पडे भारी ।
म्हणे आता तूच आम्हास तारी ।
रामराज्य ते पुन्हा साकारी ।
भूतली तूच ॥

यानेही मग घेतली उडी ।
जनसेवेच्या भरल्या कावडी ।
नोकरगणाला हुकूम तो सोडी ।
जनहिताचे ॥

राज्य याचे होते चालले ठीक ।
कुरकरही कानी पण येई बारिक ।
दड थोपटूनी ठाकला एक ।
नरपुगव तयामाजी ॥

म्हणाला, हा तर आहे बालबुद्धी ।
कारभार करण्याची नसे यास शुद्धी ।
पहा सपवितो याची मी सद्दी ।
महिन्यात एका ॥

आणखी एक त्याला साथी मिळाला ।
नावातच ज्याच्या स्थान रामाला ।
म्हणे राज्य कोणी दिले आहे याला ।
पाहतोच मीही ॥

काढला अचानक आदेश त्याने ।
राज्य सोडावे तू बऱ्या बोलाने ।
सूत्र घेई हाती जो आपुल्या बळाने ।
शोभतसे तेथे ॥

गुर्मीत मोठ्या तो नरपुंगव आला ।
म्हणे पहा कैसा काटा काढला ।
पक्ष वाटे ज्याला अपुला काबिला ।
हुसकले त्या मी ॥

आता पहा कैसा हाकतो मी गाडा ।
राज्याच्या प्रगतीचा अश्वमेध घोडा ।
दैन्य-दारिद्र्याची चिंताच सोडा ।
सोपवा मजवरी ॥

गेला तो पार, निजधामा गेला ।
ठकवेल किती काळ तुम्हा-आम्हाला ।
थेटरात पहा पुन्हा लागे कामाला ।
स्थान तेचि ॥

पाहून हा खेळ जन दु खी होती ।
म्हणती राजाची पाहून ही स्थिती ।
करून मारिचाशी रावणाने युती ।
साधला डाव ॥

यानेही केले मग अवसान गोळा।
म्हणाला येथून दूर आधी पळा।
पाठिराख्यांचा जमवून मेळा।
निघाला दूरदेशी ॥

इंद्रप्रस्थनगरीत दाखल तो झाला।
राष्ट्रप्रमुखाच्या गळी पडला।
पहा बरं कोणी घात असा केला।
विनवितो त्याला ॥

कुरवाळत दाढी त्या राष्ट्रप्रमुखाने।
ठीक आहे, म्हटले सुहास्य वदनाने।
स्तंभित जन सारे याच्या दर्शनाने।
नगरीचे जाहले ॥

मग याने नामी युक्ती शोधली।
टाळण्या युद्ध सेना वळविली।
परप्रांतामध्ये रवानगी केली।
साऱ्यांची एकसाथ ॥

तुम्हा बोलवीन म्हणे, योग्य वेळ येता।
रक्षण्यास लोकशाही जन्म ह्या होता।
जाणता तुम्हीही काळ कोणता।
सामोरी ठाकलासे ॥

धावून गेले मग वीर अनेक।
अग्निशामकाचे बंब जसे देख।
मागे याच्या नसे अनुयायी एक।
राष्ट्रनेते म्हणविती ॥

नरपुंगवही तो रचे चाल नामी।
दंगल-गोंधळाची झडली सलामी।
निष्पाप जीव किती आले कामी।
गणती नाही ॥

परी हा उभा भक्कम, शांत।
लोकशाहीसाठी घडो माझा अंत।
जनताजनार्दनाची साथ दिगंत।
लाभो म्हणे ॥

चैतन्यरूप रथ याचा धावे।
जन वेडे होती याच्या प्रभावे।
रथापुढे लवूनी याला वंदावे।
नेम त्याचा ॥

अखेरीस म्हणे झाला याचा जय।
रावणसेनेचा होतसे लय।
रामराज्य पुन्हा चाले अक्षय।
म्हणती जन ॥

**श्री अर्जुन उवाच**

सुरस ही फार कथा चक्रपाणी।
राज्यप्राप्तीसाठी ना झुंजता रणी।
गातसे नेता तो विजयाची गाणी।
उत्सव प्रजेचा ॥

सुखाने करील कारभार आता।
दंग वाहण्यात जनतेची चिंता।
तिच्या सुख-दुःखी समरस होता।
काळ कंठी ॥

धन्य ती भूमी, धन्य लोक तो।
शास्ता असा जिथे सहजी लाभतो।
प्रवाह जनाचा पुढे धावतो।
उन्नती अमर्याद ॥

**श्री भगवान उवाच**

व्यर्थ पार्था तुज सांगितली गीता।
मान डोलावली, न विषय उमगता।
गेलास भारून कथा ऐकता।
जन जैसे मृत्यूलोकी ॥

राज्य मिळविणे काम तसे सोपे।
पूर्वीही कितिकांना जमले प्रतापे।
राखताना ते मात्र बळ सारे लोपे।
कितिकांचे ॥

याच मंडळींनी पूर्वी केला अट्टाहास।
मतपेटीद्वारे घडला नवा इतिहास।
परी सारे गेले पार लयास।
वर्षांत काही ॥

आताही नसे स्थिती निराळी।
बडवित ढोल बसली मंडळी।
विजयोत्सवात धुंद गोंधळी।
राहिले येथ ॥

होईल तरी पाही पुन्हा दगा-फटका।
प्रसंग येईल नकळत बाका।
मस्ती विजयाची, शत्रूस मोका।
ओळखी नीट ॥

— सतीश कामत

राजधानी दिल्ली

# भगवती-जागरण आणि अखंड पाठ

आम्ही राहतो त्या राजेंद्रनगरच्या 'बडा बाजारमार्गा' वर सकाळपासून मोठा मंडप घालायचे काम जोरात चालू होते. सव्याकाळपर्यंत भव्य मंडप तयार झाला. पांढऱ्याशुभ्र भट्टीच्या कनातींनी मढवलेला. बाजारचा सर्व परिसर मंडपाने भरून गेला. मंडपभर ट्यूबलाइट्सच्या रोषणाईचा झगझगाट होताच, शिवाय मंडपाबाहेरही सर्व रस्ताभर विजेच्या दिव्यांच्या माळा आकर्षकपणे टांगलेल्या होत्या. मंडपाच्या एका बाजूला स्टेज तयार केलेले होते. त्यावर देवादिकांची चित्रे लावण्यात येत होती. स्टेजवर मध्यभागी एक मोठे मखर केलेले होते.

इकडे ही धामधूम चालली होती, त्याच सुमारास लाउडस्पीकर लावलेली रिक्षा सगळीकडे फिरत होती. जोरजोरात आवेशपूर्ण सुरात लाउडस्पीकरवरून 'पब्लिक' ला आवाहन करण्यात येत होते. बोलणाऱ्याचा सूर असा राणाभीमदेवी थाटाचा होता आणि तो माईक इतका जवळ धरून बोलत होता की, नुसता गोंगाटच तेवढा ऐकू येत होता. पुन्हा पुन्हा तो गोंगाट कानावर पडल्यानंतर त्यातील शब्द ध्यानात येऊ लागले. त्यांचा आशय असा होता— राजेंद्रनगरमधील व्यापारीमंडळाने विशाल भगवतीजागरण आयोजित केलेले आहे तरी भाविकांनी त्यात उपस्थित होऊन प्रसाद ग्रहण करावा.

भगवतीजागरण हा इकडचा एक खास प्रकार आहे. राजेंद्रनगरच्या व्यापारीमंडळाप्रमाणे सामूहिक किंवा व्यक्तिगतरीत्याही तो साजरा केला जातो. व्यक्तिगत जागरण असेल, तर थोड्याशा लहान प्रमाणावर; पण सगळा थाट तोच, तसाच असतो. म्हणजे मंडप फक्त घरासमोरच्या रस्त्यावर किंवा जवळच्या मोकळ्या जागेत; पण तरी प्रशस्तच रोषणाई थोडीशी कमी प्रमाणात.

रात्रीच्या सुरुवातीलाच मखरामध्ये देवीची स्थापना करून पूजा करण्यात येते. वाघावर किंवा सिंहावर आसनस्थ झालेली दुर्गा ('शेरांवाली माँ') हे देवीचे रूप असते. पूजेपूर्वी दिवसभर वातावरणनिर्मिती करण्यासाठी म्हणून देवीच्या भक्तिविषयींची सिनेगीते लाउडस्पीकरवर वाजत असतात. ही बहुतेक 'जय संतोषीमाता' चित्रपटातून किंवा 'अवतार' मधले 'चलो बुलावा आया

है' किंवा 'तू ने मुझे बुलाया शेरांवाली' यासारखी गाणी असतात पूजा वगैरे झाल्यानतर देवीच्या चमत्काराचे वर्णन करणारी कथा आणि त्यात गुफलेली गाणी याचा कार्यक्रम सुरू होतो. हेच खरे भगवतीजागरण. रात्रभर हा प्रकार चालतो तोसुद्धा लाउडस्पीकरवर. हा कार्यक्रम सादर करणारी खास मडळी असतात त्याना मुद्दाम पैसे देऊन आणलेले असते. देवीच्या चमत्काराचे वर्णन करणारी कथा 'जय सतोषी-माता' सारख्या चित्रपटाचे कथानक शोभावी अशी असते. त्यात तार्किकतेला ठाव नसतो. सभाव्यतेची दखल नसते. कथेमध्ये गुफलेली गाणी सरसकट फिल्मी गीताच्या चालीवर बेतलेली आणि शब्दाची, मात्राची, ऱ्हस्व—दीर्घांची ओढाताण करून रचलेली असतात कथानिवेदनाचा सूर राणाभीमदेव थाटाचा आणि गाण्याचे गायन बेताल व बेसूर असते. रात्रभर ही दगल चालू झाली म्हणजे गल्लीतल्या सर्व घराना सक्तीचे 'जागरण' घडते मात्र त्याविषयी कोणीही तक्रार करीत नाही. विलक्षण सोशिकतेने आणि भाविकतेने या सर्व प्रकाराकडे पाहण्यात येते. खुद्द मडपात बसलेले लोक केवळ या दणदणाटामुळेच जागे रहात असावेत. कर्तव्य म्हणून मडपात येऊन बसणारे आणि आपापसात हळूहळू बोलत बसणारेच जास्त असतात.

## सवंग धार्मिकता

सूर्योदयापर्यंत हा प्रकार चालतो सूर्योदयाच्या वेळी आरती होते. जागरणासाठी मडपात न बसलेले आजूबाजूच्या घरातले लोकही यावेळी पटापट मडपात दाखल होऊन आरतीत सहभागी होतात, आणि श्रद्धापूर्वक प्रसाद ग्रहण करतात. एकूण सर्व प्रकाराला देखाव्याचे भडक रूप असते हा भडकपणा कमी पडेल म्हणून की काय, 'महान भक्त श्री ×××× जी अपने खून से माता का नाम अपने शरीर पर लिखेंगे' अशी जाहिरात काही वेळा केली जाते. मी स्वत. हा अघोरी प्रकार अजून पाहिला नाही; पण अशी जाहिरात अनेकदा पाहिली आहे

हिंदू लोकाच्या भगवती जागरणाप्रमाणे, शिखाचा अखंड पाठाचा कार्यक्रम असतो. कोणाचा श्राद्ध—स्मृतिदिन, किंवा कुटुबातील विशेष सुखदु खाचे प्रसग, अथवा नैमित्तिक पवित्र कार्य म्हणून अखड पाठ आयोजित केला जातो. त्याकरिता बाहेर मडप घातला जात नाही. घरातच एका खोलीत अखडपाठाची व्यवस्था करण्यात येते. त्या खोलीमध्ये विशेष पूजास्थान स्थापन करून तेथे गुरुग्रथसाहेबाची स्थापना करण्यात येते. अखड पाठ करणारे गुरुद्वारामधील विशिष्ट सेवेकरी (निहग) असतात त्याना निमत्रण देण्यात येते गुरुग्रथसाहेबाची पूजा करून ते अखड पाठ म्हणजे गुरुग्रथसाहेब या ग्रथाचे अखड वाचन सुरू करतात. त्याच्या सहा-सहा आठ-आठ तासाच्या पाळ्या असतात. त्याप्रमाणे वाचणारी माणसे बदलतात; पण वाचन अखड, अविरत, रात्रदिवस चालू असते. वाचनासाठी शक्यतो लाऊडस्पीकरचा वापर केला जात नाही. वाचनाचा सूर लयबद्ध, गाभीर्यपूर्ण आणि अतिशय मधुर असतो. इकडे अखड पाठ चालू असताना घरातील लोकाचे नित्य व्यवहार चालूच असतात; परतु त्याच्या एकूण हालचाली सयत गाभीर्यपूर्ण आणि सात्त्विक वातावरणाशी सुसगत असतात मधूनमधून आपापल्या सवडीप्रमाणे घरातील माणसे पाठश्रवणाला येऊन बसतात. रात्रभर घरातील कुणीतरी एकजण पाठश्रवणाला जागे राहते. तीन दिवस व रात्री अविरतपणे हा कार्यक्रम चालतो. आसपासच्या परिसरातील लोक, तसेच मित्र—आप्तपरिवार मधूनमधून आपापल्या सवडी प्रमाणे येऊन पाठश्रवण करून जातात. समाप्तीच्या दिवशी मात्र घरासमोर अथवा जवळच्या मोकळ्या जागेत मंडप उभारतात. घरामधील पाठ सपल्यावर पूजा—आरती होते. मग गुरुग्रंथसाहेब मडपामध्ये आणण्यात येतो. तेथे 'शबदकीर्तन' होते. या वेळी गुरुग्रंथसाहेबातील काही पदे अत्यत सुरेल चालीवर वाद्याच्या साथीने गायिली जातात. गुरुबानीवर प्रवचन होते मडपामध्ये जमलेले श्रोते एकमेकाशी गप्पा न मारता गंभीरपणे श्रवण करतात. आजूबाजूच्या घरातली मडळीही निमत्रण असल्यामुळे आवर्जून उपस्थित असतात. शीख नसलेल्यानाही डोक्यावर आच्छादन घेऊन श्रवणाला बसावे लागते वातावरण तसेच गाभीर्याने व पावित्र्याने भरलेले असल्यामुळे ते आपोआपच तसे करतात कीर्तन-प्रवचनाचा कार्यक्रम सपल्यावर उपस्थित असलेल्या सर्वांसाठी 'लगर' म्हणजे भोजन असते. पुऱ्या, भाज्या छोले, कोशिंबिरी वगैरे नेहमीचेच पदार्थ लगरमध्ये असतात. लगरनतर कार्यक्रमाची समाप्ती होते

याच धर्तीवर काही हिंदू रामायणाचा अखडपाठ आयोजित करतात. आमच्या एका मित्राकडे मागे असा रामायणाचा अखंड पाठ केला होता. रामायण म्हणजे तुलसीरामायण अखड पाठ करणारे पडितजी एका कोपऱ्यामध्ये विशिष्ट सुरावटीवर तुलसीदासाचे रामायण वाचत होते. बाजूलाच सत्यनारायणाच्या पूजेसारखी रामाच्या मूर्तीची पूजा चौरगावर सजविलेली होती श्रवणासाठी येणारी मडळी आपापल्या आवडी—सवडीप्रमाणे थोडा वेळ श्रवण करण्यास बसत होती. समाप्तीच्या दिवशी महापूजा, आरती होऊन सर्व उपस्थिताना लगरसारखेच भोजन देण्यात आले. त्याकरिता आधीच इष्टमित्राना घरोघर जाऊन निमत्रणे दिलेली होती.

आपल्याकडच्या सत्यनारायणाच्या धर्तीवर सामुदायिक धार्मिक उत्सव साजरे करण्याच्या ह्या इकडच्या पद्धती आहेत सर्व समाजाला एका पवित्रतेच्या पायावर एकत्र आणणे आणि पारस्परिक सौहार्द वाढविणे हा त्यामागील उद्देश अखड पाठाच्या उपक्रमात बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालेला दिसतो. मग तो अखड पाठ गुरुग्रथसाहेबाचा असो, की रामायणाचा असो. परतु भगवती-जागरणामध्ये मात्र भडकपणा, बाह्य देखावा, काही तरी देवाचे केल्याचे खोटे समाधान याशिवाय काही हाती लागत नाही. आजूबाजूच्या लोकाच्या झोपेची पर्वा न करण्याचे औद्धत्यही त्यामध्ये असते. रात्रभर बेसूर आवाजातल्या फिल्मी गीताच्या चालीवरच्या भजनाचा ठणाणा चाललेला असताना आजूबाजूच्या घरातले म्हातारे कोतारे, आजारी माणसे, तान्ही बाळे, अभ्यास करणारे विद्यार्थी इत्यादीना होणाऱ्या गैरसोयीचा विचारसुद्धा या 'भक्त' मडळीच्या मनात येत नाही. धार्मिक स्वातत्र्याच्या विकृत कल्पनेचा आपण एवढा बाऊ केलेला आहे, की पोलीसखाते अशा वेळी सरळ कानावर कातडे ओढून घेते मुळात हे अशा प्रकारच्या जाहीर चव्हाट्यावरच्या भक्तगिरीची आपल्याला गरजच का भासते हा अतर्मुख करणारा पहिला प्रश्न आहे आणि स्वातत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी आपण आपल्या अडाणी कल्पना टाकून देण्याचे स्वातत्र्य का दाखवत नाही, हा अस्वस्थ करणारा पुढचा प्रश्न आहे. असल्या प्रकारच्या सवग धार्मिकतेत अजूनही रस घेणाऱ्या आपल्या भारतीय समाजाचे प्रबोधन-वय किती समजावे आणि खऱ्या अर्थाने आपल्या समाजाला बुद्धीची व विचाराची परिपक्वता येण्यास किती वेळ लागेल, या प्रश्नाचे तर उत्तरच सापडणार नाही

...मध्यरात्र उलटलेली आहे लाउडस्पीकर दणदणत आहे आणि माझे मन या आणि अशाच प्रश्नांनी गजबजलेले आहे

—निशिकांत मिरजकर

आंध्रानुभव

# लोकशाहीचे वाढते दरबारीकरण

अखेर दिल्लीने एक पाऊल मागे घेतले. ३० दिवसाचे अल्पमतातील भास्करराव मंत्रिमंडळ सपुष्टात आले सुदैवाने सपत्ती आणि सत्तेच्या अमिषाने आपण काहीही करू शकू हा समज खोटा ठरला. प्रचड लोकमताचा पाठिबा असलेले एन. टी. रामारावाचे सरकार अधिकारारूढ झाले. फुटीर, अनैतिक राजकारणाचा ते पराभव करू शकले. ही सगळीच घटना उत्साहवर्धक खरीच; पण अतर्मुखही करायला लावणारी आहे

१४ ऑगस्टला महत्त्वाकाक्षी एन. भास्कर-रावानी इतर तीन मत्र्यासह राजिनामे दिले ते नेमकं कोणतं गणित डोक्यात ठेवून? त्याचे जे गणित आहे ते अर्थातच लोकशाहीत कुठेच बसणारे नाही. तेलगुदेसमचे आमदार आपल्याला वश होतील, त्यासाठी आपण वाटेल ते मार्ग वापरू शकू, एकदा का सत्ता आपल्या हातात आली की, मग अनेकाच्या पक्षनिष्ठा आपोआप गळून पडतील आणि आपले सिंहासन सुरक्षित राहील, असाच विचार भास्कररावानी केलेला होता. राज्य-पाल रामलालही मदतीचा हात द्यायला तयार होतेच. त्याना सुद्धा हे भास्कररावाच गणित अगदी बरोबर वाटल. त्याच तरी काय चुकलं? या देशातल्या ' लोकशाही परपरे 'प्रमाणेच सगळ्या गोष्टी क्रमश: घडणार याची त्याना खात्रीच होती शिवाय इदिरा कॉंग्रेसचे ५७ आमदार त्याना पाठिबा द्यायला उत्सुक होतेच. आध्रसारख्या कॉंग्रेसच्या बालेकिल्ल्यात विरोधी सरकार येते म्हणजे काय? १०० वर्षांच्या, स्वातत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या कॉंग्रेसच्या परंपरागत वारसावर ते जसा आपला हक्क सागतात त्याचप्रमाणे ८२ पर्यंत सत्तेवर असलेली आध्रतील कॉंग्रेसची सत्ताही कायम आपलीच असे त्याना वाटत असल्यास गैर ते काय?

हे सगळ झालं आध्रच्या राजधानीतलं राजकारण; पण ज्या मतदारांनी ' लोकप्रतिनिधी ' म्हणून या २९५ आमदाराना निवडून दिले त्याचा कुठे यात विचारच केलेला नाही. निवडणुका झाल्यावर लोकाशी आपला काहीच संबध उरत नाही, अशीच समजूत बहुतेकानी करून घेतलेली दिसते. लोकामध्ये जाऊन राजकारण करण्याचा अवघड मार्ग कोणाला नकोय. सगळा कारभार चालणार तो आमदार-मत्री-राज्यपाल यांच्या ठराविक वर्तुळात. सत्तेवर असणाऱ्याच्या कारभाराचे, एकदर वागणुकीचे मूल्यमापन करण्याचा आणि त्यांच्यावर नियत्रण ठेवण्याचा निवडणूक हा एकच हक्क लोकांना मिळतो. मग ते मतदान मनाशी काही आडाखे बाधून केलेले असेल किंवा भावनेच्या भरातही केलेले असेल; पण या मतदारानी पुढील ५ वर्षांच्या हिशोबाने दिलेला कौल राजधानीतल्या अशा राजकारणाने निर्णायक ठरतच नाही. निवडणुकाच्या काळात लोकांमध्ये जायचे आणि पुढील काळात मात्र ' लोकप्रतिनिधी ' हेच आपले ' लक्ष्य ' बनवायचे हा नवाच प्रघात पडू पहातो आहे. त्यामुळे लोकाच्या प्रश्नांना मुळातून भिडण्याची आवश्यकताच कोणाला वाटत नाही. किंबहुना लोकाच्या समस्या आणि राजकारण या कधीही एकमेकींना न मिळणाऱ्या समातर रेषा झाल्या आहेत. आज ' मास मुव्हमेंट ' ही केवळ कल्पनाच उरली आहे. थोडक्यात मतदाराशी बाधिलकी हा लोकशाहीमधील अगदीच पारपारिक भाग कालबाह्य होतो आहे.

लोकशाहीतील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे पक्ष पक्षपद्धती हा ससदीय लोकशाहीतील अविभाज्य भाग आहे. मतस्वातत्र्य, चर्चेने निर्णय आणि सहिष्णुता हे लोकशाहीचे महत्त्वाचे गुणधर्म आहेत आणि त्यामुळेच एका समान ध्येयवादाचे अनेक जण एकत्र राहून काम करू शकतात या गृहीतावर राजकीय पक्षपद्धती आपण राबवतो. ठराविक कार्यक्रम स्वीकारणारा आणि सत्तेवर असलेला किंवा ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करणाऱ्या राजकीय गटाला पक्ष असे म्हणण्यात येते; पण आज फक्त यातील उत्तरार्धच आजच्या राजकारण्याच्या वागण्यात ठळकपणे दिसून येतो आहे. हेच आपल्या लोकशाहीचे दुखणे आहे. समाजसेवेची आवड आहे म्हणून राजकारणात शिरावे असे कोणाला वाटत नाही ते याचमुळे.

राजकारणात माणूस येतो तो सत्तेसाठीच असाही युक्तिवाद केला जातो त्यालाही कोणाची हरकत असण्याचे कारण नाही; पण मतदारांशी जशी याना बाधिलकी नकोय तशीच पक्षाशीही नकोय. ' राजकारणात सत्तेसाठी यायचे म्हणून कुठल्याही पक्षात मी केव्हाही गेलो तरी चालेल ' अशी समजूत या सत्तार्थी लोकानी करून घेतलेली आहे. कार्यक्रम-धोरण यात मतभेद असले तर पक्षातर्गत सघर्ष करा, इतर लोकशाही-मार्ग वापरा, एकदम पक्षातराचा निर्णय हे लोक कसा काय घेतात? यामुळे लोकशाहीसंस्था, पक्षपद्धती आणि मतदारांचा आपण अपमान करीत आहोत याची पुसटशीही जाणीव या ' लोकशाहीवाद्याना ' नाही.

### पंधरावे मुख्यमंत्री

अर्थात वर्षानुवर्षे इथल्या राजकीय जीवनात वावरणारे जर पक्ष बदलत असतील तर नवोदित तेलगुदेसमचे आमदार इकडे-तिकडे गेले तर त्यात नवल नाही. रामारावानी पत्रकाराना सागितले की, आम्ही प्रत्येक आमदाराकडून पक्ष बदलणार नाही याचे लेखी वचन घेतले होते. (इडियन एक्सप्रेस १९ सप्टेंबर) असं वचन घ्यावं लागणं हीच विचित्र गोष्ट आहे, आणि असे वचन देऊनही भास्कररावानी आपले ' तेज ' दाखविलेच. तेलगुदेसमचाच विचार करायचा झाला तर प्रथमत: हा पक्ष नवीन आहे- पक्षबांधणी करण्यापूर्वीच कॉंग्रेस-विरुद्धच्या आणि ' रामाराव 'लाटेच्या वातावरणात निवडून आलेला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आध्रची समस्या मुख्यत: राजकीयच आहे. हे राज्य स्वतत्र झाल्यानंतरचे एन. टी. रामाराव हे १५ वे मुख्य-

मत्री आहेत ! हा अस्थिरतेचा शाप नष्ट करायचा असेल तर काही लोकशाही संकेत येथे रुजायला हवेत आणि अर्थातच त्यासाठी एका कार्यक्रमाच्या आधारावर उभा असलेला सघटित पक्ष आवश्यक आहे तेलगुदेसमला हे जमू शकेल का हा आमचा प्रश्न आहे तो पक्ष प्रादेशिक आहे म्हणून वाऊ करण्याचे कारण नाही. त्याच्या कारकीर्दीकडे बघताना जमेच्या गोष्टी तत्काळ जाणवतात (१) रामाराव हे कॉंग्रेस सस्कृतीमधले नाहीत राजकारणाचा फारसा अनुभव नसला तरीसुद्धा विशिष्ट ध्येयवाद बाळगून आहेत आणि त्यामुळेच दिल्लीच्या हातचे बाहुले म्हणून ते काम करण्याची शक्यता नाही. (२) प्रादेशिक पक्षाचे नेते असूनही अखिल भारतीय राजकारणाबद्दल त्यानी आस्था दाखविलेली आहे.

रामरावाचं आणखी एक वैशिष्ट्य तीव्रतेने जाणवतं, ते म्हणजे काहीजणाचा विरोध पत्करूनही निर्णय घेण्याची प्रवृत्ती. सरकारी नोकराच्या निवृत्तीचे वय ५८ वरून ५५ करण्याचा निर्णय अनेकाना रुचला नाही सरकारी नोकराची मते घालवायला नकोत म्हणून राज्यातील कुठल्याही विरोधी पक्षाने त्याविषयी बोलण्याचे टाळले. एकीकडे निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घेतले जाणारे निर्णय आणि दुसरीकडे रामारावाचे कटुता स्वीकारून उचललेले पाऊल यातला फरक लक्षात घेतला पाहिजे आणि अशा रामारावाच्या व्यक्तिमत्त्वाला 'आंध्र राजकीय प्रकरणा'ने आणखीच झळाळी प्राप्त झालेली आहे. आता सवाल आहे तो पक्षबाधणीचा. भास्कररावाकडे गेलेल्या आमदाराना परत पक्षात घेण्याचा मोह रामारावाना झाला तर ती घोडचूक ठरेल आणि घडलेल्या घटनेचा काहीच बोध घेतला नाही असे होईल. तेलगुदेसमने आता जनमानसातील स्थान अधिक पक्के करावे. रामारावाच्या भोवती जे लोकप्रियतेचे वलय निर्माण झाले आहे ते तेलगुदेसमला एक 'टीम' म्हणून काम करण्यास थोडे बाधकच ठरेल ही व्यक्तिकेंद्रितता घालविली पाहिजे. सत्तेवर आल्यानतर लोकहिताशी सबंधित असे निर्णय रामाराव त्यांच्या पद्धतीने घेतीलच; पण याबरोबरच आपल्या पक्षातील सामान्य कार्यकर्ता जनतेशी नियमित संपर्क ठेवतो आहे की नाही याचीही दक्षता त्यानी घेतली पाहिजे पक्षाचे अध्यक्षपद त्यानी आपल्या एखाद्या सहकाऱ्याकडे सोपविणे आवश्यक आहे पक्षबाधणीसाठी यापेक्षा अजून वेगळे काय करायचे असते ?

## आघाड्या हाच नियम

आंध्र नाट्याचा बोध हाच की तेलगु देसमसारखा लोकप्रिय पक्षसुद्धा पक्षातराच्या रोगापासून वाचू शकत नाही. अर्थातच देशव्यापी पक्षाची स्थिती यापेक्षा वाईट आहे मुळात प्रादेशिक पक्षाची निर्मिती होते ती राष्ट्रीय पक्षाच्या कमकुवतपणामुळे. आज तडजोड म्हणून प्रादेशिक पक्षाचे अस्तित्व आपण मान्य करत असलो तरी शेवटी या देशातले विरोधी पक्ष आघाड्याचे राजकारण किती काळ करणार आहेत हे ठरवायला हव. आघाड्या अपवादात्मक रहायच्या ऐवजी तो नियमच होऊन बसला आहे आणि विलिनीकरणाचाही अनुभव फारसा सुखावह नाही; पण तरीही एकाही विरोधी पक्षाला जयप्रकाशजीनी स्वीकारलेल्या नवनिर्माण आदोलनाचा राजमार्ग नकोय, मतविभागणी टाळणे, हा एककलमी कार्यक्रम घेतला तरीही प्रत्येकाच्या निरनिराळ्या तऱ्हा आहेत. कम्युनिस्टाना भाजप लोकदल नको, भाजपला कम्युनिस्ट, मुस्लिम लीग नको, शरद पवाराना महाराष्ट्रात भाजप वगळून डावी आघाडी हवी आणि राष्ट्रपातळीवर भाजप हवा, जनतापक्षीयाना काय नको हे ते सत्ता मिळाल्यानतर सांगणार आणि चरणसिगाना तर डायरेक्ट विलिनीकरणाची घाई झालेली आहे !

सत्तेच्या बाहेर राहून काही वर्षे कार्यक्रम-आदोलने याच्या माध्यमातून एकत्र राहिल्यास सत्ता मिळाल्यावर एकत्र राहणे फारसे अवघड जाणार नाही असा थोडाफार प्रयत्न भाजप–लोकदलाच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीने केला होता

शेवटी पक्षावरच एवढे लक्ष केंद्रित करावे लागते याचे कारण सासदीय लोकशाहीत तरी सत्ता प्राप्त करण्याचे तेच एकमेव माध्यम आहे. सत्ता हे समाजपरिवर्तनाचे साधन आणि पक्ष हे सत्ताप्राप्तीचे माध्यम अशी जर रचना असेल तर हे पक्षाचे माध्यम अधिक सुसंघटित आणि परिवर्तनोत्सुक नको का ?

पण या सगळ्याचा अतर्मुख होऊन विचार करण्यापूर्वीच रामारावाच्या पुनरागमनाची प्रतिक्रिया विरोधी पक्षानी व्यक्त केली– 'लोकशाहीचा विजय!' म्हणजे गमतच आहे, इदिरा गाधीची निवडणुक न्यायालयाने घटनाबाह्य ठरविली तेव्हा लोकशाहीचा विजय, अतुल्याची पदच्युती झाल्यावरही लोकशाहीचा विजय आणि जनता पक्ष सत्तेवर आला तेव्हासुद्धा लोकशाहीचाच विजय! अरे मग एवढे विजयोत्सव साजरे करूनसुद्धा देशाचे गाडे तिथेच का ? आणि पुन्हा पुन्हा विजयी होणाऱ्या लोकशाहीचा पुन्हापुन्हा खून तरी का होतो ?

जोपर्यंत 'मतदार' हा सर्वकालीन राजकारणाचा केंद्रबिंदू होणार नाही तोपर्यंत असेच चालणार. मतदाराशी–जनतेशी बाधिलकी आणि त्यासाठीच पक्षाशी बाधलकी ह्या अगदी अत्यावश्यक बाबी आहेत. उमेदवार नेमताना त्याच्यामध्ये निवडून येण्याची क्षमता किती आहे यापेक्षा त्याची निष्ठा आणि ध्येयवाद याचा निकष महत्त्वाचा मानला पाहिजे. इंदिरा कॉंग्रेसला समर्थ पर्याय निर्माण करण्यात कम्युनिस्ट भाजप– लोकदल या शक्ती अपुऱ्या पडतात. म्हणूनच ठिकठिकाणी प्रादेशिक पक्ष उदयाला येतात याची जाणीव या पक्षानी ठेवली पाहिजे

या प्रकरणानतर तरी इदिरा गाधी– तुम्ही दिल्लीला काही धक्का द्यायचा प्रयत्न करू नका आम्ही राज्याच्या सरकारला हात लावत नाही–असाही सौदा करण्याचा प्रयत्न करतील. म्हणूनच पक्षबाधणीचा राजमार्ग या विरोधकानी स्वीकारावा, अन्यथा विजय आणि मृत्यू याच्या गर्तेत सापडलेली लोकशाही खऱ्या अर्थाने कधीच प्रस्थापित होऊ शकणार नाही.

**– निरंजन**




# ज्ञानेश्वर आणि फ्रँक लॉइड राइट

(१)

प्रा. स. शि. भावे

आमच्या विमानाने आकाशात उंच सूर मारला. एक वळण घेतलं आणि असंख्य दिव्यांनी लखलखलेली शिकागोनगरी एका दृष्टीत सामावून दिसू लागली. क्षितिजावर मावळतीला लाललाल रंग. निळे आभाळ, काळे काळे होत जाणारे. शिकागोनगरी आधी खाली खाली गेली. मग छोटी छोटी झाली. बिंदुवत् होऊन दिसेनाशी झाली. तास–दीड तास झाला. कॅप्टन सांगू लागला, 'आपण आता डेट्रॉइटवरून पुढे चाललो आहोत. थोड्याच वेळात आपण अमेरिका सोडून कानडाच्या आकाशात प्रवेश करू.'

हे ऐकताना मला नाही म्हटले तरी वाईट वाटले.

... खरे म्हणजे विमान झेपावणे, स्वागतिकेने 'पट्टे आवळा' असे सांगणे इत्यादी इत्यादी मला काही लिहायचे नव्हते. ही वर्णने वाचून सर्वांच्याइतका मीही कंटाळलो आहे. प्रवासानंतर प्रवासवर्णन, की प्रवासवर्णन वाचून नंतर प्रवास, असा घोटाळा हल्ली अनेक वेळा होतो. आमचाच एक अनुभव सांगतो. लंडनला हीथ्रो विमानतळावर उतल्यावर हमाल कोठे दिसत नाहीत ना हे आम्ही शोधक नजरेने पाहिले. हीथ्रोवर हमाल नसतात असे आम्ही प्रवासवर्णनात वाचून लक्षात ठेवले होते; पण प्रवासवर्णनकाराने आम्हास बरोबर चकविले होते. कारण चकचकीत गणवेशात, कॅरिअर्स चालविणारे हेल्पर्स मदतीला सज्ज होते; पण त्यांची 'फी' परवडणारी नसल्याने 'जय स्वावलंबन' म्हटले तर मुद्दा हा की प्रवास व प्रवासवर्णन म्हणजे हे सारे असतेच, जसे आपल्याला तसे सर्वांना ते माहीत असतेच पुन्हा आपण तेच कशाला लिहावे, म्हणून गेल्या आठ लेखांत हा तपशील कटाक्षाने टाळला होता; पण आता ऐन वेळी तो आलाच. एका वेळेपुरती स्वतःला क्षमा करण्याची परवानगी घेतो. मी माझ्या वाईट वाटण्याच्या भावनेचा उल्लेख करतो आहे हे वाचकांनी कृपया लक्षात घ्यावे...

तर, आपण आता अमेरिकेचे आकाश सोडणार याने मला खरोखरच वाईट वाटले.

वाईट वाटले आणि काही वेळाने गंमतही वाटली.

आकाश काय, हे अमेरिकेचे, हे कानडाचे असे थोडेच असते? आकाश येथून तेथून एक. तेच. चार दिवशी मिलवॉकीस प्रवचनात मी हाच दृष्टान्त नव्हता का सांगितला ज्ञानेश्वरांचा. आकाश कसे? तर सूक्ष्म, व्यापक आणि उदास. तसेच योगियांचे मानस; पण मी आणखीही काही सांगितले होते. अनुभूतीचा विचार करता, आकाशही आपले, दुसऱ्याचे, इथले, तिथले असते. योगाच्या तुलनेने भक्तीचा अनुभव असा अनुभूतिसापेक्ष असतो. शिकागो विमानतळावरचे लाल–काळे आकाश वेगळे आणि लंडन विमानतळावरचे रात्री साडेदहाचे लाल–काळे आकाश वेगळे. कोलोराडोला पाइक्सशिखरावर पहाटेचा पूर्ण चंद्र मावळतो ते आकाश वेगळे आणि बव्हेरियन आल्पस्च्या चांदण्यात न्हालेले बर्फशिखरांनी तोलून धरलेले आकाश वेगळे, लेकमिशिगनमध्ये अलगद उतरून विरघळणारे आकाश वेगळे आणि कात्रज–सिंहगड–राजगड–तोरणा या क्षितिजरेषेत आंदुळणारे पुण्याचे आकाश वेगळे.

लेकमिशिगनमध्ये उतरणारे आकाश दुरावले म्हणून मला वाईट वाटत होते आणि सिंहगडाचे आकाश आता थोड्याच दिवसांनी भेटणार आहे म्हणून मला बरे वाटत होते.

असे हे ज्याचे त्याचे आकाश. शेवटी स्वतःच्या मातीकडे जो तो परत येतो म्हणतात. आकाशाचे तसेच आहे. आपल्या स्वतःच्या आकाशाशिवाय ऊब वाटत नाही.

◻

म्हणून, मिलवॉकीत, ज्ञानेश्वरीवर प्रवचन द्या असा निरोप ऐकताना मला आपल्या आकाशाखाली असल्यासारखे वाटले. ज्ञानेश्वरांचे, ज्ञानेश्वरीचे आकाश. मराठीं भाषेचे आकाश. आपले आकाश. इथल्या मंडळींना हे स्वतःचे आकाश हवे होते. वीस-वीस–पंचवीस-पंचवीस वर्षे ही मंडळी इथल्या भूमीवर रहात होती; पण इथले आकाश अजून त्यांना आपले स्वतःचे वाटत नव्हते. मग काय करावे? जोशी, पारगावकर, शेळकीकर, कवठेकर, तळवलकर यांना सहज सुचले. आपण ज्ञानेश्वरी वाचू या. एकत्र येऊन वाचू. नेमाने वाचू. मग आणखीजण आले. शहरातले बरेच लोक येऊ लागले. माझ्या प्रवचनाला तीसेक मराठी माणसे होती. एकदोन हिंदी भाषिक. कुतूहलाने आलेले. प्रवचन झाले. चर्चा झाली. मग आम्ही निघेपर्यंत हेच वातावरण कायम राहिले. चार दिवस अमक्यांकडे चहा, तमक्यांकडे जेवण. सदस्य तेच. चर्चा तीच. ज्ञानेश्वरीची. येण्याच्या दिवशी सकाळी सर्वांनी जमून एकच भावना प्रकट केली. चार दिवस महाराष्ट्रात असल्यासारखं वाटलं.

नुसत्या महाराष्ट्रात नव्हे तर सातशे–आठशे हजार वर्षांच्या परंपरेत, ज्ञानेश्वरांच्या

मराठी भाषेच्या परंपरेत, ती सारी मंडळी रमली होती. मीही रंगलो होतो. इंग्रजीतला शेक्सपियर, सस्कृतातला कालिदास आणि मराठीचा ज्ञानेश्वर, म्हणजे काय हे मिलवॉकीच्या मराठी वातावरणात आपोआप कळून येत होते

¤

या साऱ्या आठवणीचा विचार करताना वाईट वाटणे अलगद गळून पडले होते. विचार मात्र सुरू होता एवढेच कळून घेऊन मी इथून परत जात आहे काय? 'आपले आकाश हेच खरे आपले' एवढेच समजायचे होते तर त्यासाठी साडेतीन महिने इतक्या लाव येऊन राहणे आवश्यक होते काय?

आणि इथले आकाश जर वेगळे असेल तर इथल्या आकाशाचे काही तुकडे, काही रग तरी मी बरोबर नेत आहे काय? माझ्या आकाशाच्या काही छटा मी येथील आकाशात सोडन दिल्या आहेत काय?

पैकी दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा मी प्रयत्न केला नाही एक सामान्य माणूस, अवघ्या साडेतीन महिन्यात, आपल्या आकाशाच्या काही छटा दुसऱ्या–नव्या आकाशात आणून सोडू शकेल ही अपेक्षाच अवास्तव. विवेकानदाचे वेगळे. शिकागोच्या एका भाषणाने त्यानी भारताच्या आकाशातील तेजोस्त्रोत पश्चिमाकाशात प्रकाशित केला कार्लेटनला एका चर्चेत मी विवेकानदाची आठवण मात्र करून दिली होती 'भारत–अमेरिका याचे सास्कृतिक सबध' या विषयावर चर्चा होती. चर्चेत बोलणाऱ्या एका अमेरिकन प्राध्यापकानी रजनीशाचा उल्लेख केला, महर्षी महेश योगीचा केला त्या वेळी चर्चेत विवेकानदाची आठवण करून दिली होती. एक खाजगी तपशील देतो माझे कार्लेटन येथील सचालक डॉ. रसेल लँगवर्दी यानी माझ्या व अवन्तीच्या तेथील कामाबद्दल पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूना एक पत्र लिहिले आहे. त्यात त्यानी 'a fund of wisdom about practical and metaphysical aspects of India' असा उल्लेख करून म्हटले आहे–'in many cases he gave a needed corrective to other interpretations of Indian society which were perhaps too narrowly based.' पत्रातला बाकीचा भागही अनुकूल असल्याने तो इथे देत नाही. तथापि हा दिला. कारण एका व्यक्तीने काय केले यापेक्षाही प्रत्येकाने काय करावे याचे दिग्दर्शन या अभिप्रायात आहे.

प्रत्येक भारतीय हा परदेशात चालताबोलता भारत असतो. परदेशी लोकही त्याच्याकडे भारत म्हणूनच पाहतात या दृष्टीने आवश्यक व कमीत कमी जे करायचे ते करण्यात मी कुचराई केली नव्हती.

¤

परदेशी आकाशाचे कोणते तुकडे घेऊन आम्ही परतत होतो?

दोन दिवसापूर्वीचा एक तुकडा आठवत होता जगप्रसिद्ध वास्तुशिल्पज्ञ फ्रँक लॉइड राइट यांच्या हातची शेवटची कलाकृती: मिलवॉकीचे त्याने कल्पिलेले आणि स्वतःच्या कल्पनेनुसार काटेकोर बाधून घेतलेले चर्च. या चर्चमध्ये नेहमीचे कोणतेच वैशिष्ट्य नाही. टॉवर नाही. घंटाघर नाही. आकाशात गेलेले निमुळते टोक नाही. अर्थात त्यावरचा क्रॉस नाही. हे एक पूर्ण वर्तुळाकृती बठे बाधकाम आहे प्रेशर कुकरचे झाकण असावे तसे, थोडी उचावलेली पोकळी असलेले छप्पर या चर्चवर झाकणासारखे बसवले आहे. आवारही मोठ्या वर्तुळाचे आहे त्यात मोठ्या परिघाजवळ एका कडेला हे छोटे वर्तुळ. विशेष नजरेत न भरणारे unassuming, विशेष नजरेत भरू नये ह्या हेतूनेच मुद्दाम बाधलेले फ्रँक लॉइड राइट याची नात, मुलाची मुलगी, यानी बोलताना आजोबाचा हेतू प्रकट करून सागितला होता.

त्या म्हणाल्या, 'जास्तीत जास्त उच, निमुळते शिखर बाधून परमेश्वराला आवाहन करणे हे राइट याच्या परिपक्व काळात त्याना अहकाराचे द्योतक वाटू लागले होते. घटा वाजवणे हा त्याना वडिवार वाटू लागला होता. त्याना ध्यास लागला होता एक शात, नम्र, निवात प्रार्थनास्थान बाधण्याचा. म्हणून त्यानी एखाद्या कासवासारखे हे चर्च आयुष्याच्या शेवटी शेवटी कल्पिले!'

मला भगवद्गीतेतील कासवाची उपमा आठवली:

**यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः।**

आपल्याकडे देवळात कासव असतेच राइट यानी देवळाचेच कासव केले हे साम्य मी एलिझाबेथ राइट इन्ग्रॅहॅम याना सागितले. त्या चकित झाल्या, सतुष्टही!

एलिझाबेथ यांची भेट ही आमच्या अनुभवातील जमेची मोठी बाजू होती. माझ्या कामाच्या गर्दीमुळे नेहमीचे स्थळदर्शन मला करता आले नाही; पण एलिझाबेथ किंवा आधी ज्याचा उल्लेख येऊन गेला आहे ते डेव्हिड व बीव्हर्ली व्हाइट याच्यासारख्या व्यक्तीशी जो वैयक्तिक आणि तात्त्विक परिचय झाला तो अक्षरश अपूर्व आणि व्यक्तित्वाची समृद्धि देणारा होता.

एलिझाबेथ याची भेट हा एक योगायोग म्हणावा लागेल कोलोराडोला जायचे ठरल्यावर, फोनवर डॉ. जेन कॉवेल यानी विचारले, 'तुम्हाला इथे आणखी काय काय बघायला आवडेल? बारा महिने बर्फाखाली असणारी शिखरे तर मी दाखवणारच आहे. त्याशिवाय तुमची काही खास फर्माइश?'

'माणसं!', मी तत्काळ सागितले, 'चागली, वेगळी माणसं मला निसर्ग, कविता आणि माणस याच्याविषयी प्रेम वाटतं. तशी काही माणस असतील तर पाहा!'

'मी पाहते', त्या म्हणाल्या. कोलोराडोला पोहचल्यावर म्हणाल्या, 'तुमचं नशीब जोरावर आहे एलिझाबेथ राइट इथे आल्या आहेत. परवा सकाळी कॉफीलाच या असं सागितलंय त्यानी!'

त्या दिवशी सकाळी गेलो. टेकडीवर लाकडी घर. चढ लक्षात घेऊन बाधलेले. घराचे दोन भाग. एक मोठा स्टुडिओ. शेजारी एक मोठी खोली. शेजारी बेडरूम. लाकडी ओडक्याच्या जिन्याने बाल्कनी. बाल्कनीही लाकडी ओडक्याची. मधल्या अतरातून खालचे दालन दिसू शकत होते. बाल्कनीचे बाहेरचे टोक चौदा हजार फूट 'पाइक्स पीक' कडे रोखलेले. एलिझाबेथ स्वतः साठीच्या, मान्य वास्तुशिल्पज्ञ आहेत. अनेक विद्यापीठात सन्मान्य प्राध्यापक, परीक्षक, वास्तुशिल्पज्ञाच्या राष्ट्रीय व सरकारी मडळाच्या सदस्य आणि पदाधिकारी स्वतत्र वृत्तीच्या. स्वतत्र व्यक्ती म्हणून निर्भय आत्मविश्वासाने जगणाऱ्या. त्याचे घर डोगरात आहे, बाजूला आहे, एकटे आहे. त्याची त्याना भीती नाही. प्रकृतीने, मनाने बाई ठणठणीत आहेत. अर्थात रुक्ष मात्र नव्हे.

कॉफीचा मग हातात देत त्या म्हणाल्या, 'प्रोफेसर, जेन म्हणते की, तुला मला काही

प्रश्न विचाराचे आहेत विचार तर'

आणि मी प्रश्न विचारू लागलो...

'फ्रँक राइटना आपण पाहिल आहेत का? वास्तुशिल्पकलेसबधी तुमच बोलणं झाल आहे का? तुमचे वडीलदेखील वास्तुशिल्पज्ञ होते का? राइट याच्या कलेची तत्त्व कोणती? त्याच्या कलेपाठीमागे काही तत्त्वज्ञान होत का? अॅन रॅण्ड याच्या 'फाउटनहेड' बद्दल तुमचं मत काय? रॅण्ड याचं तत्त्वज्ञान तुम्हाला पटत का? ते तुम्हाला मान्य आहे का?... तुम्हाला वास्तूचे आकार सुचतात ते मूळ सरळ रेषात की वक्ररेषात? बहिर्गोल आकारात, की अतर्गोल आकारात? रेषाबरोबर रगही सुचतात का?...

'थावा, थावा', एलिझाबेथनी मला थाववलं. 'इतके प्रश्न एकदम नकोत. मला अस सागा, फ्रँक राइट याच्यावद्दल तुम्हाला इतक कुतूहल का?'

'मला उत्स्फूर्तपणे असं वाटतं की, अमेरिकेच व्यक्तिमत्त्व मला राइट याच्या व्यक्तिमत्त्वात सापडेल.'

'मग तुम्हीच तुमचे अदाज का सागत नाही?' त्यानी मलाच बोलते केले आणि मी सापडलो. म्हणालो,

'राइट याच्या कलेत मला जाणवते ती वस्तुमानाच्या बधनातून मुक्त होण्याची प्रेरणा. वस्तुमानाच्या गुणधर्मांवर मात करून, मानवी मूल्याचा, मानवतेचा ठसा वस्तुजातावर उमटविण्याची प्रेरणा'

'गो ऑन' — त्या मान डोलावीत म्हणाल्या.

'आत्मतत्त्व, वस्तुतत्त्व आणि यात अनुस्यूत अस निसर्गतत्त्व याना एकत्र आणण्याची प्रेरणा. यासाठी राइट यानी नवे, अनोळखी आकार शोधण्याच साहस केल. स्वातत्र्य आणि त्यासाठी मुक्त, अनिर्बंध साहस ही त्याची तात्त्विक आणि गतिमान मूल्य होती अस मला वाटत.' मी लहान मुलाच्या उत्साहाने बोलून टाकले आणि साशक झालो. वाटले, आपण मोठी चूक केली; पण एलिझाबेथनी मला सावरले. 'यू आर ऑन द राइट ट्रेल', असं त्या म्हणाल्या. मी जरा मोकळा झालो. 'डिड यू इण्टेण्ड अ पन ऑन राइट?' अस विचारण्याइतका धीटही झालो.

दोन–अडीच तासाचा सहवास. चर्चा. कॉफी आणि 'For the happy time with the Bhaves' असे बाईंच्या अक्षरातले, राइट याच्या मूळ घराचा फोटो असलेले कार्ड... अमेरिकन आकाशाचा हा एक तुकडा आता सदैव सोबत करणार होता

¤

असे अनेक तुकडे. निसर्गाचे, समूहाचे, व्यक्तीचे. ते एकात एक मिसळून एक अमेरिकन आकाश तयार होत होते.

माझ्या मनातल्या भारतीय आकाशात हे अमेरिकन आकाश मिसळून घेण्याचा मी प्रयत्न करीत होतो. लेकमिशिगनमध्ये विरघळणारे आकाश सिंहगडाच्या क्षितिजावर उतरू शकते का याचा अदाज घेत होतो.

आणि मनातल्या मनात गमतीदार प्रश्न येत होते उत्तरे–प्रत्युत्तरे झडत होती.

इथली सुबत्ता पाहिली आणि असे वाटले की, आपल्या इकडेही अशीच सुबत्ता असावी. आपला प्रमुख प्रश्न आहे तो दारिद्र्याचा आहे. आपल्याकडे बुद्धिमत्ता आहे, प्रतिभा आहे, व्यक्ती-व्यक्तीत कर्तृत्व आहे. परपरेची ऊब आहे श्रद्धा आहे माणुसकी आहे सामान्यातल्या सामान्य माणसाचे मनदेखील मोठे आहे, समजूतदार आहे. आपल्याकडे जे अस्वच्छतेसारखे दोष आहेत ते गरिबीमुळे आहेत नेहमी ज्याची निंदा केली जाते तो झोपडपट्ट्याचा, त्यातील अस्वच्छतेचा, रोगराईचा, रस्त्यावर–रुळावर शौचविधी करण्याचा प्रश्न घ्या. या लोकाना हे सारे असे करण्याची जन्मजात हौस असते? शहरीपणाने निर्ढावलेली काही मने तसे म्हणत असतील; पण खरे तसे नाही. यानाही स्वच्छ बाथरूममध्ये, गरमगार शॉवरखाली स्नान करणे आवडेल, पण जन्मजन्मी ही सुबत्ता मिळण्याची त्याला आशाच नाही. सध्याचे त्याचे जगणे जनावरासारखे झाले आहे ही गोष्ट खरी, पण मुळात तो माणूस आहे, जनावर नाही. त्याला सुबत्ता द्या. त्याचा माणूसपणा कसा बहरतो, खुलतो, ते पाहा

याचे प्रत्युत्तर त्याच वेळी मनात तयार होते.

सुबत्ता द्या असे नुसते म्हणून कसे चालेल? त्यासाठी कष्ट केले पाहिजेत, शिस्त पाळली पाहिजे. या अमेरिकन आकाशाखाली कष्ट आणि शिस्त याना महत्त्व आहे. जो कष्ट करीत नाही, शिस्त पाळत नाही, त्याला या आकाशाखाली प्रतिष्ठा किंवा कसलेही तात्त्विक–धार्मिक समर्थन नाही. कष्ट आणि शिस्त हाच धर्म आहे. हुकूमशाही देशाना हेवा वाटावा अशी शिस्त या देशात आहे आणि ही शिस्त स्वायत्त आहे, उत्स्फूर्त आहे, सक्तीने लादलेली नाही आपल्याकडे ही शिस्त हे कष्ट का नाहीत? आता इथे गरिबीचे कारण पुरेसे ठरणार नाही. कारण, कोणत्याही परिस्थितीत कष्ट आणि शिस्त यामुळे गरिबी सुसह्यच होईल. ती काही यामुळें वाढणार नाही. असे जर आहे तर इकडे आम्हाला कष्ट करावेसे का वाटत नाहीत? शिस्त पाळावीशी का वाटत नाही?

याला एक तात्त्विक भासणारे उत्तर आपण नेहमी देत असतो. कष्ट कराल, शिस्त पाळाल, सुबत्तेत अगदी लोळाल. पुढे काय? पुढे मरणच आहे वैभवशाली झाला म्हणून काही माणूस अमर होत नाही. 'दोन वितीचे जीवन' इत्यादी. या क्षुद्र जीवनात एवढा लोभ, एवढी महत्त्वाकाक्षा कशाला?

आत, एखाद्याला जर हे तत्त्व मनापासून पटले असेल तर तो तसा वागेल. तो असे प्रश्न विचारत, चर्चा करीत हिंडणार नाही; पण बहुसख्य आपण आळसाचे समर्थन करण्यासाठी आणि बेशिस्त झाकण्यासाठी हे तत्त्व पुढे करीत असतो. एक चागले, मूलभूत तत्त्व, व्याजतत्त्व म्हणून, समर्थन म्हणून, वापरीत असतो, हें नाकरण्यात मतलब नाही.

उलट असे म्हणता येईल की, जर हे सारे अस्तित्व क्षणभगुर आहे, व्यापक पाहिले तर निरर्थक आहे तर आपल्या वाट्याला आलेले क्षण आणि कण आपण सुदर का करू नये?

यावर प्रश्न असा येईल की, जीवनाचा कण व क्षण सुदरच करायचा अशी तरी सक्ती का? आणि एकावर दुसरा अशी सक्ती कशी काय करू शकतो?

याला उत्तर आहे. आणि ते साधे आहे. ते असे की येथे सक्ती नाही सक्तीचा प्रश्नच नाही. जे आहे ते सुदर करायचे की नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे; पण हेही खरे की माणूस म्हटला की, त्याच्याजवळ प्रतिभा— नवनिर्माणशक्ती— असतेच. ती वापरण्याचे वा न वापरण्याचे स्वातत्र्य–choice–त्याला असते. हे स्वातंत्र्य वापरावे की नाही? तर तेही स्वातत्र्य आहे.

मात्र यात एक पथ्य पाळावे प्रतिभा-शक्ती न वापरण्याचे स्वातंत्र्य घेणारानी, ती शक्ती वापरून सुदर होणाऱ्याविरुद्ध जळू नये की कुरकुरू नये. दोन मुले आहेत त्याना कागद, पेन्सिल, बोर्ड असे चित्रकलेचे सामान समसमान दिले आहे आता, किती चागले चित्र काढायचे हे प्रत्येकाने ठरवावे मात्र, कमी चागले चित्र काढणाराने अधिक चागले चित्र काढणाराने अधिक चागले का काढले अशी कुरकुर करू नये.

या समाजाची गाम्याची वृत्ती–genius बहुताश अशी आहे तुला ७५ आयुष्य दिले आहे. त्याचे तू काहीही कर वाटल्यास ते उधळून टाक, उद्‌ध्वस्त कर; पण मग कुर-कूर नको !

स्वातंत्र्य घे त्याची जबाबदारीही घे यामध्ये न कुरकुरणे हे माणसाला शोभेसे कुरकुरणे हे न शोभेसे flippancy ही सर्वात वाईट !

हीच ती फ्रँक लॉइड राइटची कलादृष्टी. कला हा स्वतंत्र, मुक्त आत्माविष्कार असला पाहिजे. जीवन हे देखील कलाकृतीसारखे असले पाहिजे जीवनाला कलाकृती कर-ण्याची क्षमता व सधी माणसालाच मिळाली आहे या क्षमतेचा आणि सधीचा वापर न करणे म्हणजे या दृष्टीने कमी माणूस असणे होय.

¤

हे फ्रँक राइटचे अमेरिकन आकाश मला आवडले महत्त्वाचे वाटले; पण माझ्या भारतीय आकाशात ते सामावून घेताना काही प्रश्न उभे राहिलेच

पहिला असा की, समान सधी खरोखरीच असते का ? दोन मुलाना चित्र काढण्याचे सामान सारखेच मिळते का ? तर अशी समानता वास्तवात नसते या विषमतेचे काय होते ? अमेरिकेत आज जी गुन्हेगारी वाढली आहे ती वऱ्याच प्रमाणात या विषम-तेने वाढली आहे दुसरा असा की, या स्वातंत्र्याचा उपयोग आत्माविष्कारासाठी न होता उपभोगातिरेकासाठी–self-gratification instead of self–expression –होऊ लागला तर ? अमेरिकन शहरात जी गुन्हेगारी वाढली आहे ती यामुळेही वाढली आहे. अगदी गुन्हेगारवृत्तीचे कॉम्प्यूटर बन-वण्यापर्यंत मजल गेली आहे तिसरा असा असा की स्वतःच्या समाजापुरते जे तत्त्व हा समाज मानतो तेच इतर समाजांशी समाज म्हणून वागताना पाळतो का ? आणखी असे अनेक प्रश्न, पण आता एवढे पुरेत

पैकी पहिल्या दोन प्रश्नाची उत्तरे अमे-रिकन समाज आपल्या तत्त्वानुसार शोध-ण्याचा प्रयत्न करतो आहे. विषमता कमी करणे आवश्यक आहे हे त्याना मान्य झाले आहे अधिकाधिक फलदायी–कल्याणकारी योजना, त्यासाठी अधिक सुबत्ता, असा त्याचा यासाठी उपाय आहे. उपभोगातिरेकाच्या गुन्हेगारीबाबतचा त्याचा उपाय समाज-शिक्षणाचा आहे शाळा–कॉलेजे–सस्था–सज्ञापनयत्रणा यातून हे शिक्षण देण्यात येते कृत्रिम हुकूमशाही उपाय योजण्यास त्याचा नेहमीच विरोध आहे असे उपाय हे अती अपायच ठरतात, अशी त्याची खात्री आहे परक्या समाजाशी समाज म्हणून वागताना मात्र वेगळे चित्र दिसते. लोकशाही राज-वटीपेक्षा हुकूमशाही राजवटी या देशाला अधिक रुचतात असे दिसते हा आतर-राष्ट्रीय राजकारणाचा वारसा आहे त्याचे बधन या देशाच्या धोरणावर पडलेले आहे. आणखीही एक महत्त्वाचे कारण आहे इतर अनेक देशाशी या देशाचे असलेले आर्थिक सबध समान सधीचे नाहीत उत्पादक, विक्रेता आणि ग्राहक असे हे सबध आहेत आणि हे सबध क्वचितच समानतेचे असतात हे सबध समान झाल्याखेरीज कोणत्याच दोन देशाचे आकाश एक होऊ शकणार नाही.

असे हे प्रश्न. न सपणारे मनातली चर्चा न सपणारी.

¤

तर होता होता कॅनडाचे आकाश सपले, इग्लडचे सपले आणि मी मुबईला सहार-तळावर उतरलो. धावपट्टीवर खड्डे त्यात नुकत्याच झालेल्या पावसाचे पाणी. मनाशी म्हटले, आता आपली भूमी आली, आपले आकाश आले.

आता मी रस्त्यावरून चौथ्या मजल्या-वरच्या मित्राला खणखणीत हाक मारीन मला त्याची अपॉईंटमेंट घ्यावी लागणार नाही.. आणि मला आठवली माझी अतृप्त इच्छा शिकागोला, मधू देशपांडेला अशी सणसणीत हाक मारायची आहे ... त्या-साठी पुन्हा तिकडे जाणे आले

## समाप्त

## दिवाळी अंकासंबंधी वर्गणीदारांना सूचना

वर्गणीदाराना दिवाळी अक वर्गणीतच दिला जातो. ज्याना दिवाळी अक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यानी दि १३–१०–८४ पर्यंत चार रुपये म ऑ. ने पाठवावेत

अक व्यवस्थित मोजून पोस्टाच्या ताब्यात दिले जातात तरीही अक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी.


अंक शिल्लक असल्यासच व **रजिस्टरसाठी चार रुपये पाठविल्यासच अंक पुन्हा पाठवू**

ज्याची वर्गणी सप्टेंबर । ऑक्टोबर अखेर ( १९८४ ) किंवा त्या सुमारास सपली असेल व ज्याची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्याना दिवाळी अक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार सा माणूस कार्यालयातून दिवाळी अक समक्ष नेणार असतील त्यानी समक्ष वा पत्राने दि. १३–१०–८४ पर्यंत लेखी कळवावे. ज्यानी अशी पूर्वसूचना दिलेली आहे, अशा वर्गणीदारानी आपला दिवाळी अक माणूस कार्यालयातून १९ ते २२ ऑक्टोबर ८४ या काळात सकाळी ११ ते सायकाळी ५॥ या वेळात घेऊन जाण्याची व्यवस्था करावी त्यानतर, म्हणजे दिवाळीचे सुट्टीनतर ( ३१ ऑक्टोबरनतर ) अक मिळू शकेल.

वर्गणीदारानी आपला वर्गणीदार क्रमाक व सपूर्ण पत्ता मनीऑर्डर कूपनमध्ये किंवा पत्रामध्ये स्पष्ट लिहावा

**–व्यवस्थापक**




# सव्याज परतफेड

**मूळ लेखक : रोमान टर्स्की**

**अनुवाद : श्रीकांत लागू**

माझा जन्म पोलंडमध्ये झाला. त्या काळी पोलंडमध्ये वांशिक तेढ आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या झटापटी हे नेहमीचे प्रकार होते. वॉर्सामध्ये ज्यूविरोधी मोर्चे, आंदोलने सतत चालत असत. त्यात मी हिरीरीनं भाग घेत असे. अगदी दगडफेक, हाणामाऱ्या कसलाही विधिनिषेध न बाळगता करत होतो. आमचं लक्ष असायचं साहजिकच ज्यू, त्यांची घरं आणि त्यांच्या मालकीची दुकानं. माझा वडलांचा या गोष्टींना सक्त विरोध होता; पण मी तो कधी मनावर घेतला नाही. वडिलांच्या शिकवणुकीचा आपण स्वतः समजून शेजाऱ्यावर प्रेम करा, परिणाम व्हायला मला पुढे अनेक दिव्यांतून, हाल–अपेष्टांतून जावं लागलं. माझं मतपरिवर्तन व्हायला खुद्द एक ज्यू माणूस कारणीभूत झाला.

त्याचं असं झालं.

हिटलरनं ऑस्ट्रेलियाचं शिरकाण केलं त्या वेळी मी फान्समधल्या लिऑन इथं एका विमानक्लबात शिक्षक होतो. बातमी ऐकताच आता युद्ध अटळ आहे, हे मनोमन जाणून, माझ्याच विमानानं मायभूमीकडे परत जायला निघालो. वाटेत अचानक इंजिनामध्ये चुंबकीय त्रास सुरू झाला; पण वाटेत व्हिएन्नाला दुरुस्तीसाठी उतरणं भाग पडलं. रातोरात दुरुस्तीची व्यवस्था केली आणि एका हॉटेलात, दुसऱ्या दिवशी हॉटेल सोडण्याआधी काही भेटवस्तू खरेदी कराव्यात म्हणून बाहेर पडत होतो. तेवढ्यात एक माणूस वाघ मागे लागल्यासारखा धावत आला आणि हॉटेलात घुसताना मला त्यानं धडक दिली. आम्ही दोघेही कोसळलो. माझं डोकंच कामातनं गेलं. त्याच्या या कृत्याबद्दल त्याला धडा शिकवण्याच्या हेतूनं त्याच्या अंगावर गेलो तो त्याचा पांढराफटक पडलेला चेहरा पाहून मी थबकलो. भयानकपणे त्याचं ऊर धपापत होतं. माझ्या पकडीतून सुटण्याची केविलवाणी धडपड करत पुटपुटला, 'गेस्टापो, गेस्टापो!' मला स्वतःला जर्मन फार कमी समजतं; पण एवढं मात्र कळलं की त्याच्यामागे जर्मन गुप्तपोलीससंघटनेचे लोक लांडग्यासारखे लागले होते आणि त्यांच्या तावडीतून निसटण्यासाठी जीवाचा आटापिटा करत होता.

मला काय वाटलं कुणास ठाऊक. मी झपाट्यानं त्याला हॉटेलच्या हॉलमधून वर माझ्या खोलीत घेऊन गेलो. झटकन् कॉटवरची गादी थोडी सरकवून त्याचं लुकडं शरीर मावेल एवढी जागा केली. वर चादर, रजया पसरून टाकल्या. जराही संशय येणार नाही इतकी ती कॉट रिकामी वाटत होती. मीही कपडे काढून नुकताच झोपून उठल्याच्या आविर्भावात आळोखे-पिळोखे देत बसून राहिलो. अपेक्षेप्रमाणे गेस्टापोंची धाड आलीच.

त्यांनी माझा पासपोर्ट आणि इतर कागदपत्र पाहिले. गुरगुरत प्रश्नांची फैर झाडली. माझ्या तुटपुंज्या जर्मनमध्ये त्यांना सांगितलं की, तुम्ही काय बोलताय मला काही कळत नाहीय. निराश होऊन लांडगे फारसं काही न तपासता निघून गेले.

ते जाताच मी दार लावून घेतलं आणि रजया उचलल्या. त्याबरोबर तो बिचारा धडपडत उठला आणि भडाभडा जर्मनमधे बोलू लागला. एकही शब्द कळला नाही आणि त्याच्या उपकाराच्या भाराखाली दबून गेलेल्या भावना समजायला ते शब्द कळण्याची गरजही नव्हती.

मी माझे उड्डाणाचे नकाशे काढले. त्याला खाणाखुणांनी आणि नकाशावरच्या मोकळ्या जागेत चित्र काढून समजावलं. माझ्याकडे विमान आहे आणि त्याला ऑस्ट्रियाबाहेर पोचवू शकतो. त्यानं नकाशातल्या वॉर्सावर बोट ठेवलं आणि हातवारे करून विचारलं की, तिथं मला घेऊन जाशील?

मी मानेनं नकार दिला आणि समजवायचा प्रयत्न करू लागलो. मला इंधनासाठी क्रॅकॉ इथं उतरावं लागणार होतं आणि कुठल्याही विमानतळावर जर उतरलो तर त्याला अटक होण्याचा धोका होता, हे समजावण्यासाठी पोलीस आणि तुरुंग यांचं चित्र काढून दाखवावं लागलं. एकच उपाय होता तो म्हणजे पोलंडच्या हद्दीत शिरताच कुठल्या तरी कुरणात विमान उतरवायचं आणि तिथून त्यानं आपला मार्ग सुधारायचा. त्याच्या बदामी डोळ्यांतून माझ्याबद्दलचा आदर नुसता ओसंडत होता.

त्याला घेऊन मी सावधगिरीनं विमान-

तळावर गेलो. कस्टम्स आणि इमिग्रेशनच्या चक्रातून त्यामानान लवकर सुटका झाली. तो फक्त मला बाय् बाय्. करायला आलाय. अस सागाव लागलं. विमान सुरू करून इंजिन छान गरम झाल्याबरोबर तो झटकन् वर चढला आणि तात्काळ धावपट्टीवरून विमान धावू लागल. कोणाला कळायच्या आत आम्ही वर उडालोसुद्धा!

आम्ही एकोस्लोव्हाकिया पार केला. लगेचच क्रॅकॉ शहर आणि बाजून जाणारी रिबिनीसारखी दिसणारी बिस्टुलानदी दृष्टिपथात आली एका आडगावच्या रेल्वेस्टेशनजवळ विमान एका कुरणात उतरवलं पलीकडेच जगल सुरू होत होतं. मी त्याला नकाशावर आम्ही जिथ उतरलो होतो ती जागा दाखवली. तिथून इतरही जागाचं दिशादर्शन केलं. माझ्याजवळचे जवळजवळ सगळे पैसे दिले आणि शुभेच्छा व्यक्त केल्या. पुन्हा एकदा दर्दभऱ्या नजरेन त्यानं आभार मानले आणि जगलाकडे मार्गस्थ झाला.

तिथनं विमान क्रॅकॉ विमानतळावर उतरवल आणि स्वागतासाठी पोलिसाची एक पलटणच उभी होती. 'आम्हाला तुमच्या विमानाची झडती घ्यायचीय. तुम्ही व्हिएन्नामधून एका माणसाला पळून जायला मदत केली आहे असा आरोप आहे तुमच्यावर'

मी झडती घ्यायला मुळीच आडकाठी केली नाही. उलट आपणहून त्याना विमान आतून–बाहेरून यथेच्छ दाखवल. त्याना सहजच विचारल की, तो माणूस कशासाठी हवा होता ?

'तो ज्यू होता!'

झडतीत हाती काहीच न लागल्यामुळं मला झक्कत सोडून द्याव लागल.

शेवटी युद्ध सुरू झालंच. पोलडचा छोटयाशाच पण अत्यत तिखट आणि रक्ताळ सग्रामात जर्मनानी पाडाव केला. त्या सग्रामात मी पोलिश हवाईदलात काम केलं. असख्य पोलिश जनतेच्या स्वातत्र्यलढ्याचा मी एक भाग झालो देशातून लढता येत नाही तर बाहेरून लढाव म्हणून रुमेनियात शिरलो तिथेही आमची डाळ शिजली नाही. आम्हाला अटक झाली आणि नरकतुरुगात रवानगी झाली.

इतर काही जणाच्या मदतीन आम्ही आमची त्या तुरुगातून सुटका करून घेतली फ्रान्समध्ये जाऊन फ्रेंच वैमानिकदलात नाव नोंदवल. फ्रान्सचाही पाडाव झाला त्याबरोबर मी इंग्लंडमधे प्रवेश मिळवला आणि त्याच्या हवाईदलात भरती होऊन प्रख्यात ब्रिटनच्या लढाईत मी जर्मनाविरुद्ध भाग घेतला. इंग्लिश खाडीच्या परिसरात बोलाने शहरावरच्या नभागणात आमची लुफ्तवाफशी –जर्मन हवाईदल–चकमक झडली त्यात मी जखमी झालो. त्याची सख्या इतकी जास्त होती की, त्याची विमान आम्हाला गर्दी करून हाणायची; पण जिद्द या एकाच गोष्टीच्या जोरावर आम्ही लढत होतो.

त्या चकमकीनतर आम्हाला परत फिरणं भाग होत. परतीच्या वाटेवर माझ्या विमानाची ME–109 या जातीच्या विमानाची निसटती टक्कर झाली. त्या विमानाच्या शेपटाचा एक तुकडा उडाला. माझी काच फोडून आत शिरला आणि माझ्या डोक्यावर आदळला. वहाणाऱ्या रक्तान मी अर्धा आधळा झालो विमान हेलपाटू लागलं; पण ताबा सुटला नव्हता. माझ्या विमानाला सरक्षण देत इतर सहकारीही बरोबर होतेच. कशीबशी इग्लिश खाडी आम्ही पार केली आणि माझी शुद्ध हरपता हरपता माझ स्पटिफायर विमान घासटत, फरपटत कसबस जमिनीला टेकल मला नंतर म्हणजे शुद्धीवर आल्यावर जे कळल ते अस की, माझ्या कवटीला भेग पडली होती आणि माझा जीव वाचण शक्य नाही तेव्हा मेंदूभागावर शस्त्रक्रिया करण्याचे प्रयाससुद्धा करू नयेत असं तिथल्या डॉक्टराच मत पडल होत.

मी जेव्हा शुद्धीवर आलो तेव्हा अतिशय अधुक दिसत होत. त्यातच एक निमुळता चेहरा आपल्या मोठ्या बदामी डोळ्यानी माझ्याकडे पहातोय.

'ओळखलस मला' तो चेहरा बोलू लागला. 'तू मला व्हिएन्नामधे वाचवल होतस.' त्याच्या बोलण्याला जर्मन उच्चाराची किनार होती.

त्याच्या बोलण्यान माझ्या आठवणीवरचा धुकेरी पडदा तात्काळ दूर झाला. तो बोलका चेहरा आठवला. अडखळत मी म्हणालो, 'मी तुम्हाला कसा सापडलो ?' अस म्हणतानाच त्याच्या अगावरचा खास डॉक्टरी पाढरा कोट मला दिसला. 'तुम्ही इथच काम करता काय ?'

'ती एक मोठीच कहाणी आहे.' तो सागू लागला, 'तू मला क्रॅकोजवळ उतरवलस. तिथून मी कसा तरी वॉर्साला पोहोचलो. तिथ माझ्या एका जुन्या मित्रानं मदत केली. युद्ध सुरू होण्याच्या जरा आधी मी निसटलो आणि सुखरूप स्कॉटलंडमधे पोहोचलो. जेव्हा तुमच्यापैकी एका पोलिश हवाईतुकडीनं नेत्रदीपक कामगिरी केल्याचं वाचल, तेव्हा तू त्यात असशील की काय अशी शका आली. म्हणून मग ब्रिटिश हवाईदलाला मी पत्र लिहिल, तेव्हा तू त्यात खरोखरीच असल्याच कळलं.

'तुला माझ नाव कस कळल ?'

'तुझ्या नकाशावरच्या एका कोपऱ्यात ते लिहिलेल होत. ते मी लक्षात ठेवल होत.'

त्यान माझं मनगट हातात घेतल व थोपटत म्हणाला, 'कालच वर्तमानपत्रात एका पोलिश वैमानिकान शत्रूची ५ विमानं पाडली आणि स्वत: जखमी अवस्थेत याच हॉस्पिटलजवळ घसरउतार झाल्याच वाचल. पुढ असही म्हटल होत की, डॉक्टरानी जिवाची आशा सोडली आहे. मी ताबडतोब एडीबर्गच्या रॉयल एअर फोर्सशी सपर्क साधला आणि मला ताबडतोब या हॉस्पिटलमधे नेण्याची विनती केली.'

'का ?'

'मला वाटल की, उपकाराची परतफेड करण्याची सधी आली आहे. मी ब्रेन सर्जन आहे आणि आज सकाळी तुझ्यावर मीच शस्त्रक्रिया केलीय' □


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पुणे ३०

# केंद्र सरकार काश्मिरमध्ये दरवर्षी निव्वळ शंभर कोटी रुपये ओततं ते जातात कुठे ?

अविनाश भगवत धर्माधिकारी

जम्मूतून निघालो तेव्हा अजून उजाडतच होत रघुनाथबाजारातला रस्ता सुनसान होता. पावसाची एक मुसळधार सर नुकतीच पडून गेल्यामुळे रस्ता स्वच्छ धुतलेला होता दुकानासमोर पसरलेली पोती ओलीचिंब झाली होती. काल संध्याकाळी हाच रस्ता गर्दीने गजबजलेला होता. तिथल्या एका हॉटेलात जेवताना पंजाबामधून आलेले दोन शिक्षक भेटले होते. एक सरदार, एक हिंदु काही कामानिमित्त जम्मूत आले होते. एक जलंदरचा होता, एक कपूरथळचाचा. लष्करी कारवाईनंतर त्याची दोस्ती झालेली होती. त्यामुळे पंजाबमधला असंतोष, जातीय तणाव याविषयी प्रश्न विचारल्यावर सरदार शिक्षकान चटकन उत्तर दिल, 'आता आमच्याकडे बघूनच ठरवाना काय ते. आम्ही एकत्र दिसलो असतो का ?' त्याचं म्हणण लष्करी कारवाई. विशेषत सुवर्णमंदिरातला लष्कराचा लावत चाललेला वापर याबद्दल शिखामध्ये असंतोष आहे, पण शिख विरुद्ध हिंदु असा मोठ्या प्रमाणावर विद्वेष अजूनही नाही. 'काळ हेच औषध आहे हळूहळू लोक सर्व विसरून पहिल्याप्रमाणे सुखासमाधानान नादू लागतील पूर्वीचाच आनंदी पंजाब डोलू लागेल.' नंतर त्या शिक्षकद्वयाशी अतिरेकी कारवाया, भाक्रा कालव्याच भगदाड, परदेशातल्या शिखाची वक्तव्यं, सरवत खालसा, कारसेवा याविषयी बोलायचा प्रयत्न केल्यावर मात्र त्याची टाळाटाळ दिसू लागली. सुवर्णमंदिर जनतेसाठी पुन्हा खुल केल्यावर काही जणानी आत जाऊन 'खालिस्तान'च्या घोषणा दिल्या याविषयी विचारल्यावर तर त्यानी जेवण उरकलं आणि हॉटेल सोडल. यामुळ त्यानी प्रारभी दिलेल्या आशावादी उत्तराच्या पुढे पूर्णविरामाऐवजी प्रश्नचिन्ह उमटली !

ती सोबत घेऊनच बसअड्ड्यावर पोचतोय तोच निर्मल चटर्जीन परत गाठल, हॅलो केल आणि 'श्रीनगरमधल्या आमच्या हॉटेलच बुकिंग आताच करून ठेवा' हा कालचाच मुद्दा परत पटवून द्यायला सुरुवात केली आज हे पटवून द्यायला त्यान सपूर्ण काश्मीरच राजकारण पणाला लावल–

फारुक सरकार पाडल्यापासूनच श्रीनगरमध्ये सारखा असंतोष धुमसतो आहे तो दाबून टाकण्यासाठी शाह सरकारनं गेले जवळजवळ पधरा दिवस कर्फ्यू लावून ठेवला आहे. कर्फ्यू फार कडक आहे. तुम्ही श्रीनगरमध्ये पोचाल तेव्हा कर्फ्यू जारी झालेला असेल, मग तुम्हाला स्टॅंडवरच रात्रभर अडकून पडाव लागेल त्यापेक्षा आमच्या हॉटेलच बुकिंग केलेत तर आमचा माणूस तुम्हाला घ्यायला येईल, त्याच्याकडे कर्फ्यू पास असतो तुम्ही सुरक्षितपणे मुक्कामी पोचाल.

### बिझनेस बिघाड दिया

हॉटेलात एखादी खोली बुक करण आणि सपूर्ण प्रांताच राजकारण याचा इतका जवळचा सबध फार थोड्या वेळा जोडला जात असणार एरवी या दोन्हीच्या अस्तित्वाच्या पातळ्याच निरनिराळ्या असतात; पण फारुक सरकार–पतन आणि शाह सरकार बनणं या घटनानी सगळ्या काश्मीरमधल जीवन एकाच बिंदूभोवतीच्या वर्तुळात खेचल्यासारख झालं होत. त्यातच विमान पळविण्याच्या प्रकरणान नवीन रग मिसळला होता शीख अतिरेकी जम्मूतलेच असल्याच पेपरामधून येत होतं. त्यामुळे एकूण सुरक्षाव्यवस्था अधिक कडक केली जात होती. आदल्या रात्री पाकिस्तान दूरदर्शनचं दर्शन घडल होतं. त्यावरून पंजाब, काश्मीरमध्ये शिखाना कसं सशयानं वागवल जातय याची रसाळ वर्णन ऐकायला मिळाली होती. काश्मिरमधली अस्वस्थता श्रीनगरमध्ये खदखदत होती

श्रीनगरमध्ये गेले तेरा दिवस कडक कर्फ्यू. १३ जुलै हा काश्मिरमधला शहिदी दिवस' १९३१ मध्ये या दिवशी स्वातंत्र्य आणि लोकशाहीकरता निदर्शन करणाऱ्यावर श्रीनगरमधल्या रीगल चौकात निर्घृण हल्ला करण्यात आला होता. त्यात अनेकजण शहीद झाले. त्या प्रसगाच्या स्मृतिप्रीत्यर्थ काश्मिरमध्ये १३ जुलै साजरा केला जातो त्या दिवशी श्रीनगरमधल्या मशिदीमधून खास नमाज 'आजान' पढला जातो. या वर्षी यातल काहीच झालं नाही. कारण कर्फ्यू. कोणत्याही निमित्तान लोक रस्त्यावर आले तर कोणतं वळण लागेल कुणास ठाऊक ? त्यापेक्षा पक्का बदोबस्त आवळलेलाच बरा.विरोधी पक्षानी एकत्रितपणे श्रीनगरमध्ये मोर्चा काढायच ठरवल होतं, त्यावरही बदी घालण्यात आली. नबुद्रिपाद, ज्योती बसु आणि अन्य काही विरोधी नेते श्रीनगरमध्ये पोचले तर त्याना हॉटेलातच जवळजवळ कैद करून ठेवण्यात आल. तो दीड दिवस फारुक अब्दुल्लाचा ठावठिकाणा लागत नव्हता त्यामुळे त्याना अटकेत टाकण्यात आलय इथपासून ते पाकिस्तानात फरारी झाले इथपर्यंत काय वाटेल त्या अफवा पसरल्या होत्या. त्यामुळे श्रीनगरमध्ये कधी कसला डोब उसळेल सांगता येत नव्हतं.

असं सगळ सागूनही मी त्याच्या हॉटेलच बुकिंग करेना म्हटल्यावर मात्र निर्मल चटर्जीन सिगरेट झटकत सागितल, 'साहेब, आम्ही एवढ कोणाच्याच मागें लागत नाही, पण इस राजनीतीने सारा बिझनेस बिगाड दिया.' तो सागत होता ते खर होत पर्यटनव्यवसाय हा काश्मिरमधला खऱ्या अर्थान एकमेव उत्पादक व्यवसाय. बाकी रेशिम, शाली, स्वेटर्स, अक्रोड इ ... उद्योग पर्यटनावलबी आहेत. त्यातून जुलै-ऑगस्ट हे काश्मिरचे सर्वात चागले महिने. एरवी पर्यटकाचे लोढे इकडे लोटतात, अमरनाथची यात्राही याच काळात सुरू होते; पण या वर्षी पजाबमधल्या घडामोडी आणि काश्मिर-मधली अस्थिरता यामुळे पर्यटनव्यवसाय बर्फापेक्षाही थड बनला होता पजाबमधून तर काश्मिरची अन्ननलिका, श्वासनलिका जाते. लष्करी कारवाईच्या काळात त्या दाबल्या गेल्यान काश्मिरचे प्राण कोडले गेले होते जीवनावश्यक वस्तूच्या किंमती आभाळाला भिडल्या होत्या त्यातून घाबरा झालेला काश्मिरचा जीव जरा ठिकाणावर येतोय तोवर सरकारबदल, नवीन अस्थिरता, हिंसाचार. पर्यटनव्यव-साय वळी पडला. दिवसभराचा प्रवास सपवून श्रीनगरमध्ये पोचलो तेव्हाही हेच दृश्य दिसल. श्रीनगरच्या आसपासच्या रम्य प्रदेशाची सैर घडवणाऱ्या सहली बद होत्या. आरामगाड्या डेपोत पडून होत्या. नावा, शिकारे झेलममध्ये अस्वस्थपणे डचमळत होते आणि बसमधून उतरणाऱ्या दुर्मिळ प्रवाशावर रिक्शावाले, हॉटेलवाले, प्रवासीकपन्याचे प्रतिनिधी तुटून पडत होते. श्रीनगरमध्ये पोचलो तेव्हा सध्याकाळचे साडेसात वाजले होते, पण स्वच्छ उजेड होता. झेलमच्या काठान चालायला सुरुवात केल्यावर काही क्षणातच उजेड विरला. श्रीनगर अधारात बुडून गेल. मुक्कामी पोचण्यापूर्वी जम्मू-श्रीनगर हा रम्य प्रवास पार पडला होता

□

प्रवास असा की काही काळ सगळ राजकारण, त्यातली उघडी-नागडी सौदेबाजी, तत्त्वशून्यता याचा विसर पडावा सकाळच्या मस्त हवेत प्रवास सुरू झाला. काल रात्रभर जागरण झाल होत जरा डोळे मिटावेत म्हणून सीटवर डोके टेकले, पाय शक्य तेवढे पसरले. तोवर बसनं जम्मू-तावी शहर सोडून श्रीनगरकडे चढायला सुरुवात केली होती. भोवती काश्मिरी निसर्गसौदर्याची लयलूट मुजरे करत होती शेजारच्या सीटवर एक मस्त दोस्त भेटला. झोप विसरून गेलो आणि प्रचलित घडामोडीसुद्धा उच उच डोगरापलीकडे लपल्या.

दोस्ताच नाव स्तोवदन फुत्सोंग लोपो स्तोवदन फुत्सोंग याचा अर्थ धष्टपुष्ट, सशक्त. याच्या बाबतीत नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा असला प्रकार नव्हता. जम्मूत शिकणारा हा लडाखी विद्यार्थी खरोखरच सशक्त, दणकट होता या मार्गावरनं त्यान अनेकदा प्रवास केला होता. त्यामुळे प्रत्येक वळणावळणाशी तो चागला परिचित होता. मला परिचय करून देत होता. तो मला चिनार, देवदार, प्रॉपेलर्स, वॉलनट्स् अशा वनश्रीचा परिचय करून देत गेला तशी दोस्ती वाढत गेली त्याच प्रत्यतर एकत्र चहा, जेवण, गप्पा यात दिसलं. दरम्यान तो बौद्ध असल्याच कळल्यावर दोस्तीला अधिकच मजा आली शेवटी त्यान 'लोपो'चा अर्थ सागितला. लोपो म्हणजे धर्माधिकारी!

एकीकडे डोळ्यानी जम्मूकाश्मिर पहात होतो, तर दुसरीकडे धष्टपुष्ट धर्माधिकाऱ्याच्या तोडून लडाख ऐकत होतो असेच पहाड, त्यावरून वळतवळत गेलेले रस्ते, तळातून इथे खळाळत चिनाब वहा-तेय, तिथे सिंधु उण्यापुऱ्या लाखभर वस्तीचा दोन जिल्ह्याचा विभाग लेह आणि कारगील कारगील मुस्लिम बहुसख्याक, लेह बौद्ध लडाखच हे राज्य प्रथम वेगळ होत ४७' नतर भारतसरकारनं लडाखी राजाला भारतात विलीन होण्याची विनती केली. ती त्यान मानली स्तोवदन म्हणतो 'अशा रीतीन आम्ही भारतीय बनलो हे आमच सुदैव मानाला हव.' आम्ही भारतीय बनलो ही शब्दरचनाच गमतशीर आहे. त्यातूनच हे सुदैव म्हणणारा तरणाबाड जवान सीमावर्ती भागात भेटावा हे भारताच सुदैव आहे वाहत्या चिनाबसारखाच स्तोवदन खळाळत बोलत होता लेहची वस्ती, कष्टाळू बौद्ध, नवीन रस्ते आणि उद्योग, वाढीला लागलेला पर्यटनव्यवसाय, ट्रेकिंग, स्कीइग आइस हॉर्न, हा जिल्हासुद्धा मुस्लिम बहुसख्य करण्याचे काश्मिर सरकारचे पद्धतशीर प्रयत्न, भारतीय लष्कराची वागणूक, शिस्त, काश्मिरच्या तुलनेत जम्मू आणि लडाखला मिळत असलेली सापत्नभावाची वागणूक, गाडीबरोबरच रोरावत, वळण घेत घेत स्तोवदनच्या गप्पा उचीवर जाऊन पोचल्या तिथून इकडे-तिकडे दूरवरचा प्रदेश, पर्वतशिखराचे माथे छायाचित्रात मावणार नाही एवढ्या सौंदर्यानिशी सज्ज होते त्याच्यासोबत स्तोवदनला मागली अनेक शतक दिसू लागली.

९ व्या शतकापूर्वीचा लडाखचा इतिहास अज्ञात आहे म्हणजे टोळ्याटोळ्याची आदिवासी राज्य असावीत ९ व्या शतकाच्या प्रारभी (म्हणजे एका मतानुसार आद्य शकराचार्यांच्या काळात) बौद्धधर्म लडाखमध्ये पसरला त्यासोबत पाली भाषासुद्धा आली. ही हीनयान बौद्धधर्माची एखादी पथाशी जवळीक सागणारी शाखा होती. तिथून बौद्धधर्म तिबेटमध्येसुद्धा दरवळत पोचला. तेराव्या-चौदाव्या शतकात तुर्की आक्रमणानी बौद्धधर्म लडाखमधून उध्वस्त झाला आणि पधराव्या शतकात तिबेटमधून परत लडाखमध्ये प्रवेशला. अशा रीतीनं तिबेटन शतकानुशतकाच धर्मऋण सव्याज फेडल अजूनही लडाखमध्ये विविध बौद्ध - उपासनापद्धती जिवत आहेत पाली भाषेतले मूळ धर्मग्रथही सापडतात. स्तोवदनचे आजोबा धर्म-गुरू आहेत, त्याना पुष्कळ माहिती आहे त्यान एकदम विचारल, 'तू नॉस्ट्रडॅमस्‌विषयी वाचल आहेस का?' पधराव्या शतकात 'सेंच्युरीज्' मारणारा हा फ्रेंच ज्योतिषी.

बेटा नॉस्ट्रडॅमस् सध्या अखिल भारतीय कीर्ती मिळवून राहिलाय. आपल्या भविष्यामध्ये तो विसाव्या शतकातल्या अतर्क्य हिंदु पुनरुत्थानाविषयी, विश्वविजयाविषयी सागतो. (अस 'आर्गनायझर'च म्हणण आहे.) पण 'तू नॉस्ट्रडॅमस् वाचलास का?' हा प्रश्न मला तरी काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत भेटला. मला तर शका वाटतेय की त्याचं नाव आता सघाच्या प्रातःस्मरणात दाखल होईल! त्याच्या प्रश्नाला मी 'वाचलाय' अस उत्तर दिल्यावर एकदम रगात येऊन त्यान याच भविष्याशी जवळीक सागणारी बौद्ध ग्रथामधली भविष्य सागितली. म्हटला, 'माझ्या घरी मूळ प्रती आहेत येतोस का दाखवतो तुला त्यान विचारल, 'तुझा विश्वास आहे का यावर?'

## गुरुद्वारातले एक प्रवचन

काय सांगणार त्याच्या प्रश्नावर? बटोटला गुरुद्वारासमोर आमच्याबरोबर नॉस्ट्रडॅमस् हवा होता आपल्या भविष्याच्या खरे-पणाविषयी तो काळजीत पडला असता. पहाडाची पहिली पर्वत-मालिका ओलांडून बस पुन्हा तळात उतरते ती बटोट नावाच्या गावी. प्रवासीमार्गावर बसलेलं कोणतही गाव असतं तसं हे बटोट रस्त्याच्या दोन्ही कडेला पुष्कळ अंतरापर्यंत पंजाबी ढाबे पसरलेले बस थांबली तिथंच समोर गुरुद्वार होता. दुपारची वेळ गुरुद्वारातल्या ध्वनिवर्धकावरून 'प्रवचन' चालू होतं. सुवर्णमंदिरावर भारतानं हल्ला केला...शेकडो शीख शहीद झाले. आमचं स्वातंत्र्य धोक्यात आलेलं आहे शिखांनी भारतासाठी एवढी कुर्बानी केली, पण गुलामीतून आम्ही अजून मुक्त झालेले नाही. आता झाल्या प्रकाराचा पुरा सूड उगवेपर्यंत आम्ही थांबणार नाही आमचं स्वातंत्र्य मिळ-वूच...ऐकत लोक उभे होते चिडीचिप्प त्यात शीख सैनिकसुद्धा बस निघण्याचा हॉर्न वाजल्यावर नि श्वास टाकत नागरिक स्थानापन्न झाले

बटोटबरोबरच गप्पांचे इतर विषय मागे पडले स्तोबदन सांगत होता—अतिरेकी शिखांचे तळ अजूनही काश्मिरमध्ये आहेत. विमान हायजॅक करणाऱ्यांचा प्रमुख......हर्मिंदरसिंग तर जम्मूचाच. स्तोबदनचा दोस्त तो त्याला 'पिंका' म्हणत असे पिंका अबोल, उत्तम खेळाडू होता. आता जम्मूत झालेल्या परीक्षांनासुद्धा अतिरेकी म्हणून कैदेत असलेले कित्येक शीख विद्यार्थी पोलीसपहाऱ्यात परीक्षेला येऊन बसत. 'आम्हाला वाटलं नव्हतं पिंका असलं काही करेल.' इति स्तोबदन आम्हालाही वाटलं नव्हतं शिखामधन असलं काही वादळ चेकाळून उठेल, पण उठलं. सोबतीला काश्मिरमधल्या सनातन फुटीर कारवाया होत्याच. आता त्याची हातमिळवणी झाली. श्रीनगरमध्ये शिरण्यापूर्वी सीमासुरक्षादल आणि लष्कर याच्या आखीव–रेखीव बरॅक्स लागल्या स्तोबदननं बोट दाखवून सांगितलं इथे आहे म्हणून काश्मिर भारतात आहे

पीरजजाल पर्वतमालिका पार करून काश्मिरखोऱ्यात उतरल्या-वर किती दूरवर पोचल्यासारखं किंवा 'भारत' दूरवर राहिल्याचं वाटत होतं. हजारो फूट उडत आभाळात शिरलेल्या पीरपंजालच्या पोटातून भारतीय अभियत्यानी खोदलेल्या दोन कि मी च्या 'जवा-हर टनेल न आणि ४८' च्या संग्रामानंतर केवळ वर्षभरातच बांध-लेल्या जम्मू–श्रीनगररस्त्यानं काश्मिर जोडून धरलेला. त्यापूर्वी श्रीनगरकडं सर्व रस्ते रावळपिंडीकडून जात असत ४८ मध्ये पाकी घुसखोर श्रीनगरच्या विमानतळापर्यंत पोचलेले ..भारतातून मदत पोचवायला तेवढं एकच माध्यम शिल्लक होतं. केवळ तीनशे सैनिका-निशी, अपुऱ्या साधनानिशी कॅप्टन सोमनाथ शर्माकडे कामगिरी आली, ती भारतातून मदत पोचेपर्यंत विमानतळ वाचवण्याची. सर्व दिशांनी घुसखोर घोंघावत होते. सतत दहा तास संघर्ष चालू होता, भारताची विमानं धावपट्टीवर उतरली, तेव्हा तीनशे जवानांसोबत सोमनाथ शर्माचं प्रेत हाती लागलं! जम्मू–श्रीनगर रस्ता इंजि-निअर्सनी नव्हे, कॅप्टन शर्मानं बांधला. त्यानं शिंपलेल्या रस्त्यावर इंजिनिअर्सनी डांबराची कारागिरी केली इतकंच श्रीनगरमधल्या त्या डांबरावर रीगल चौकात आता Indian dogs go back! असा चुना रगवलेला होता.

◻

श्रीनगर इसवीसनपूर्व तिसऱ्या शतकात अशोकानं वसवलेलं शहर. आता इतिहासतज्ज्ञामध्ये वाद चालू आहेत की, तो अशोक म्हणजे मौर्य घराण्यातला सम्राट, की हा कोणी वेगळा काश्मिरी राजा! प्रियदर्शी अशोक हाच सम्राट अशोक आहे का नाही यावर वाद चालू आहे. म्हणजेच 'अशोक' म्हणतात, ते दोन की तीन असा ऐतिहासिक वाद चालू आहे. शास्त्रशुद्ध अर्थानं ज्याला इतिहासग्रंथ म्हणता येईल असा 'राजतरंगिणी' ग्रंथ लिहिणारा काश्मिरी पंडित कल्हणसुद्धा या वादापुढं दिङ्मूढ आहे सांगण्याचा मूळ मुद्दा काय की, काश्मिरचा खरा सत्ताधीश कोण? असा वाद तिथे इतिहास-कालापासूनच चालू आहे. केन्द्राची थेट सत्ता की, स्थानिक अधि-पतीचं प्रांतिक राज्य हा संघर्षही त्याच वादाचं स्वरूप. नंतरच्या काळात इथे हिंदु, बौद्ध राज्यं होऊन गेली त्याचे काही अवशेष अजून कसेबसे तग धरून आहेत. तेराव्या–चौदाव्या शतकातल्या तुर्की आक्र-मणानंतरही केन्द्राशी संघर्ष चालू राहिला. काश्मिरच्या इतिहासातला एक रंगेल, पराक्रमी सुलतान युसुफशहा चक्र यानं अकबरला तीनदा खडे चारले. कोणी म्हणतात, फारुक अब्दुल्ला युसुफशहाचा अवतार आहेत! सरकार कोसळण्याच्या आदल्या रात्री फारुखसाहेब मोटर-सायकलवरनं स्मगलर्सचा पाठलाग करत सीमेपर्यंत पोचले होते. नॅश-नल कॉन्फरन्सचा शाहगट त्याचा उल्लेख 'डिस्को मुख्यमंत्री' असा करतो. केन्द्राशी चालू असलेल्या संघर्षात आपणच जिंकणार असा फारुखसाहेबाचा ठाम विश्वास आहे तोच त्यानी मुलाखतीत व्यक्त केला श्रीनगरमधली फारुख अब्दुल्लाची मुलाखत ही एक खास दास्तान आहे. तिच्या सर्व अदासहित ती पेश करायला हवी.

## जिसकी सरकार उसके साथ

सकाळी घरातनं बाहेर पडलो. दिल्लीत फारुख अब्दुल्लानी सांगि-तलं होतं की, श्रीनगरमध्ये घरीच ये आणि सुभाष किरवेकरानी सांगितलं होतं आमचे तिथले विशेष वार्ताहर श्री डेठे यांना भेट, मराठीच माणूस आहे. अरुण शौरीनीही काही पत्ते दिले होते. काय करावं? आधी आर्यसमाजमंदिर आणि निरंकारीभवन पहावं. जूनमध्ये लष्करी कारवाई आणि जुलैत फारुख सरकारपतन या दोन्ही वेळी श्रीनगरमध्ये दंगली उसळल्या होत्या. त्या वेळी ही दोन ठिकाणे हल्ल्याची मुख्य लक्ष्य होती म्हणून म्हटलं एकदा डोळ्या-नीच पहावीत. निरंकारीभवनपाशी गेलो. काळीठिक्कर वास्तू विटांच्या ढिगाऱ्यात उभी होती दारात पूर्ण जळालेल्या एका बसचा सांगाडा धुरकटलेला होता. भोवती सर्वत्र माती, विटा, अर्धवट जळकी लाकडं याचा खच पडलेला होता आसपास चिटपाखरू नव्हतं. वास्तूत आत शिरलो, लोखंडी खांबावर काजळी साठली होती. त्या-वरून हात फिरवला तर चिरकणारा आवाज वास्तूभर घुमत होता. मध्यभागी हॉल असावा, त्यावरचं छप्पर उडून गेलेलं, तुळया जळ-लेल्या. वेड्यावाकड्या खांबाची सावली पसरलेली होती. वरून काही किरणं खाली धुरळ्यावर विखुरलेले होते. मध्यभागी उभं राहताना गुरुदत्तच्या चित्रपटातल्या उदास दृश्यात उभं असल्यासारखं वाटत होतं. दरवाज्यावरची लोखंडी चौकटीच्या शिरोभागी 'तूही निरंकार' अशी पाटी मात्र शिल्लक होती. दंगलखोरानी कार्यभाग अचूक कार्य-क्षमतेनं पार पाडलेला होता. आर्यसमाजमंदिराची अवस्था अशीच.

शेजारीच आर्यसमाजी शाळा होती. तिचं लाकूडकाम मात्र नवीन दिसत होत. शाळेचे दरवाजे कडेकोट बद होते. माणसाच कुठं चिन्हं नव्हत आत कोणी असेल का असं रस्त्यावरच्या तीनचार जणाना विचारल तर त्यानी झटकून टाकल आसपासच्या दुकानामध्ये जरा बोलायचा प्रयत्न केला, तर ब्रेड बाधून देता देता एका सरदार बेकरीवाल्यान सागितल, 'यहाँ के लोग जिसकी सरकार है, उसके साथ हो जाते है।' पण दंगलीचा हा प्रकार शाहसरकारच्या आधी सुमारे महिन्याभरातला. त्यानतर म्हणे आर्यसमाजमदिर पुन्हा दाधायला मदत मागण्यासाठी कार्यकर्ते फारुखसाहेबाकडे गेले होते. तेव्हा त्यानी उत्तर दिल, 'इथल्या जनतेला नको आहे तर कशाला बाधताय ते मदिर पुन्हा?' ते अजून तसच पडलेल्या अवस्थेत होते. नतर श्री. डेढेनी आणि एकदोघानी हाच प्रसग पुन्हा सागितला.

आपण आपल्या कुवतीनुसार घास घ्यावा म्हणून एकदम डॉ. फारुक अब्दुल्लाकडे जायच्या आधी श्री. डेढेच्या घराची बेल, तीसुद्धा बिचकतच वाजवली. दार उघडल्यावर मराठीतून ओळख सागितली तर इग्लिशमधून उत्तर आल, 'आत या ना अन् मला माफ करा ह, मला मराठी समजत, पण बोलता येत नाही.' त्याच्या मागच्या दोन पिढ्या कराचीत वाढल्या. फाळणीच्या काळात ते भारतात आले गेली पाच वर्षे हा मध्यम उचीचा, मध्यम बाध्याचा बेदरकार जॉली माणूस टाइम्स ऑफ इडियाचा विशेष वार्ताहर आहे. डाव्या हाताच्या बोटात कायम सिगरेट. कोचवर टेकता टेकताच त्यानी विचारलं, काम काय? मी सागितल, किस किससे मिलना है! आगाऊपणा करूनच फारुक, जीराम शाह, जगमोहन, मीखास, मुफ्ती, मौलावी अन्सारी अशी नाव सागितली. खटक्यात उत्तर आल, सबको मिला देगे त्यानी फोन फिरवायला सुरुवात केली. घरात वरच्या मजल्यावर डिस्कोसगीताचा ठणठणाट चालू होता. त्याच्या तालावर बूट आपटत डेढेजी फोनवरून बोलत होते. व्यवस्थित सजवलेल्या खोलीत पुस्तकं अस्ताव्यस्त पडलेली होती. त्यात चार्लस् डिकन्स, जर्मनीचा इतिहास, काश्मिरचा इतिहास, महाराजा गुलाबसिगच चरित्र, फ्रिट्जॉफ् केद्राची विज्ञान आणि अध्यात्मावरची पुस्तक होती. भिंतीवर एक वाक्य चिटकवल होत. God bless this lousy appartment फोन खाली ठेवून एक गिरकी घेत डेढेनी सागितल, फारुकने बुलाया है, फौरन जाओ. आधी तू सगळ्या नेत्याना भेट. फारुककडे जाऊन येईपर्यंत मी इतर वेळा फिक्स करतो. नतर सर्वात शेवटी आपण चर्चा करू. आधीच बोलून तुझी मतं पूर्वग्रहदूषित व्हायला नकोत. आपल्या व्हिजिटिंग कार्डवर त्यानी माझ आणि ताहिर मुदस्सर याचं नाव लिहून सागितल याना भेट, ते फारुकशी गाठ घालून देतील.

पटकन् मुजाहिदमजिलकडे निघालो. वाटेत रस्त्यावर सीमासुरक्षादलाचे पहारे चालू होते चौकाचौकात हेलमेट घालून लाठ्या आणि बाबूच्या जाळीदार ढाली घेऊन सुरक्षासैनिक तैनात होते. क्वचित नॅशनल कॉन्फरन्सची पोस्टर्स दिसत होती. त्यावर शेखसाहेब फारुक आणि सिंह–कॉन्फरन्सचं निवडणूकचिन्ह रगवलेलं असायच. नियमित वेळापत्रकासारख्या लष्करी गाड्याही रस्त्यावरून ये–जा करत होत्या. त्यातून मशिनगन आणि जवानाच हेलमेट डोकावत असायच. दोन दिवस सतत हे दृश्य पहायला मिळत होतं. दिल्लीपासून एका प्रश्नाचा शोध घ्यायचा प्रयत्न करत होतो. १९५३ मध्ये शेखसाहेबाना अटक केली तेव्हा उभ काश्मिरखोर भडकल होतं. आत्ताची स्थिती तशी आहे का? हो, तशी नव्हे त्याहून वाईट आहे असं फारुक समर्थक ठासून सागत होते, तर दोन्ही प्रसग पाहिलेले पत्रकार सागत होते की, तशी हवा नाही, काश्मिरी जनमानसात फारुकना शेखसाहेबाएवढे स्थान नाही; पण खर उत्तर या लष्करी–अर्धलष्करी भारी उपस्थितीखाली दडपल गेल होत. नेमक कळायला मार्ग नव्हता.

## मुजाहिद–मंजिल

मुजाहिदमजिल शांतच होती. मुजाहिदमजिल म्हणजे नॅशनल कॉन्फरन्सच मुख्य कार्यालय. सदाशिवपेठेतला वाटावा असा जुना दुमजली कौलारू वाडा. खालेदा गटान त्यावर दावा सागितला नव्हता. त्यात्र म्हणण 'किरकोळ मुद्द्यावर भाडायची आमची इच्छा नाही' त्याला फारुकगटाच उत्तर–'खालेदागट हा फुटीर गट आहे, त्याचा गट नॅशनल कॉन्फरन्स नाहीच' म्हणून मुजाहिदमजिल फारुकगटाकडे दारात मोठ्या पोस्टरवर पजा उभारलेल्या सिहाच्या साक्षीन शेखसाहेब आपल्या साहेबजाद्याना आशीर्वाद देतायत. शेजारी लाल रगावर मध्यभागी नागर धारण करणारा कॉन्फरन्सध्वज फडकत होता. कार्यकर्त्यांची तुरळक आवकजावक चालू होती. फारशी गर्दी नव्हती. पहिल्या मजल्यावर विचारल ताहिर मुदस्तरसाब कुठे भेटतील? वर, वर विचारल माहीत नाही दुसऱ्या एकान खोलीच दार उघडल, 'हे ताहिर मुदस्सर' ताहिर मुदस्सर हे काश्मिरमधले सुप्रसिद्ध पत्रकार, लेखक. फारुक अब्दुल्लाचे जनसपर्कप्रमुख. नुकत्याच सत्ताबदलानतर फारुकना पाठिंबा देण्याबद्दल त्रासही त्यानं भोगावा लागला हसून त्यानी बसायला सागितलं ओळखपत्र वगैरे विचारल. सपूर्ण दौऱ्यातला हा एकमेव प्रसग. दाखवल. पाढऱ्याशुभ्र वेशातला, अर्ध टक्कल पडलेला, काळ्या काड्याचा, बुद्धिवादी वाटणाऱ्या चष्मा घातलेल्या गोल चेहऱ्याच्या या गोऱ्यापान माणसाच नाव श्रीयुत वासुदेव विष्णु पटवर्धन आहे असं सागितल असत तरी मी विश्वास ठेवला असता. त्यानी बोटाला धरून फारुकसाहेबाच्या खोलीत नेल सदाशिवपेठेतल्या जुन्या वाड्यातून प्रभातरोडवरच्या नव्या बगल्यात शिरल्यासारख वाटल. अशी पॉश खोली होती. खोली कसली हॉलच तो दारापाशी पुन्हा बाप–लेकाच्या तस्वीरी जय–विजयसारख्या लावलेल्या होत्या. भिंतीना टेकून असलेल्या खुर्च्यांवर पक्षसचिव शेख नजीर, कायदामत्री (माजो) प्यारेलाल हाडू आणि इतर काही जण. प्रत्येकाने आवर्जून ओळख करून घेतली आणि दिली. तोवर फारुकसाहेब आले. म्हणजे एक उच, स्मार्ट पठाणी ड्रेस आला. सगळा हॉल तटकन् उभा राहिला. खाली रस्त्यावर लोकाचा एक जत्था जयजयकार करत होता त्याला 'झरोकादर्शन' देऊन ते जागेवर बसले, दिल्लीत भेट झाल्याच त्याच्या लक्षात असलेल दिसल. म्हटले 'बोल? काय करू मी तुमच्यासाठी,' टेबलावरचा इडियन एक्सप्रेस उचलून वाचायला सुरुवात केली. समोर दारावर टकटक झाल्यावर दार उघडलं लोकाचा एक थवा सलाम आलेकूमसाठी आला होता. पेपर खाली टाकून डॉक्टरसाहेब त्याना सामोरे गेले पाया पडण,

शेकहँड करण, कपाळाच चुंबन घेण असे ज्याच्या त्याच्या वयानुसार आखलेले उपचार पार पडले मग फरुक पुन्हा जागेवर मी विचारल, 'पंजाबवरच्या तुमच्या कॉमेंटपासून सुरुवात करू या का ?' पेपर खाली ठेवून त्यानी 'अरेच्या, खरच की' केल, मग म्हटले, 'मी पहिल्यापासून सागत आलोय की हा सर्व इंदिराजीचा खेळ आहे !'

'मान्य, पण त्यामुळं देशविरोधी प्रवृत्तींना वाव मिळून राष्ट्रीय ऐक्य धोक्यात आलय...'

'त्याला इलाज काय ? आपण काय करणार? आता जर खालिस्तान होऊन देश तुटला तर त्याला इंदिराजी जबाबदार असतील !'

पुन्हा दार उघडल गेल हातात ब्रिफकेस घेऊन धापा टाकत एक कोवळा तरुण आत आला अश्विनीकुमार वाडीपूरचा कॉन्फरन्सचा कार्यकर्ता फारुकसाहेबाची भेट झाल्याचा आनद त्याच्या चेहऱ्यावरून ओसडून वाहात होता ताहिरसाहेबानी पाठ थोपटत सागितल, 'हा आपला वाडीपूरचा हीरो !' अश्विनीकुमारन तशाच धापा टाकत बोलायला सुरुवात केली, '२ जुलैनतर मी गावात सभा घेतली तो क्या हुवा कि मेरी कम्युनिटी के जो लोग थे सारे मेरे खिलाफ हुए। लेकिन मैंने भी कहा, रजपूत का खून है, पहले शेखसाहब के लिए काम करता था, अब फारुक के लिए करूँगा।' पेपर खाली टाकून डॉक्टरानी मला सागितल, 'सध्याकाळी तुम्ही घरीच या, निवातपणे बोलू, इथे अशीच गडबड चालणार !' अश्विनीकुमारला घेऊन ते आतल्या खोलीत गेले

सध्याकाळी घरी गेलो. दोन तास शेख नजीर, हाडू याच्याशी गप्पा मारल्या. फारुकसाहेबाचा पत्ता नव्हता. हाडूनी कळकळीनं सागितल, 'उद्या सकाळी ९–०० पूर्वी घरी या निश्चित भेटतील' गेलो, दुसऱ्या दिवशी सकाळी ८–३० ला. त्या दिवशी बसमधन जाताना सोनावारब्रिजचा स्टॉप सागितला आणि सीटवरच्या आजोबाना विनती केली की, स्टॉप आला की सागा. कुठे जायचय ? डॉक्टर फारुककडे. 'किसी अखबार के हो ? हाँ· तो बेशक लिखो बेटा, हम फारुक के सिवाय किसी और को नही चाहते।' आजोबा एकदम भावुक झाले इतना सा था तो मेरे हाथो से पानी पीता था। मिशन स्कूल मे था। दोपहर को खेलने का बाद रोज मुझे कहता था अब्बा, पानी पिलाओ। फिर बाद मे वो लदन चला गया। फारुकबद्दलच हेच प्रेम त्याच्या अनुयायातही आढळलं बंगल्यावरच्या गॅरेजवजा ऑफिसात अनुयायी जमलेले होते. डॉक्टरसाहेबाची वाट पहात होते. 'आता येतील' असं सागून मला बसवून घेतल गप्पाचा डाव टाकला. शेख नजीर, हाडू याच्या सवादातून फारुक अब्दुल्लाचा पक्ष माडलेलाच होता आज एका उच, बाधेसूद माणसानं अप्रतिम उर्दूत 'उस बेचारे की' बाजू मांडली. म्हणजे रंगात येऊन त्यान एक सुरेख व्याख्यानच दिल.

'मागच्या निवडणुकात इंदिरा, राजीव यानी हिंदूना चिथावलं कॉन्फरन्सचा ध्वज दाखवून सागितल इस को वोट दोगे तो पाकिस्तान को वोट दोगे जम्मू, राजौरी भागातल्या त्याच्या जातीयता भडकवणाऱ्या भाषणाच्या टेप्स आहेत. तालिब हुसेनन नतर त्या विधानसभेत पेश करायची परवानगीही मागितली होती. इस बेचारे ने उस को रोका, जे झाल ते गेल, आता भाडण नको.'

नेत्याचा एकारार्थी उल्लेख ही एक नवी स्टाइल आपल्याकडे येऊ घातलीय दिल्लीपासून अनेक नेत्याचे अरे–जारे उल्लेख ऐकत आलो होतो राजकीय नेत्याची मध्ययुगीन सरजामदारासारखी खिदमत करण्यापेक्षा त्याना अस एकारार्थी सबोधण स्वागतार्हंच मानायला हव, पण या कार्यकर्त्याची झेप त्याही पुढ होती तो फारुकचा उल्लेख सारखा 'एक बेचारा' असा करत होता

## शिया × सुन्नी, हिंदु × मुस्लिम

'इस बेचारे का दोष क्या ? पूर्वीच्या निवडणुकामध्ये नॅशनल कॉन्फरन्स आणि शेर–उल्–बक्र (म्हणजे अवामी अॅक्शन कमिटी मीरवाइझ मौलवी फारुक याचा पक्ष) एकमेकाविरुद्ध लढत ते शत्रुत्व यान मिटवल, तर काँग्रेसन शिया × सुन्नी, हिंदु × मुस्लिम भेद भडकवायचा प्रयत्न केला, पण इथे असा भेद कधीच नव्हता ४८' मध्ये पाक–घुसखोर अल्ला हो अकबर करत आमच्या दारात पोचले होते आम्ही मानल नाही मकबूल शेरवानी जिंदा जला मगर भारत के साथ गद्दारी नही की। हे जातीय ऐक्य ही शेखसाहेबाची देणगी आहे १९६५, ७१ मध्ये इथे मदिरावर झालेले हल्ले आम्ही अडवले. पडित समाजाला आम्ही वाचवलं याउलट १९४७ मध्ये इथल्या हिंदूना जम्मूत सुरक्षित पोचवायला ४९ मुसलमान टागेवाले गेले होते, तर त्यातले ४८ मारले गेले एक जिवंत परतला, तर त्याला शेखसाहेबानी अनंतनागलाच अटकेत टाकल त्यान ही बातमी फोडून दगाफसाद माजू नये आणि भारतात ? अजूनही मुसलमानाना त्रास होतो तुमच्या भिवडीला बघा काय झाल ? तुमचं सरकार मुद्दाम गप्प बसतं !'

'झडीबल प्रसगाबद्दल काय म्हणाल ?' मागल्या वर्षी निवडणुकानतर झडीबल इथे शिया विरुद्ध सुन्नी दगल झाली होती

'फारुकन स्वत. फौरन जाऊन ती दगल रोखली.'

'आणि ती क्रिकेट मॅच ?'

'उसमे कुछ हुआही नही. तुम्हाला T. V. वरून दाखवले ते झेडे पाकिस्तानचे नव्हतेच आणि पाकिस्तानचे झेडे धरणारे काग्रेसी होते. आम्हाला मुद्दाम बदनाम करण्यासाठीच हे षडयत्र होत !'

'पण आम्ही तर वाचल जमात–ए–इस्लामचा हा कारभार होता म्हणून ?'

'सच; पण त्याना फारुकनं लगेच तुरुगात टाकल.'

'३७० आणि पुनर्वसन कायदा...'

प्रश्न पुरा व्हायच्या आतच उत्तरार्थ व्याख्यान आल, 'उससे कुछ नही होगा. विसा भारत सरकारनच द्यायचाय. मग पुनर्वसनकायद्याच्या आडून पाकिस्तानी हेर भारतात येतीलच कसे ? शस्त्रास्त्र येतीलच कशी ? शिवाय सीमेवर सैन्य कोणाच आहे ? भारताचच ना ? अहो, ही फुकट नॅशनल कॉन्फरन्सला झोडपायची काठी म्हणून इंदिरा वापरतेय. पूछो क्यो ? कारण मागच्या निवडणुकात फारुकन काँग्रेसशी समझौता केला नाही. निवडणुकीत जबरदस्त लढाई झाली; पण नतर लगेच फारुकन बाईंना विनती केली, झाल गेल विसरून जा ! लेकिन उसने एक नही मानी. सहा महिने हा बेचारा बाईंची भेट मागत होता. त्यानी दिली नाही. यान फुलं भेट पाठवली. बाईंनी ती परत केली. शेवटी मुख्यमत्र्याच्या बैठकीत फारुकन सागितल की, तुमच्या वागण्यावरून वाटतं की, आप पतप्रधान देशकी

नही कॉंग्रेसकी है और undre state relations सिर्फ आपको कायम करने के लिए बनाए गए है। तुम्हाला स्वतःचीच सत्ता हवीय. नाइलाजान याला विरोधी पक्षांशी हात मिळवावे लागले'

'शीख अतिरेक्याशी सधान असल्याच वोलल जात'

'अहो, बरोबर उलट आहे वाद मिटवायला यान सत भिंद्रानवालेची भेट घेतली पजाबात गडवड झाली तर काश्मिरचे प्राण कठाशी येतात आता किंमती केंद्रच्या वाढल्या होत्या जनतेन फारुककरता सगळ सहन केल सरकार कोसळल्यावरही फारुकन सागितल शात रहा, नाही तर मी तावडतोव राजीनामा देईन! म्हणून लोक शात राहिले शस्त्र घेऊन आर्मी, BSF आली. त्यानी आमची घर, कार्यालय उसकटलो, पण लोक शात राहिले जॉर्ज फर्नांडिस इथ आले होते ते लोकाची शातता पाहून आश्चर्यचकित झाले म्हटले, 'तुम्ही एवढ सहन कस करता? मो असतो तर न जाणे कोणत्या टोकाला गेलो असतो' केवळ फारुकच्या शब्दाखातर. अजूनही हा जातो तिथे हजारो लोक जमतात तर शाहसाहेब तिथे कर्फ्यू लावतात...

'... भारताशी आम्ही एकरूपच आहोत, पण राजनीतीका यही सिलसिला चलता रहा तो पिछले कई बरसोंकी मेहनत वेकार जाएगी। आम्ही लोकाना कुठवर आवरणार?'

'तुम्ही आता शाहसाहेबाचा उल्लेख केलात?'

'त्यात काय, त्याचं सरकार इदिरेच बाहुल आहे कधीपण उडेल! त्यातून तो माणूस तापट आहे. काय होईल की, एक दिवस कॉंग्रेस त्याला सागेल हा फॅन इथे नको तिथे ठेवा हा म्हणेल नाही, इथेच हवा बस, मग काय कॉंग्रेस पाठिंबा काढून घेईल ये गिर जाएगा।'

पुष्कळ वेळ गप्पा चालल्या, फारुकसाहेबाचा पत्ता नव्हता त्याच्या कार्यालयात शेखसाहेबाच्या तसविरीखाली एक वाक्य होत In the field of world policy I would dedicate this nation to the policy of a good neighbour या वाक्याचा अर्थ लावायचा प्रयत्न करण्यात बराच वेळ गेला. नतर वरून निरोप आला. मग वगल्याच्या लॉनवर जाऊन बसलो. तिथल्या एका तबूखाली फारुकसाहेबाचा ब्रेकफास्ट आणि बैठक चालू फारुक काही पाच मिनिटं एका जागी बसत नव्हते आज अगावर जिनची पॅंट आणि पिवळा टीशर्ट होता कार्यालयातला स्वयसेवक 'खास करके औरतोंमें उसेके बारेमें जजवा है' का म्हटल ते कळत होतं असा बराच वेळ गेल्यावर शेवटी फारुकसाहेबापाशी गेलो म्हटल, 'तुम्हाला बरीच काम दिसतायत, मी चलतो' एक शेवटचा प्रश्न — 'महाराष्ट्रातल्या आमच्या वाचकाना काय सागू?'

फारुकसाहेब उभे राहिले तेव्हा लक्षात आल की, काल त्याचे डोळे आपल्याला चचल वाटले होते त्यात फारस गैर नसावं चेहऱ्याच्या आकाराच्या मानानं डोळे बारीक आहेत, त्यामुळे काहीसे फसवेही वाटतात. त्यात आज थोडी उदासीही होती. डोळ्यात आणि आवाजातही. त्यानी म्हटले, 'जाऊन त्याना सागा की, माझ्याविरुद्धचा सर्व प्रचार खोटा आहे फारुक राष्ट्रविरोधी, विघटनवादी नाही. फुटीरवादी नाही!'

'ठीक आहे धन्यवाद! सागण्याच काम मी करतो. पटेल न पटेल लोक ठरवतील. तोवर तुमच्या दुसऱ्या दोस्ताला भेटून येतो. पूर्वी तो तुमचा राजकीय विरोधक होता मागल्या वर्षापासूनच तुमची दोस्ती जमलीय. नवीनवी दोस्ती अजूनही टिकून आहे. मीरवाझ मौलवी फारुक!

¤

वसमधन जाताना एक गंमत मुद्दामच करायची. स्टॉप नेमका कुठे आहे ते माहीत नसायच त्यामुळ आसपासच्या कोणाला तरी विचारावं लागायचं सरसकट सर्व वेळा मग ते चौकशी करायचे, नवीन आहात का, कोणाकडे जायचय वगैरे काही वेळा तर कोणी तरी आपणहूनच मदतीला पुढ यायचं अशा वेळी मी मुद्दामच सागायचो, डॉ फारुक किंवा मौलवी फारुक इ.. नतर चेहरे, नजरा काळजीपूर्वक निरखायला मजा यायची. कधी आसपासच्या सिटावरच्या माना झटकन् वळायच्या. कधी 'असेल कोणी तरी' असे चेहरे असायचे, कधी नजरेत दुरावा, द्वेष, तुच्छता किंवा वात्सल्य भरलेलं असायच त्यावरून मी ठरवायचो, ही वस नॅशनल कॉन्फरन्सची का कॉंग्रेसची का नागरिकाची? आता वसमधल्या एका कॉलेज-युवकान आपणहून सागितल—मी दाखवतो त्याच घर तुम्हाला.' मौलवीसाहब किसे मालूम नही? श्रीनगर शहरापासून जरा लाब, नगीनलेक पार केल्यावर, हजरतबालमशिदीच्या जवळ त्याचं घर. चुकून एक रस्ता आधी पुढे गेलो माळरानावर एक गुराखी पोर गुरं चारत होत. त्याला विचारल, मीरवाझ कुठे राहतात? कौन मीरवाझ? अरे भाई, मौलवी फारुकजी. एकदम त्या गुराख्यान विचारल, 'हॉं, वो जो अभी डॉक्टर फारुकके साथ है?' त्यान घर दाखवल त्यानुसार उच भिंतीच्या कुंपणाला असलेल्या भल्या लोखडी दाराच्या दिंडीदरवाज्यातून वाकत जात शिरलो. वाहेर गॅरेजवजा जागेत स्वागत—कक्ष होता ओळखदेख झाल्यावर, एकजण मौलवीसाहेबाना विचारायला बंगल्यात गेला. दुसऱ्याला मी विचारल, 'ती इतिहासप्रसिद्ध हजरतबालमशिद इथून जवळच आहे ना?' 'हॉं, क्यों, जाओगे वहॉं?' 'हो तर, जायच ना!' नीट निरखत त्यान विचारल, 'मुसलमान हो?' हॉं, मुसलमान हूँ, हिंदु हूँ, सबकुछ हूँ!' नाही तरी आतून निरोप येईपर्यंत गमत करायला वेळ होताच विचारल की, मशिदीत जाताना डोक्यावर काही तरी वस्त्र घ्यावं लागतं ना? तो म्हटला बिलकुल नही, हमारा मजहब ऐसी कोई मर्यादा नही सिखाता. बेशक जाइए आप. निरोप आला बोलावलय.

## मी जातीय नाही, धार्मिक आहे!

त्यानुसार आलिशान घराच्या मुलायम हिरवळीवरनं सकोचानं पावल टाकत मागच्या पोर्चमध्ये पोचलो डोगराच्या कुशीत नेमक्या वसलेल्या घराच्या कुशीत पलंगावर मौलवीजी आराम करत होते. डोळ्यावर गॉगल. कायम डोळ्यावर गॉगल घालणारा माणूस आपल्याला उगीचच असा वाटायला लावतो की, काही तरी पाणी मुरतंय खास, हा वरच हातच राखून वोलत असणार वगैरे. जीराम शहाचेही बरेच फोटो गॉगलवालेच होते (आणि उदाहरणार्थ MGR) फोटोत स्वच्छ डोळ्यांचं दर्शन झालं नाही तर, जरा चुकल्याचुकल्यासारखच होतं. मौलवीसाहेबाना पाचच मिनिटं होती नतर कुठ तरी लग्नाला जायचं होतं O. K. पाच मिनिटात संपवतो, 'डॉक्टर फारुकना पाठिंबा द्यायची कारण सागता का?' मौलवीसाहेब तसेच

आडवे पडलेले. सथ–क्वचित रटाळ वाटणाऱ्या आवाजात त्यानी बोलायला सुरुवात केली. ' फारुक कादिमरला चागल सरकार देईल. त्याची नॅशनल कॉन्फरन्स खरी आहे सामान्य जनतेचे प्रश्न सुटायला हवेत, यासाठी त्याची सगळी धोरण पसत नसून माझा पाठिबा आहे.'

' पण काश्मिरमधल्या सामान्य जनतेचे प्रश्न सुटायला सार्वमत घ्यायला हव, असा तुमचा आग्रह असतो ना ?'

' नाही सार्वमताची कल्पना मूळ शेखसाहेबाची स्वत ची हे गुलाम महमद शाहसाहेबच त्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. सार्वमताची मागणी माझ्या नावावर ढकलून उगीचच मी फुटीरतावादी आहे असा बागुल-बुवा उभा करण्यात येतो. मी पक्का राष्ट्रवादी आहे. इदिराजी किंवा झैलसिग हे जेवढे देशभक्त आहेत, तेवढाच मीही आहे मी लोक-शाहीचा पुरस्कर्ता आहे. काश्मिरात लोकशाहीला धोका निर्माण झालाय म्हणून मी डॉक्टर फारुकच्या बाजून.'

## कोण म्हणतं कम्युनल ?

' लोकशाहीला धोका जातीयतेमुळ, हिंसकतेमुळ निर्माण होतो ना ? पेपरात आम्ही वाचल की, भिवडीच्या दगलीची हिंसक प्रति-क्रिया श्रीनगरमध्ये उमटली होती. यावर तुमच मत काय ?'

आवाज अजून तसाच, बसका पसरट मूर्ती पलगावर आडवी. ' अस होण चूक आहे. भारतात जातीय सलोखा नादायला हवा. अन् जेव्हा सर्व जाती–पथ–धर्मभेद दूर होतील, तेव्हाच हे शक्य आहे, जेव्हा अल्पसख्याक मोकळेपणान, निर्भयतेन नादू शकतील, तेव्हा जातीय सलोखा प्रस्थापित होईल.'

' आता अल्पसख्याक मोकळेपणान नादत नाहीत का ?

' नाही. त्याना न्याय मिळत नाही, अशीच त्याची भावना आहे. मी भारतभर प्रवास करून हे मत बनवलय. आज मुसलमानाना आपण केवळ ' मताचा गठ्ठा ' आहोत, राजकीय कारणासाठी आप-ल्याला वापरल जात असच वाटत. मी या राजकारणाच्या विरुद्ध आहे. काश्मिर हा मुस्लिम बहुसख्याक प्रात आहे, तर इथ विघटन-वादी कारवाया चालतात या आरोपाखाली सरसकट सर्व मुलस-मानांची देशनिष्ठा सशयास्पद मानली जाते.

पाच मिनिटं सपत आली असावीत म्हणून मधल्या बऱ्याच पायऱ्या गाळत या प्रश्नापर्यंत पोचलो ' हमने पढा है कि मीर वाझ कम्युनल आदमी है '

तटकन मिरवाझ मौलवी फारुक उठून बसले. डोळ्यावरचा गॉगल काढला. आवाज चढवत म्हटले ' कौन कहता है मीरवाझ कम्युनल है?. Mir Waaz is communal, it means all muslims are communal. मीरवाझ को कम्युनल कहना पूरी मुस्लिम कम्युनिटी का अपमान है. तुम्ही एक तरी उदाहरण देऊ शकाल का? मी आग्रह धरतो की काश्मिरची आयडेंटिटी सुरक्षित हवी, हे जाती-यतेच निदर्शक ? की कलम ३७० कायम रहायला हव म्हणण्यात जातीयता आहे ? हे तर आम्हाला घटनेनच दिलेले हक्क आहेत.' आवाज चढलेला हातानी हवेत वर्तुळ, प्रश्नचिन्ह रेखली जात होती. गॉगल काढल्यावर हा तरुण, दाढी ट्रिम केलेला चेहरा जास्तच स्मार्ट दिसत होता आता तर सतापान चेहरा लालबुद झाला होता.

' मो जातीय नाही धार्मिक आहे मी माझा धर्म पाळण्यात, त्याचा प्रचार करण्यात गैर काय ? पण या राजकारण्याना प्रत्येक बाबीत त्याचा स्वार्थ दिसतो. म्हणून मीर वाझवर जातीयतेचा शिक्का बसतो माझ्या मागे लोक आहेत म्हणून हे स्वार्थी नेते माझ्याकडे येतात. त्याना वाटत मीर वाझ आपल्यामागे हवा; पण मीर वाझ कोणाच्याच मागे नाही मीर वाझ आहे भारताच्या, मानवतेच्या पाठीशी जातीय हित-सबधापेक्षा राष्ट्रहित महत्त्वाच आहे '

' मग राष्ट्रहितासाठी जातीय सलोखा प्रस्थापित करायला तुम्ही कोणता उपाय सुचवाल ?'

' मला माझा धर्म पाळू द्या, तुम्ही तुमचा पाळा खरी धर्मनिष्ठ व्यक्ती कधी जातीय असूच शकणार नाही मुसलमानामध्येच जर भारतभर ऐक्य प्रस्थापित झाल तर हिंदु–मुस्लिम सलोखा सहजपणे निर्माण होईल '

' काश्मिरमध्ये भारताविरोधी कारवाया चालतात हे तुम्ही नाका-राल का ?'

' हो, निश्चितच अशा कुठल्याही देशविरोधी कारवाया इथे चालत नाहीत काश्मिर भारतीय राष्ट्राशी एकदम मिसळून गेलय डॉ. शेखसाहेब आणि बक्षीसाहेब याच्या काळात मात्र अशा कारवाया चालत, पण मग त्याचा दोष आम्हाला देता कामा नये '

' क्रिकेटच्या सामन्यामध्ये...'

' काहीही घडल नाही. भारतीय खेळाडू वाईट खेळले लोकानी त्याची हुर्रे केली उगीचच त्याला भडक प्रसिद्धी देण्यात आली. कान-पुरातही क्रिकेटसामन्यात लोकानी खेळाडूची टवाळी केली. त्याला नाही कोणी म्हणत, देशविरोधी कारवाया ?'

' मकबूल बटला फाशी दिल्यावर इथ दगल झाली होती.'

' नाही. पेपरात चुकीच्या बातम्या आल्या होत्या. उलट तुमच्या इकडेच नुकतीच भिवडीत दगल झाली. त्यात मुस्लिमाची खूप हानी झाली अस आम्ही ऐकून आहोत' अस सागून मौलवीसाहेबानी बाळासाहेब ठाकरे कोण, शिवसेना काय आहे, असे प्रश्न विचारले. मग मुलाखतीचं रूपातर गप्पात झाल. घरातून चहा, बिस्किटं आली. पाच मिनिट तर कधीच होऊन गेली होती; पण मौलवी फारुक मुडात होते. गप्पाच्या ओघात मी ज्ञानप्रबोधिनीच्या पजाब सद्भाव यात्राविषयी सागितल्यावर त्यानी विचारल, ' भिद्रानवाल्याना भेटला होतास का ?' हसून त्यानी म्हटले ' हमको कश्मिर का भिंद्रानवाला कहते है। वो तो मर गया बेचारा। अब हम बचे है।' निघण्यापूर्वी मी विचारल ' ' तुमचा सक्षिप्त bio–data मिळेल का ?' घरातून त्यानी एक पुस्तिका मागवली. मागल्या वर्षी इकबालपार्कवर झालेल्या भाषणाची ती पुस्तिका होती. तिच शेवटचं पान त्यानी फाडून दिल Brief Life Sketch, मी पूर्ण पुस्तिकाच मागितली. काही आवश्यकता, उपयोग नाही अस उत्तर मिळाल ' सक्षिप्त आलेखा 'त जन्म, धर्माची सेवा, ' कुराण 'चा काश्मिरी अनुवाद, काही नियतकालिकाचा सपादक, या सर्वासोबतच आणखी माहिती होती–' मीर वाझ यानी १९६४ मध्ये अवामी ॲक्शन कमिटी स्थापन केली. काश्मिरच्या लोकाच्या लोकशाही हक्काच रक्षण करण हा या कमि-टीचा उद्देश होता.' ... त्याच्या पुढच एक वाक्य पेनन खोडून, पुस्तिकेतल ते पान फाडून त्यानी माझ्या हातात ठेवल. खोडलेल वाक्य होत...' विशेषत' काश्मिरी जनतेच्या स्वयनिर्णयाच्या हक्काचं रक्षण करणे...'

शेवटी मी विचारलं, 'काय सागून आपल्या मुलाखतीचा शेवट करणं तुम्हाला आवडेल ?'

'जाऊन तुमच्या लोकाना माझा सदेश द्या. म्हणाव, मीर वाझ भारतभक्त आहे. सर्व देश हे माझ कुटुब आहे सर्व धर्म समान आहेत. मी सर्व धर्माची कदर करतो; पण आपल्या धर्माच्या आधी देशाचा स्वीकार करा हिंदुस्थानबद्दल वफादार रहा.'

सध्याकाळ झाली होती हजरतबलमशिदीतून सुरेल वळणं घेत बांगेचे स्वर पहाडभर घुमत होते.

## पैसे कुठे जातात ?

दोन फारुकानी ही काय जबाबदारी शिरावर टाकली ! 'आम्ही हिंदुस्थानविरोधी नाही भारत या राष्ट्राचेच आम्ही पाईक आहोत.' अन् कॉंग्रेसचे नेते जी राम शाह, जगमोहन पुन्हा पुन्हा ठासून सागत होते. 'फारुक देशविरोधी कारवायामध्ये गुतलेले आहेत.' काश्मिर प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मुफ्ती महमद सईद म्हणतात, 'कॉंग्रेसचं आणि नॅशनल कॉन्फरन्सच मूळ तत्त्वज्ञान एकच आहे. निधर्मी राष्ट्रवादाच. फारुक अब्दुल्लाच्या नेतृत्वाखालील नॅशनल कॉन्फरन्सनं या तत्त्वज्ञानाशी फारकत घेऊन जातीय, फुटीर राजकारण सुरू केल म्हणून आम्ही त्याना खाली खेचल.' जवळजवळ हे असच उत्तर जी एम शहा यानी दिल. फक्त त्याच्या बोलण्यात आणखी एक नवीन मुद्दा होता की, काश्मिरच्या अर्थव्यवस्थेचा विचार करता केन्द्र सरकारशी सघर्ष घेण राज्यसरकारला परवडणारं नाही. फारुक याच्या सघर्षाच्या भूमिकेपायी काश्मिरची सपूर्ण अर्थव्यवस्था धोक्यात आली आहे, विकासकार्ये आर्थिक पाठबळाविना खोळबली आहेत. काश्मिरच्या राजकारणातल्या या आर्थिक अगाला राज्यपाल जगमोहन यानी इतकच महत्त्व दिल. ते म्हणाले, केन्द्र सरकार दरवर्षी काश्मिरमध्ये निखळ शभर कोटी रुपये ओतत. ते कुठे जातात ? काश्मिरमधल्या, बोटावर मोजता येतील इतक्या घराण्यामध्ये. हीच घराणी गडगज पैसे मिळवून राहिलीत आणि त्या पैशाच्या आधारावर त्याच राजकारण चालू असत. कौटुबिक वाद, सत्ताकारण आणि बागुलबुवाच्या रूपात फुटीरतावादाचा कौशल्यपूर्ण वापर हे सर्व या आर्थिक, राजकीय हितसबधामधूनच जन्माला येते. यावर उपाय काढायचा तर जगमोहन याच म्हणण काश्मिरच्या घटनेत, राजकीय यत्रणेतच मूलभूत बदल आवश्यक आहेत; पण तूर्त अस्तित्वात असलेल्या घटनेच्या चौकटीत मला जे करता येण शक्य होत ते मी केल. सगळ्या मुलाखतीमध्ये 'आवडला' या भाषेत कुणाच वर्णन करायच झालं तर मी जगमोहनच नाव घेईन. बाहेर शिव्याशापाचा वर्षाव होत असताना राजभवनात हा मध्यम उचीचा, गोरापान पजाबी गृहस्थ शात, खबीर, अभिनिवेशरहित दिसला, आमच्याशी अगदी मनमोकळेपणान बोलला; पण Do not quote me च्या खोड्यात अडकवून ठेवले. तो शब्द पाळायला हवा.

कॉंग्रेस लेजिस्लेचर पार्टीचे प्रतोद मौलाना इफ्तेकार हुसेन अन्सारी यानी मात्र अस अडकवल नाही. झडीबलच्या शिया–सुन्नी दंगली वृत्त सागून त्यानी खुले आम आरोप केला की, ही दगल घडवण्यात फारुकसाहेबाचा हात आहे. त्याची धोरणं शियाविरोधी आहेत. त्यामुळे मागच्या ८३ च्या निवडणुकीत काश्मिरखोऱ्यातलं १८% शिया वोट नॅशनल कॉन्फरन्सच्या विरोधी गेल. त्या आधारावरच मौलाना अन्सारी पट्टण मतदारसघातून निवडून आले. त्यापूर्वी कॉंग्रेसला काश्मिरखोऱ्यात कधीही एकसुद्धा सीट मिळाली नव्हती. यामुळे चिडून फारुकच्या सुन्नी अनुयायानी झडीबलच्या शियापथीयावर योजनाबद्ध हल्ला चढवला होता अस मौलाना अंसारीचं म्हणणं: तर कॉंग्रेसचे जम्मूभागाचे नेते श्री जनकराज गुप्ता याच्या बोलण्यात जम्मूभागाचे प्रश्न, त्याचे आर्थिक मागासलेपण आणि काश्मिर पुनर्वसनविधेयक हे मुद्दे होते. (त्याची ओळख करून देताना मला सामण्यात आलं की शाह यांच्याबरोबर तेरा आमदाराना सद्‌बुद्धीची प्रेरणा करणारे ते हेच श्री. जनकराज गुप्ता ! )

म्हणजे किती नाना तऱ्हाचे मुद्दे परस्पराना छेद घेत धावत होते. आर्थिक, सामाजिक, राजकीय त्यासोबत कौटुबिक आणि भौगोलिक सुद्धा; पण उभ्या आडव्या तिरक्या धावणाऱ्या सर्व विचाररेषा एका समान बिंदूतून जात होत्या. तो बिंदु म्हणजे 'राष्ट्रवाद.' म्हणून फारुक देशविरोधी आहे। नाही असा मुख्य परिसवाद काश्मिरमध्ये रगाला आला होता. सीमावर्ती प्रात, अल्पसख्याक वस्तीच बाहुल्य, राज्यघटनेचं वैशिष्ट्य या सर्वांमुळेच त्या परिसवादाचा परीघ केवळ काश्मिरपुरता मर्यादित राहू शकत नव्हता. सपूर्ण राष्ट्रीय अस्मितेच्या प्रश्नाच्या एका महत्त्वाच्या हिश्श्याचा कस तिथे पणाला लागल्यासारखा झाला होता. आहे. राष्ट्रवाद आणि लोकशाही ही आधुनिक जीवनाची दोन मूलभूत मूल्यं. त्यापैकी पहिल मूल्य पंजाब, काश्मिरमधल्या (आसामसुद्धा) घडामोडीमध्ये रणागणात आहे तर आध्र (त्याआधी सिक्कीम) घडामोडीनी दुसरं मूल्यही पणाला लावलंय. स्वातत्र्यपूर्व काळात राजकीय स्वातत्र्य की सामाजिक समता या बाबी मूलतः जशा परस्परविरोधी नव्हत्या तसच राष्ट्रवाद आणि लोकशाही ही मूल्य परस्परविरोधी नव्हेत, परस्पर पूरकच आहेत; पण कोणत्याही मूल्याचा प्रत्यक्ष आविष्कार कधी शब्दामधल्या वादातून होत नाही तर जनसमूहाच्या कृतीतून होतो.

म्हणून श्री डेढे याचा मुद्दा सर्वांत महत्त्वाचा. वास्तविक डेढेजी म्हणजे कोणी फार मोठा राजकीय पुढारी नव्हे; पण मोठ्या म्हणवल्या जाणाऱ्या राजकीय पुढाऱ्याचे मातीचे, घाणीन बरबटलेले पाय पाहून सतापान खदखदत असलेला हा एक बेछूट पत्रकार ठरल्याप्रमाणे सर्व नेत्याच्या भेटी पूर्ण झाल्यावर त्याना भेटायला गेलो. प्रत्येकाचे मुद्दे सागितले. त्यातल खरं–खोटं श्री डेढेंनी त्याच्या अनुभवासहित सागितल. त्याच्या धगधगत्या वाक्प्रवाहाच परवलीच वाक्य सब चोर हैं, इनके रगरगमें झूठ भरा है शेवटी मी विचारल सब चोर है तर एकाला पर्यायी दुसरा येऊन काहीच साधणार नाही. मग उपाय काय ? डेढेंनी त्याची तोफ तशीच धडाडत ठेवत सागितल– तळागाळातल्या जनतेला घेऊन एक सर्वंकष आदोलन उभ करा, और सब सालोको फेंक दो, हा तो जनसमूहाच्या कृतीतून अपेक्षित असलेला मूल्याचा आविष्कार; पण डेढेजी, शब्द सोपे आहेत, कृतीचं काय ?

□

पुस्तके

# साहित्याचे तत्त्वज्ञान

**साहित्यविषयक विचारांचा मार्मिक दृष्टीने परामर्ष घेणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ**

वि. शं. पारगावकर

**डॉ.** वि. ना. ढवळे यांचा 'साहित्याचे तत्त्वज्ञान' या नावाचा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. डॉ. ढवळे हे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध पावलेली एक अधिकारी व्यक्ती आहे. फर्गसन महाविद्यालयात असताना त्यांची इंग्रजी वाङ्मयावरील (वाङ्मय हा त्यांचा शब्द) व्याख्याने मन लावून, एकाग्र होऊन आणि त्यांच्या व्याख्यानांपासून स्फूर्ती घेऊन, वाङ्मयविषयक एक नवा दृष्टिकोन घेऊन बाहेर पडलेल्या अनेक पिढ्या आहेत. व्याख्याते म्हणून त्यांचा दबदबा मानणारे आणि त्यांच्यावर प्रेम करणारे आज किती तरी विद्यार्थी महाराष्ट्राबाहेर आहेत. त्यांचा इंग्रजी वाङ्मयावरचा अधिकार फार मोठा आहे.

परतु त्यांचे 'साहित्याचे तत्त्वज्ञान' हे पहिलेच लक्षवेधी पुस्तक वाचल्यावर एक पहिली गोष्ट लक्ष वेधून घेते ती ही की, त्यांचे साहित्यविषयक विचार हे केवळ इंग्रजी वाङ्मयापुरतेच मर्यादित नाहीत. त्यांचे वाचन चौफेर आहे. तसेच इतर विषयांचे त्यांचे वाचन केवळ चौफेर नाही तर फार खोल आहे आणि तेवढेच ते मर्मग्राही आहे. शिवाय ते जेवढे मर्मग्राही आहे तेवढेच ते सूक्ष्म आणि विश्लेषणात्मक आहे. याचा प्रत्यय त्यांच्या या ग्रंथातून ठायीठायी येतो. इंग्रजी वाङ्मयाइतकाच त्यांचा मराठी आणि संस्कृत वाङ्मयावरील अभ्यास अधिकारपूर्ण आहे. 'ललित' हा शब्द त्यांच्या 'साहित्याचे तत्त्वज्ञान' या ग्रंथात फारसा आलेला नसला आणि 'साहित्य' हा शब्दही फार कमी प्रमाणात आलेला असला तरी 'ललित साहित्याचा' त्यांच्या अभ्यासात त्यांचा अधिकारही फार मोठा आहे. तसेच साहित्याची समीक्षा, इंग्रजी, मराठी आणि संस्कृत या विषयांवरील त्यांचे विचार जेवढे डोळस आहेत तेवढेच ते सावधही आहेत. तसेच 'साहित्याचे तत्त्वज्ञान' या ग्रंथामधून त्यांचे जे विचार व्यक्त झालेले आहेत ते साहित्यविषयक, समीक्षाविषयक, कलाविषयक, सौंदर्यविषयक, तत्त्वज्ञानविषयक, नव्या–जुन्या मानसशास्त्रविषयक प्रस्थापित दृष्टिकोण मांडणारे असले तरी त्यांचा स्वतःचा साहित्यविषयक आणि निरनिराळ्या कलांविषयक दृष्टिकोन कोठेही मोठ्या हिरीरीने आणि आग्रहाने व्यक्त न करण्याची सावधगिरी बाळगताना दिसतात.

अगदी मर्ढेकरांच्या 'सौंदर्यविषयक उपपत्तीचे जरी ते विश्लेषण करतात (पृष्ठ–११३) आणि रिचर्डजच्या सौंदर्यविषयक उपपत्तीची ते तुलना करतात. तेव्हा देखील ते रिचर्डजविषयी 'एका वाक्यात एवढेच म्हणतात, 'मात्र रिचर्डजची उपपत्ती जास्त तर्कनिष्ठ (LOGICAL) वाटते आणि पुढे जाऊन ते असेही कबूल करतात की, 'रिचर्डजच्या मतांवर अनेकांनी वेगवेगळ्या कारणांनी टीका केलेली आहे. त्यातील मुख्य आक्षेप म्हणजे 'मन' हे केवळ 'मेंदू आणि मज्जासंस्था' असे मानण्याला पुरेसा (निदान त्या वेळेला तरी) पुरावा नसताना त्या पायावर बांधलेली कलेची इमारत व त्याच मानसशास्त्रावर आधारित भाषेचे विश्लेषण. रिचर्डजने आपली मते पुढे पुष्कळच बदलली व आधीचे लेखन पुष्कळसे विनाकारण ऐकांतिक होते हे मान्य करून त्यात पुष्कळ दुरुस्त्या सुचविल्या हेही लक्षात ठेवले पाहिजे.

पुढे (त्याच ११५) पानावर ते लिहितात, मर्ढेकरांची स्वतःचीच उपपत्ती बरीचशी रिचर्डज व इतर लेखक यांच्या मतांवर ('तां' वरील अनुस्वार माझा) विसंबून मांडलेली दिसते; पण रिचर्डज व मर्ढेकर या दोघांचाही (सौंदर्यानुभवविषयक) मते खरोखर क्रांतिकारक नाहीत. कंसामधील शब्द माझे.

## साहित्यातील लयतत्त्व

साहित्याच्या प्रक्रियेचा, स्वभावाचा, त्याच्या रूपाचा, त्यामधील आशयाचा आणि त्या आशयाच्या अनुषंगाने येणाऱ्या समाजविषयक प्रश्नांचा (म्हणजे साहित्याच्या हेतूचा) ते साकल्याने विचार मांडताना दिसतात. त्यामध्ये ध्वनि, वर्ण, शब्द, शब्दपंक्ती आणि भाषेसंबंधीही त्यांनी विचार मांडलेले आहेत; पण असे विचार मांडीत असताना ते निरनिराळ्या पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विद्वानांच्या विचारांचा परामर्श घेत–घेतच पुढे जाताना दिसतात; परंतु याचा अर्थ असा नाही की, ते आपले स्वतःचे म्हणून काही विचारच मांडीत नाहीत, परंतु त्यांच्या अशा प्रकारचे विचार मांडण्याचे स्वरूप काय असते ते मी वर विशद केलेलेच आहे. मी वर एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे डॉ. ढवळे निरनिराळ्या तत्त्वविचारांचा परामर्श घेत असताना स्वतःची मते हिरीरीने किंवा आग्रहाने मांडीत नसले तरी त्यांची मते ते व्यक्त करीतच असतात व कित्येक ठिकाणी स्वतःचा दृष्टिकोणही व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतात; परंतु त्याचे स्वरूप पौर्णिमेच्या चांदण्यातून निरनिराळ्या रंगांची नाजूक फुले वेचण्यासारखे असते.

मर्ढेकरांच्या लयतत्त्वाच्या संकल्पनेचा ते जेव्हा अधिक विचार आणि विस्तार करतात तेव्हा ते म्हणतात, 'ज्या कलेत माध्यम अगदी 'मूर्त' असेल– उदा. रंग, दगड, धातू–Plaster of Paris वगैरे– तेथे अगदी काटेकोरपणे समतोल पाळणे शक्य होईल. प्रमाणबद्धता (Symmetry) साधून अगदी बांधेसूद कलाकृती निर्माण होऊ शकेल.' परंतु लगेच पुढे ते असेही म्हणतात की,

१ (मात्र केवळ ' Symmetry 'मुळे नेहमीच सौदर्यनिर्मिती होते का यावद्दल मतभेद होणारच ) पण साहित्यात ' भाषा ' माध्यम असल्याने लय कसा ठरवायचा हा मुख्य प्रश्न येतो ध्वनीमुळे भाषेत लयबद्धरचना फार सोपीही होऊ शकेल उच्चारसाम्या-मुळे, उच्चारांच्या पुनरावृत्तीमुळे लय निर्माण होईल असा लय सस्कृत व मराठी या भाषातील वाङमयात पुष्कळदा दिसतो, (एडमड बर्कची भाषणे, सावरकराची भाषणे आणि ज्या भाषणामुळे मूळ भाषणा-तील अर्थ गुदमरून गेलेला असतो अशी शिवाजीराव भोसले यांची भाषणे. या गद्य वाङमयामधूनही लयाचा प्रत्यय येतो ) कसा-मधील विधाने माझी व पुष्कळाना तो त्याज्य वाटतो. '

ज्या शब्दामुळे लय निर्माण होतो असे मर्ढेकर मानतात ते शब्द प्रसरणशील अस-तात तरीही साहित्यात सौदर्यनिर्मितीसाठी त्याचे अर्थ निश्चित करावे लागतात. एवढेच नव्हे तर एकाच अर्थाचे दोन किंवा त्या-पेक्षाही अधिक शब्दाची योजना करून लय निर्माण करावा लागतो आणि असे करीत असताना इतरही किती तरी गोष्टीचे अव-धान ठेवावे लागते हे माझ्यासारख्या इतरही सर्जनशील लेखकाचे मत असणे शक्य आहे. मात्र पुढे ( पान ११३ ) वर डॉ. ढवळे म्हणतात तेही खरे आहे, ' पण ' सौदर्य ' हे केवळ सवाद–विरोध–समतोल या लया-वरच अवलबून आहे असे सिद्ध करणे कठीण आहे ' केवळ लयनिर्मिती आणि लयातून साधला जाणारा समतोल हेच साहित्यातील सौंदर्यनिर्मितीचे एकमेव साधन होऊ शकत नाही. गणपतीच्या मिरवणुकीसमोर ढोल वडवणारे ढोलकी ध्वनिनिर्मितीच्या साह्याने 'सवाद–विरोध आणि समतोल' लय निर्माण करीत असतात; पण त्यामधून सौदर्यनिर्मिती होत नाही हे सर्वांनाच माहीत आहे !

भाषेमधून लयनिर्मिती करता येते, एवढेच फार तर त्याविषयी म्हणता येईल भाषेचे माध्यम असलेल्या, साहित्यकृतीमधून, विशे-षत. कथा – कादबऱ्यामधून अशा लयाचे तात्काळ दर्शन होऊन, सौदर्यानुभव येणे तर फारच कठीण. ' रामायण ' ' महाभारता '-सारखी प्राचीन कथानक–प्रधान काव्ये वाचून तर लयाची प्रचीती घेणे फार कठीण आहे इतकच नव्हे तर, अलीकडच्या आधुनिक काळातील पाच-पाचशे, सात-सातशे पानाच्या कादबऱ्यामधून देखील लयाचा समग्रपणे आणि तात्काळ साक्षात्कार होणेदेखील शक्य नसते. टॉलस्टायची ' वॉर अँण्ड पीस ' किंवा हरिभाऊ आपटयाच्या कादंबऱ्या त्यासाठी उदाहरणादाखल घेता येतील

त्यामुळे मर्ढेकराच्या लयतत्त्वाचा समा-चार घेताना, डॉ ढवळे म्हणतात तेच खरे. साहित्यकृतीचे 'भाषातर वाचून होमर किंवा व्हर्जिल, डँटी किंवा रासीन् याचा ध्वनियुक्त लय तर समजत नाहीच; पण 'आर्थिक' ( साहित्यामधून व्यक्त होणारा अर्थ · कंसा-तील वाक्य माझे ) लय तरी अगदी तंतो-तत समजतो का? प्रत्येक ठिकाणी लय-निर्मिती मर्ढेकराच्या वर्णनात दर्शविलेली– अशक्य व अनावश्यक आहे. '

## हेतू आणि परिणाम

कथा–कादंबऱ्यामधून जे कथानक येते, ते कथानक भाषेच्या माध्यमामधून येते म्हणजे भाषा त्या कथानकामधून आपला गुणधर्म आणि प्रभाव याचे मिश्रण केल्याशिवाय राहात नाही. भाषेला जसा अर्थ असतो तसा ध्वनीही असतो. उच्चारलेल्या भाषेमधून तो जसा स्पष्टपणे प्रगट होतो, तसाच मनन केलेल्या भाषेमधूनही तो वाचकाच्या मनात पसरत असतो. आपण जसे भाषेतील विचा-रानी तल्लीन होतो, तसेच तिला असलेल्या नाद–माधुर्यानेदेखील गुगून जातो जसे भाषे-मधून निर्माण होणाऱ्या प्रतिमाचे ठसे मना-वर उमटतात तसेच तिच्या नाद–माधुर्याचे ठसेदेखील आपल्या मनाला कपित करीत असतात; परतु हा प्रवास करीत असता त्या ललितकृतीमधून निर्माण होणाऱ्या लयाचे सारखे आणि पुन्हापुन्हा विभाजन होत असते आणि पुन्हापुन्हा सयोजनदेखील होत असते. लयाच्या या विभाजन–सयोजनाचा प्रवास ललितकृतीच्या शेवटापर्यंत चाललेला असतो. मात्र या विभाजन–संयोजनामधून ती कला-कृती ( ललित–साहित्य ) वाचकाला सतत सौदर्यानुभव देत असते अशा विशाल-ललित-कृतीमधून निरनिराळ्या प्रकारे लय आपले दर्शन घडवीत असतो

म्हणजे ललितकृतीला विषय असतो त्या विषयाचे अधिक प्रभावी दर्शन घडविण्या-साठी तिच्यामध्ये लेखकाने निरनिराळ्या घटना घडवून आणलेल्या असतात. तसेच निरनिराळ्या पात्राची योजना केलेली असते. विषय, प्रसग आणि पात्रे एकाच ललितकृती-मध्ये भिन्नभिन्न असली तरी ललितकृतीच्या निर्मितीमागचा हेतू मात्र एकच असतो. हा हेतू परिणामकारकपणे म्हणजेच सौदर्यपूर्ण करण्यासाठी लेखकाने विषयाची, प्रसगाची आणि पात्राची योजना, त्याना विशिष्ट परि-माणे, विशिष्ट वजने देऊन त्यांची स्थान-निश्चिती पण केलेली असते आणि ही त्याची परिमाणे आणि वजनेदेखील लय निर्माण होण्याला अनुकूल असतात. ही परिमाणे आणि वजने सवाद–विरोध आणि समतोल-लयाची एक साखळीच निर्माण करीत अस-तात.

म्हणजे सवाद–विरोध आणि समतोल या लयाच्या स्वरूपाचे एकच एक दर्शन आणि एकच एक स्वरूप कोणत्याही ललितकृतीमध्ये विशेषत कादंबरीमध्ये असत नाही. परि-माणे, वजने जसजशी बदलत जातात तसतसे लयाचे स्वरूप बदलत जाते

ललितकृतीव्यतिरिक्त इतर कला उदा. चित्र, शिल्प, नृत्य यामधून व्यक्त होणाऱ्या लयाचे दर्शन एकदम आणि समग्रपणे घडते. तसे ते सगीत, कथा, कादबरी आणि नाटक (नाटक ही शुद्ध कला असू शकत नाही) यामधून घडू शकत नाही. सगीत हे ध्वनीच्या माध्यमातून विकसित होते व कथा–कादबरी आणि नाटक हे भाषेच्या माध्यमा-तून व्यक्त होत असते तरी त्यामध्ये मी वर म्हटले त्याप्रमाणे लय असतोच आणि त्याचे स्वरूप आणि कार्यही वर निर्देशिल्याप्रमाणेच असते

या सर्व विवेचनावरून हे लक्षात येईल की, ललितकृतीमध्ये लयाचे तात्काळ आणि समग्र-पणे दर्शन घडण्याची शक्यताही नसते आणि त्याची आवश्यकताही नसते.

लय आणि लयाचे ललितसाहित्यात अस-णारे महत्त्व याविषयीचे मर्ढेकराचे विचार, रिचर्डजचे विचार आणि त्यावर डॉ. ढवळे यानी केलेले विवेचन वाचून लयतत्त्वावरील माझे विचार मी वर व्यक्त केले आहेत

आता ' वाङमयाचा हेतू आणि परिणाम ' याविषयी डॉ. ढवळे निरनिराळ्या मतप्रणा-

लीच्या द्वारे कसा परामर्श घेतात ते पाहण्यासारखे आहे.

सुरुवातीलाच ते असा प्रश्न उपस्थित करतात की, ' साहित्याची निर्मिती अगदी निर्हेतुक असते का ?' साहित्याची निर्मिती निर्हेतुक असते आणि नसतेही, अशा दोन्ही मताचा ते प्रथम परामर्ष घेतात. असा परामर्ष घेताना डॉ. ढवळे दोन्ही प्रकारची मते व्यक्त करणाऱ्या प्रस्थात लेखक आणि टीकाकार याची मते माडतात आणि असे करीत असता ते जसे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य लेखक टीकाकाराची मते विचारात घेतात तसेच सस्कृत पडिताच्या मताचाही ते विचार करतात. शिवाय त्याच अनुषगाने ते साहित्याबरोबरच इतर कलाचाही विचार करतात उदा सगीत, नृत्य, शिल्प आणि चित्रकला. साहित्याविषयी खुद्द त्याचे निर्माते–लेखक–कवी आपले म्हणणे सागत असतात हेही डॉ. ढवळे यानी नमूद केलेले आहे. उदा. तुलसीदास, मिल्टन याची त्याच्या साहित्यनिर्मितीबद्दलची मते जशी ते माडतात, तसेच साहित्याच्या टीकाकाराच्या सदर्भात ते म्हणतात, ' एखाद्या लेखकाच्या हेतूबद्दल टीकाकारांनी केलेली अनुमाने, तर्कनिष्ठ किंवा मानसशास्त्रीय विश्लेषणावर आधारित कशीही असोत, सर्वथैव बरोबर असतील असेही नाही '– आणि पुढे ते असे म्हणतात की, ' मात्र साहित्याचा हेतू (intention) परिणाम (effects) आणि उपयोग (use) याचा नेहमीच मेळ बसेल असे नाही.'

## शुद्ध कलाकृती ?

वाङमयाचा हेतू आणि परिणाम याविषयी विवेचन करताना डॉ. ढवळे म्हणतात, नृत्य, चित्र, शिल्प आणि सगीत याचा श्रोत्यावर होणारा परिणाम अल्पकालीन असतो. तसेच साहित्याचा जनमानसावर होणारा परिणाम दीर्घकालीन किंवा चिरकालीनही असतो. कारण साहित्याचा सर्वात मोठा विशेष म्हणजे भाषेला नेहमीच अर्थ असतो आणि तो अर्थ बव्हशी सामाजिक असतो. वाङमय वाचताना व्यक्तिनिष्ठ अर्थ पुष्कळदा फार महत्त्वाचा असला तरी सामाजिक अर्थ – निदान वाच्यार्थ – पूर्णपणे दुर्लक्षिता येत नाही म्हणून वाङमयाचे उपयोग व परिणाम जास्त सामाजिक ठरतात.

परतु एकदा वाङमयाचे उपयोग व परिणाम जास्त सामाजिक ठरतात असे मानले तर माझ्या मताने वाङमयाच्या हेतूविषयी बरेच गुतागुतीचे प्रश्न निर्माण होतात ! एकदरीनेच 'साहित्याचे तत्त्वज्ञान' या संकल्पनेच्या विचाराचा जेव्हा प्रवास सुरू होतो तेव्हापासूनच गुतागुतीचे प्रश्न निर्माण होण्यास सुरुवात होते.

डॉ. ढवळे म्हणतात त्याप्रमाणे काही कलाना सौदर्यनिर्मिती व त्यापासून निर्भेळ (Disinterestcd) आनद एवढाच व्याप असू शकेल. विशेषत सगीत, नृत्य, शिल्प, चित्रकलाचा उपयोग दुय्यम दर्जाचा ठरतो. खरे प्रयोजन शुद्ध आनद देणे एवढाच असू शकेल; परतु ' शुद्ध आनद ' हा रेखीव कलेपाठीमागचा हेतू असू शकणार नाही का ? आणि तो हेतू देखील श्रोत्याच्या किंवा दर्शकाच्या मनावर परिणाम घडवून आणू शकणार नाही का ? असा हेतू आणि परिणाम सामाजिक, नैतिक किंवा प्रचारात्मक असू शकणार नाही असे जरी म्हणणे असले तरी ते देखील अर्धसत्यच ठरेल अशी शका वाटते. उदा. सगीत ही शुद्ध आनद देणारी कला आहे असे मानले तरी उत्तरभारतातील सगीत (शास्त्रोक्त) आणि दक्षिणभारतातील सगीत विशिष्ट समाजालाच भावते व त्या समाजमनावरच ते परिणाम करू शकते हे उघड सत्य आहे. तसेच चित्र आणि शिल्पकलेबद्दलही म्हणता येईल; परतु असे जरी असले तरी या कलांमध्ये सामाजिक आशय असतो किंवा विशिष्ट नीतीचा प्रचार असतो असे आपण मानीत नाही. येथे कलावताचे मन (त्यालाच आपण व्यक्तित्व म्हणू) आणि त्याची प्रतिभा आणि रसिकाचे मन आणि त्याची ग्रहणशक्ती याच्यामधील हा झगडा असतो असे मानले पाहिजे.

कोणतीही श्रेष्ठ (अभिजात) कला कितीही शुद्ध असली आणि तिच्यामध्ये सामाजिक आशय नसला अथवा नीतिकल्पनाचा प्रचार नसला तरी तिचा (कलेचा) जन्म सामाजिक गर्भातूनच होत असतो असे मानावेच लागते. शेवटी कोणताही कलावत सामाजिक जीवन जगत असतानाच आपल्या व्यक्तिमत्त्वाचे पोषण करीत असतो. जसे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या दडपणाखालीच व्यक्ती आपले जीवन जगत असते तसेच कोणत्याही कलावताची कलाकृती सामाजिक दडपणामधूनच (Preasure) जन्म पावत असते, तरीही ही सर्व दडपणे दूर करून जेव्हा केवळ सौदर्यानुभवाचा उद्रेक कलावतामध्ये होतो तेव्हाच त्याच्या हातून शुद्ध कलाकृती निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते,

या सदर्भात श्री. प्रभाकर पाध्ये याचे विश्लेषण फार सुरेख आहे. आपल्या 'सौदर्यानुभव ' या श्रेष्ठ ग्रथात ते पान २२ वर म्हणतात, ' म्हणजे अनुभवाचा (सौदर्यात्मक अनुभवाचा कंसातील स्पष्टीकरण माझे) आस्वादासाठी आस्वाद घेण्याच्या केवलास्वादवृत्तीने कलाकृतीकडे पाहिल्याशिवाय (किंवा अशी कलाकृती लेखकाकडून निर्माण झाल्याशिवाय) कलात्मक अनुभव सिद्धच होणार नाही असे मला म्हणावयाचे आहे. कलाकृतीकडे आपण व्यावहारिक, वैज्ञानिक अगर तत्त्वज्ञानात्मक दृष्टीने पाहू शकतो, पण तसे पाहिले तर कलात्मक अनुभव येणार नाही.' पाध्यांच्या या उपपत्तीवर चर्चा करताना डॉ ढवळे जरी असे म्हणत असले की, वाङमय–वाचनही केवळ आनदाकरिता असू शकले तरी पुष्कळदा ते तसे नसते व वाङमय वाचताना पुष्कळाची वृत्ती आस्वादकाची न राहता समीक्षकाची बनते असे वाटते; परतु त्यावर मला असे म्हणावयाचे आहे की, समीक्षक हा देखील सपन्न वाङमयवृत्तीचा आस्वादकच असतो थोडक्यात असे म्हणता येईल की, कोणतीही वाङमयकृती अथवा कलाकृतीची निर्मिती केवलास्वाद वृत्तीमधूनच निर्माण झाली पाहिजे, हे एकदा आपण मान्य केले म्हणजे मग सामाजिकता, नैतिकता, प्रचारात्मकता आणि भाषाविषयक सर्व प्रश्न दुय्यम ठरतात. तसे ते ठरावेत असे मला वाटते.

श्रेष्ठ कलाकृतीच्या निर्मितीविषयी, तिच्या मागील हेतू अथवा परिणामाविषयी आणि आस्वाद घेऊ पाहणाऱ्या रसिकाविषयी जगातील श्रेष्ठ विचारवंतानी, समीक्षकानी आणि खुद्द लेखकानी देखील अनेक उलटसुलट विचार आजवर व्यक्त केलेले आहेत. तरीही मला वाटते अजूनपर्यंत हा प्रश्न कोणालाही निर्णायक पद्धतीने सोडविता आलेला नाही. याचे एक उदाहरण म्हणून जाता जाता (पान ९९) वर डॉ. ढवळे यानी कलात्मकतेच्या सदर्भात ( म्हणजेच कलेची विशिष्ट

प्रकारे व्याख्या करण्याच्या प्रयत्नाच्या संदर्भात ) वॉल्टर पेटरच्या प्रख्यात निबंधाच्या ( Essay on Style ) संदर्भातील एक वाक्य उद्धृत केले आहे, ते असे : ' For in truth all art does but Consist in the removal of surplusage खरोखर कला म्हणजे सर्व अनावश्यक तपशील गाळणे. ही व्याख्या किती भोगळ वाटते पाहा. अनावश्यक तपशील गाळण्याने जर एखाद्या कलाकृतीचे निर्दोष आणि नेमके रूप सिद्ध होत असेल तर आपण पोस्टात जाऊन एखाद्याला जी तार करतो, तिच्यामध्येदेखील सर्व अनावश्यक तपशील गाळलेलाच असतो. म्हणून काही आपण तारेला यशस्वी कलाकृतीचा नमुना समजत नाही. यावरून एकच गोष्ट सिद्ध होते. ती म्हणजे कलेचे स्वरूप हे एखाद्या पाऱ्याच्या थेंबासारखे असते. तो थेंब तळहातावर खेळविला तर चांगला खेळतो; पण जर आपण त्याला मुठीत पकडण्याचा प्रयत्न केला तर तो घरंगळून जातो !

असे जरी असले तरी वाङ्मयाचा सर्वांगीण शोध घेण्याच्या प्रक्रियेला या चर्चा उपयुक्तच ठरतात आणि डॉ. ढवळे यांनी आपल्या या मार्मिक ग्रंथामधून अशा रीतीच्या चर्चेला आणि वादविवादाला भरपूर वाव दिलेला आहे. 'भाषा आणि वाङ्मय' या प्रकरणातदेखील त्यांनी आपले सविस्तर विचार अगदी तर्कशुद्ध पद्धतीने मांडले आहेत. भाषा वैयक्तिक केव्हा होते, सार्वजनिक रूप ती केव्हा धारण करते, भाषेतील व्यंग्यार्थाने तिच्या अर्थामध्ये कसा फरक पडतो, ती लेखकाचे मनोगत सांगण्यास केव्हा समर्थ होते ? ध्वनि, वर्ण, भाषा, तसेच ग्रांथिक भाषा, वाङ्मयीन भाषा, बोलीभाषा, पोटभाषा आणि या भाषांचा इतिहास–भूगोल, त्यांचे एकमेकांशी येणारे संबंध, भाषेमधून निर्माण होणारी अर्थनिष्पत्ती या साऱ्यांची त्यांनी अगदी खोलवर जाऊन चर्चा केली आहे. येथे पान १७६ वर त्यांनी शब्दाच्या अर्थाच्या संदर्भात 'वाङ्मया'ची एक छोटीशी व्याख्याही दिलेली आहे. ते म्हणतात, 'जेथें कोशात दिलेले अर्थ अपुरे वाटतात व सामान्य भाषा असामान्य वाटू लागते ते वाङ्मय सामान्यतः साहित्यात वाच्यार्थापेक्षा व्यंग्यार्थावर भर असल्याने ज्याचा सूचकतेवर भर आहे ते वाङ्मय अशी वाङ्मयाची व्याख्यादेखील काही विचारवंत करतात हे त्यांनी सूचित केले आहे.

शब्दाचा अर्थ कितीही स्पष्ट असला तरी वाङ्मयात ते शब्द जेव्हा व्यंग्यार्थाने, प्रतीक रूपाने, रूपकाचे स्वरूप घेऊन किंवा काही प्रतिमांच्या रूपाने येतात तेव्हा त्या शब्दाचा कोशामधील इतकेच नव्हे तर व्यवहारामधील अर्थही बदललेला असतो. मग त्या ललितकृतीत त्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण होऊन बसते. यावरून एक गोष्ट लक्षात येईल की, भाषा आणि शब्द यांचे अर्थ एरवी आपणास जितके सोपे आणि सरळ वाटतात तेवढे ते कोणत्याही ललितकृतीत सरळ असत नाहीत. यावरून एक गोष्ट येथे सुचवावीशी वाटते ती अशी की, एखाद्या शास्त्रीय ग्रंथामधून वापरली गेलेली भाषा एरवी आपल्याला अवघड वाटत असली तरी ती अवघड नसते. तसेच ललितसाहित्यात वापरली गेलेली भाषा एरवी वरवर आपल्याला जी सोपी वाटत असते तशी ती मुळीच नसते. तिच्यामधून अनेक अर्थांचे जणू इंद्रधनुष्यच उमटलेले असते.

## शाश्वत मूल्ये कोणती ?

म्हणून येथे जाता जाता आपल्यामधील काही टीकाकारांच्या मनामध्ये असलेल्या पूर्वग्रहांचेही निरसन करावेसे वाटते. काही टीकाकारांच्या मताप्रमाणे भाषा ही सामाजिक विनिमयाचे साधन असल्यामुळे, ती ललितकृतीचे शुद्ध माध्यम होऊ शकत नाही, असे त्यांचे म्हणणे; पण हे पूर्णांशाने सत्य नाही असे वाटते. तसे पाहिले तर, ललित–साहित्याप्रमाणेच चित्र आणि शिल्प ( ज्या कला ललितकलेपेक्षा अधिक शुद्ध समजल्या जातात ) यांचे माध्यम जे रंग आणि धातू असतात ते तरी किती शुद्ध असतात ? रंग हे माध्यम जरी घेतले तरी लाल रंग, हिरवा रंग, पांढरा रंग, काळा रंग यांनाही अगोदरपासूनच काही अर्थ प्राप्त झालेले आहेत. तसेच निरनिराळ्या धातूंनाही निरनिराळे अर्थ आणि संकेत प्राप्त झालेले दिसतात. त्यामुळे चित्रकलेवर आणि शिल्पाकृतींवर वरील निरनिराळ्या अर्थांचा आणि संकेतांचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाही असे वाटते; परंतु त्यादेखील आपण शुद्ध मानतो. ललितकृतीचेही तसेच आहे. ललितकृतीमध्ये देखील लेखकाच्या प्रतिभेमुळे आणि कल्पकतेमुळे त्याने वापरलेले शब्द त्याला हवे असतील, तेव्हा सरळ अर्थ घेऊन वावरतात आणि त्याच्याच इच्छेप्रमाणे ते हवे तेव्हा प्रतीकरूपाने, व्यंग्यार्थाने, प्रतिमारूपाने त्याच्या कलाकृतीमध्ये वावरतात. असे करीत असताना, ते जसे स्वत चे अर्थ बदलतात, तसेच ते कलावंताच्या हुकमतीखाली अवघ्या ललितकृतीला एक विशिष्ट अर्थ प्राप्त करून देतात. ललितकृतिमध्ये हे शब्द जसे भावात्मक आकृतीबंध निर्माण करतात, तसेच ते संपूर्ण कलाकृतीला सौंदर्यात्मक मूल्य प्राप्त करून देतात.

शेवटी आपल्या ग्रंथामधील उपसंहाराच्या प्रकरणात डॉ ढवळे म्हणतात तेच खरे वाटते. ते म्हणतात, 'प्रत्येक पिढी आपल्यापुरता निरनिराळ्या वाङ्मयीन संकल्पनांचा अर्थ ठरवण्याचा प्रयत्न करणार. मग साहित्याला शाश्वत मूल्य किंवा मूल्ये आहेत ही जी सर्वसाधारण समजूत आहे, त्याला आधार काय ? याचा आधार तर्क किंवा तत्त्वज्ञान नसून, प्रत्यक्ष अनुभव आहे. जरी अनेक वेळा मोठ्या साहित्यिकावर आक्षेप घेऊन, त्याचे मूल्य कमी करण्याचा प्रयत्न झाला तरी त्या वादविवादाचे तात्कालिक महत्त्व विसरल्यावर वाचक त्याचे मूळ साहित्य पुन्हा वाचणारच. ( म्हणजे एका अर्थाने साहित्याचे मूल्य शेवटी रसिक वाचकाच्या आवडी–निवडीवरच सोपवावे लागते : कंसातील वाक्य माझे ) या दृष्टीने एखाद्या प्रसिद्ध लेखकाच्या लोकप्रियतेत चढ–उतार कसे होतात व का होतात याचा विचार केला की, वाङ्मयीन टीका किंवा तत्त्वज्ञान हे शास्त्र या पदवीला जाऊ शकणार नाही हे स्पष्ट होते.'

प्रस्तुत ग्रंथात डॉ ढवळे यांनी साहित्याच्या सर्व प्रक्रियांचा, निरनिराळ्या संकल्पनांचा आणि साहित्याच्या रूपाचा सर्वांगाने वेध घेण्याचा फार अलिप्तपणे आणि तितक्याच सात्त्विक वृत्तीने प्रयत्न केला आहे. साहित्याच्या तात्त्विक विवेचनाचा अत्यंत काटेकोरपणे आणि तेवढ्याच मार्मिकतेने परामर्श घेणारा हा ग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण आहे असे म्हटले पाहिजे. मराठी साहित्यात अशा प्रकारचे ग्रंथ फार थोडे आहेत. त्यात मर्ढेकरांचा 'सौंदर्य आणि

साहित्य', पाटणकराचा 'सौदर्यमीमासा', प्रभाकर पाध्याचा 'सौदर्यानुभव' आणि सुधीर रसाळ यांचा 'कविता आणि प्रतिमा' याचा उल्लेख केल्याशिवाय हा लेख पूर्ण होणार नाही. त्यांमध्ये डॉ. रा. भा. पाटणकर आणि डॉ. वि. ना ढवळे हे इग्रजीचे प्राध्यापक, प्रभाकर पाध्ये हे तर मूळचे पत्रकार. यानी मराठी साहित्याचा एवढा सागोपाग आणि सखोल अभ्यास केला ही अभिमानास्पद गोष्ट तर खरीच डॉ. सुधीर रसाळ हे तर मराठीचे प्राध्यापक त्यानीदेखील पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारवताचा आणि प्रख्यात समीक्षकाच्या विचाराचा मोठ्या जिज्ञासूवृत्तीने आणि मार्मिकपणे अभ्यास करून मराठी समीक्षेत फार मोलाची भर घातलेली आहे. हे त्याचे ऋण मानलेच पाहिजे

□

साहित्याचे तत्त्वज्ञान
लेखक वि. ना. ढवळे
कॉन्टिनेटल प्रकाशन आणि
मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ, पुणे
पृष्ठे . ४०७, मूल्य साठ रुपये

□

# बलसागर : हिंदू राष्ट्रवादावरची डोळस भाष्ये

**शिरीष सहस्रबुद्धे**

'बलसागर' हे श्री श्री. ग. माजगावकर याच पुस्तक प्रकाशित होण आणि त्यावर लिहिलं जाण, याला आताची वेळ आणि पार्श्वभूमी पूर्वी क्वचितच असेल एवढी साजेशी आहे धर्म आणि राष्ट्र या दोन संकल्पनाबद्दल इतकी स्पष्ट आणि समूर्त चर्चा करणाऱ्या एखाद्या पुस्तकाची आता या वेळी खरोखरच आवश्यकता होती. अशी चर्चा पुस्तकाखेरीज इतर जाहीर व्यासपीठावरसुद्धा व्हायला हवी आहे आणि त्याला चालना द्यायच काम हे पुस्तक जरूर करील ज्या हिंदु आणि हिंदी राष्ट्रवादाच्या स्वरूपाची आणि यशापयशाची उत्कट चिकित्सा या पुस्तकात आहे, त्याचा 'रेलेव्हन्स' आज हिंदुस्थानातच नव्हे तर आसपास डोकावून पाहतानासुद्धा किती तीव्रतेन जाणवतो आहे एकीकडे भिवडी–ठाणे–मुबई पट्ट्यात उसळलेल्या भीषण धार्मिक दगलीचे पडसाद वातावरणात अजून रेगाळताहेत. दगलीला शस्त्रपुरवठ्याद्वारा चालना देणाऱ्या तस्करापैकी बहुसख्य मुसलमान असावेत, हा काही निव्वळ योगायोग नव्हे याची जाणीव पुष्कळशा वर्तमानपत्रानीसुद्धा, एरवीचा बाह्य अलिप्तपणा सोडून लोकाना करून दिली, हे या वेळी विशेष घडल आहे. धार्मिक सस्था म्हणून या स्मगलराच्या अड्ड्याची गय करायच राज्य सरकारन थाबवल, तसच खुनी आणि माथेफिरूचं आश्रयस्थान झालेल्या गुरुद्वाराची गय करण केद्रसरकारन सोडलं, या घटनाचा कुठल्याही राष्ट्रवादी हिंदुस्थानी नागरिकाला आनदच होईल त्याचबरोबर काश्मिर आणि आसाम या दोन महत्त्वाच्या राज्यातल्या चिघळलेल्या समस्यावर– ज्या बव्हशी फुटीर आणि घुसखोर मुसलमानामुळे निर्माण झाल्या आहेत त्याच्यावर आपण काहीही ठाम आणि परिणामकारक तोडगा अनेक वर्षांनतरही काढू शकलेलो नाही, याचा सलही सतत नाही तरी मधूनमधून आमच्या अनेकाच्या मनात बोचतो. देशाबाहेर पाहिल तरी समिश्र पण अस्वस्थ चित्र दिसत. समानधर्मीय इराक आणि इराण पथभेद आणि अतिरेकी आचारविचारामुळे एकमेकाचा जीव घेईतो उरावर बसताहेत तर दुसरीकडे, आपल्या भौगोलिक स्थानाच भाडवल करून, जगाला भीक मागतामागता ब्लॅकमेल करणारं पाकिस्तान इस्लामीकरणाच्या अधिकाधिक कट्टर कार्यक्रमाचा पाठपुरावा करीत आहे इस्लाममध्ये व्याजाचा व्यवहार निषिद्ध म्हणून पाकिस्तानी अर्थमत्र्यानी नुकतीच व्याजरहित बॅंकिंग पद्धतीची घोषणा केली. त्याच्या उद्या-परवाच्या कार्यक्रमात शेजारच्या काफिर प्रदेशाच्या मुक्ततेचा समावेश असणं अशक्य नाही, हे शीख अतिरेक्याशी त्यानी केलेल्या युतीवरन सहज स्पष्ट व्हाव. या सगळ्या आत–बाहेरच्या कोलाहलाची प्रतिक्रिया म्हणूनच की काय, हिंदु समाजातही एरवी सुप्त असणारी हिंदुत्वाची जाणीव किंवा भावना हळूहळू प्रखर होताना दिसते. हे जम्मूमधल्या निवडणुकात, हरियानातल्या असतोषात आणि महाराष्ट्रातल्या दगलीत ठळकपणे दिसल.

अशा सगळ्या पार्श्वभूमीवर प्रकाशित झालेल्या 'बलसागर' मधल्या सत्तावीस लेखामध्ये चर्चा आहे ती हिंदु आणि हिंदी राष्ट्रवादाच्या सामर्थ्याची आणि मर्यादाची; हा देश बलसागर व्हायचा तर या राष्ट्रवादाला समतेच्या आधुनिक विचाराची जोड कशी द्यायला हवी, याची निव्वळ पूर्वगौरववादी किंवा प्रतिक्रियात्मक हिंदुराष्ट्रवाद हे राष्ट्रापुढच्या कुठल्याही समस्येवरच अतिम उत्तर होऊ शकत नाही हे वारवार सिद्ध झाल्यानतर त्यावर उपाय करायला हवा असा उपाय दोन प्रकारचा असू शकतो– एकीकडे त्या राष्ट्रवादाचा आशय अधिक समृद्ध आणि भरीव करण आणि दुसरीकडे त्याचा विस्तार, पाया आणखी व्यापक बनवणं या पुस्तकातल्या सगळ्या सत्तावीस लेखातन या आणि यासारख्या तीन–चार सूत्राचा अंत प्रवाह अखड वाहताना दिसतो. विशेष हे की, हे सगळे लेख ऑगस्ट १९६२ ते ऑगस्ट १९८३ अशा एकवीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत लिहिले गेले आहेत आणि साप्ताहिक 'माणूस'मध्येच वेळोवेळी प्रसिद्ध झालेले आहेत. त्यातली आतरिक एकात्मता मात्र भगलेली नाही या काळातल्या महत्त्वाच्या घटनाचे पडसाद तेवढे जरूर तिथे उमटलेले आहेत. त्यात मोरादाबाद, ओगलेवाडी, पुणे, बिहारशरीफ, फुलवारीशरीफ इत्यादी ठिकाणच्या धार्मिक दगली आहेत, मीनाक्षीपुरमच धर्मांतर आणि काश्मिर-

केरळातल्या फुटीर मनोवृत्तीतन उपजलेल्या चळवळीही आहेत. आसाममधली अस्वस्थता, जनतापक्षाध्यक्ष चद्रशेखर याची पदयात्रा आणि राष्ट्रीय स्वयसेवक संघाच महाशिबिर हे विषय ओघात हाताळलेले आहेत. प. नेहरू. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माजी सरसघचालक कै. गोळवलकर याना श्रद्धाजली वाहणारे लेखही आहेत. अशी विषयानाम् अनेकदा असली तरी मूळ विचारसूत्र प्रवाही तशीच प्रभावीही आहेत आणि वाचकाला आपल्याबरोबर फरफटत न नेता सहजपणे घेऊन जाणारी आहेत.

## आधुनिक राष्ट्रवाद !

राष्ट्रवादाच मूळ स्वरूप किंवा मूलस्रोत हे यातल एक सूत्र. फाळणी टाळण्यात आलेल्या अपयशाची मीमासा करताना पहिल्याच लेखात ते माडल गेल आहे. 'राष्ट्रवाद' हे आधुनिक काळातील उपदयोन्मुख भांडवलशाही अर्थव्यवस्थेचं राजकीय तत्त्वज्ञान आहे... औद्योगिक क्रातीतून जन्मास आलेला समाजच राष्ट्रवाद समजू शकतो, पेलू शकतो, त्याच्या यशासाठी झगडू शकतो. कारण त्या समाजाच्या भौतिक विकासाआड जुन्या धार्मिक व जातीय निष्ठा येत असल्याने त्यातून बाहेर पडण्याकडे त्याची स्त्राभाविक अंत प्रवृत्तीच असते ' हा विचार भावनाधिष्ठित पारंपरिक राष्ट्रवाद सागणाऱ्याना हादराच देईल. अशा प्रकारचा राष्ट्रीय समाज' आपल्याकडे निर्माण झालेला नसल्यामुळे फाळणी टाळण्यासाठी आवश्यक ती शक्ती जनतेतून उभी राहू शकली नाही, ही मीमासा पटण्यासारखी तशीच मुळातून वाचण्यासारखीही आहे. ती अधिक सुस्पष्ट आणि व्यावहारिक स्वरूपात पुन्हा येते, 'सावरकरपर्व' या पाचव्या दीर्घ लेखात. जमिनीवरच्या मालकीपासून उगम पावणारा राष्ट्रवाद, त्या राष्ट्रीय समाजाच्या ऐतिहासिक जीवनपरपराशी साधला गेल्यानेच अधिक आशयघन होऊ शकतो हे प्रमेय आणि भारतात या दोन अटी फक्त हिंदूसमाजाच पुऱ्या करू शकत असल्यामुळे तोच या देशातला राष्ट्रीय समाज, इथल्या भूमीचा अधिकारी ठरतो हे त्याच प्रात्याक्षिक इथे माडल जात, ते स्वातंवीर सावकारांच्या विचाराना वाट पुसत. सावरकरविचार ही लेखकाच्या वैचारिक अभिसरणामागची एक महत्त्वाची प्रेरणा आहे, हे जस पुस्तकाच्या मुखपृष्ठावर तसच इथपासूनही स्पष्ट होत जात. हिंदुत्वाचा रास्त अभिमान राखून आणि बहुसख्य हिंदूची उपेक्षा न करता हिंदी राष्ट्र आणि राष्ट्रवाद स्थापन करायला सावरकराची तयारी होतीच, एवढच नव्हे तर हिंदुत्वाची त्याची व्याख्याही व्यापक आणि उदार होती, हे तर लेखकान सागितलं आहेच; पण 'कुठल्याही मत्सरोत्तेजक भेदाभेदाना थारा न देणारा, व्यक्तीचे गुण हीच एकमेव कसोटी मानणारा, राष्ट्रवादाच्या मुळाशी असणारा आधुनिक ऐहिकनिष्ठ हिंदुसमाजच' स्वातंत्र्यकाळात विकसित झालेला नसल्यामुळे सावरकर विचार यशस्वी होऊ शकला नाही हे आपल विश्लेषणही लेखकान प्रभावीपणे माडलं आहे. त्याला जोड दिली आहे ती आणखी एक निदानाची. ते अस की स्वातत्र्योत्तर औद्योगीकरणातून हळूहळू निर्माण होत असलेला आधुनिक मध्यमवर्ग हा सावरकरविचाराचा कृतिशील वाहक होऊ शकेल. इथे मतभेद सभवतात. एक तर १९६६ मध्येच हे भाकित करण्यात लेखकाची फार घाई झाली हे उघड आहे. अशी काही प्रक्रिया होणार असलीच तर ती कमालीची संथ असणार आहे औद्योगीकरणातून उत्क्रात झालेल्या नव्या मध्यमवर्गाच्या पहिल्या पिढीला तरी स्वार्थातून डोकं वर काढायला फारशी फुरसत झालेली नाही अस दिसत आणि ते नैसर्गिकही आहे त्यानतरच्या पिढीन (जी आज काही प्रमाणात हिंदुत्वभावना चेतवताना दिसते. उदाहरणार्थ महाराष्ट्रात शिवसेना, पतितपावनसघटना हिंदूएकता आदोलन यासारख्या चळवळी) सावरकराकडून काही घेनल असेलच तर फक्त प्रतिक्रियात्मक आक्रमकता. प्रसगोपात्त उग्र प्रतिकारिकतेचा अवलब करणारे स्थानिक गट विचारसरणीचे वाहक बनू शकतील हा आशावाद, सगळ्याच विचारसरणीचे डोलारे डळमळत असताना बाळगण्यात कितपत अर्थ आहे ? त्यातून सावरकराची विज्ञाननिष्ठा आणि बुद्धिवाद तर रा. स्व. सघीयासारख्या निष्ठावत हिंदुत्वाभिमान्यानामुद्दा झेपले नाहीत हे उघडच दिसत. सावरकराचा हा वारसा, सामाजिक समतेविना हिंदुत्ववाद अपुरा मानण्याचा पुरोगामी वारसा भारतात रुजेल की नाही याबद्दल लेखकानंही जराशी शका व्यक्त केली आहे आणि ते रास्तही आहे. विचारसरण्या पुस्तकात राहतात, सागणारे निघून जातात आणि मागाहून येणारे त्यातलं जरूर तेवढ, पचेल-झेपेल तेवढं नाही तर सोयीचं तेवढ घेतात. यातून मार्क्स सुटला, ना गाधी, ना सावरकर. सावरकर तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारा एक वर्ग लेखक कल्पितात तसाच मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा वाहक असा एक वर्गही त्याच्या वारसदारानी कल्पिला होता, त्याचं पुढं काय झाल ते जगजाहीर आहे

लेखकाच्यात आणि नव्या पिढ्यात मतभेदाचा आणखी एक मुद्दा उद्भवेल, तो अखड भारत आणि पाकिस्तानच भवितव्य या दोन कल्पनाबाबत. सुरुवातीच्या काही लेखांत पाकिस्तान नष्ट करण्याची आवश्यकता ठामपणे प्रतिपादन केली गेलेली आहे. १९८० नतर लिहिल्या गेलेल्या लेखात मात्र तिचा उल्लेख फारसा जोमानं होत नाही, ही एक त्यातल्या त्यात जमेची बाब. एरवी पाकिस्तानचा जन्म पाहिलेल्याना त्याच्या अताबद्दल स्वनप्रजन करण्याचा मोह अनेकदा होतो. कै. पु. भा. भावे याच्यासारख्या साहित्यिकान त्यापायीच वर्षानुवर्षे निष्फळ आक्रस्ताळेपणाच व्रत घेतल. आमच्या पिढीचे लोक याबद्दल जास्त थड रक्तान विचार करू शकतात. आमच्या जन्माआधीपासूनच अस्तित्वात असलेलं पाकिस्तान आम्ही एक ऐतिहासिक सत्य म्हणून स्वीकारल आहे. इंदिराजीनी वेळप्रसग साधून त्याचे दोन तुकडे केले हे समाधान पुरेसं आहे पाकिस्तान पुरं मोडून यापेक्षा काय अधिक मिळणार हा प्रश्न व्यवहारीपणान सोडवायला गेल तर लक्षात येत की पवित्र सिंधुनदी मिळेल वगैरे ठीक आहे; पण त्याबरोबर आज देशात आहेत तेवढेच किंवा जास्तच सख्येने मुसलमानही मिळतील त्यांच काय करायचं ? आहे तेवढ्या भूभागाचा व लोकसख्येचा कारभार हाकताना दोन्हीकडच्या राज्यकर्त्यांच्या नाकीनऊ येताहेत, तिथे सगळी लोकसख्या एकमेकाच्या उरावर बसवून भारत अखड केला म्हणण्यान काय साधणार आहे ? थोडक्यात जे झाले ते झाले, वाईट झाल हेही खर, पण तरीही आता काळाची चक्र उलटी फिरवणं ना देशाच्या हिताच ना हिंदूच्या, हा व्यव-

हारी विवेक जुन्या हिंदुत्वनिष्ठाच्या गळी जितक्या लवकर उतरेल तितक बर. लेखकाचीही वाटचाल १९६२ तं १९८२ दरम्यानच्या काळात या दिशेने नाईलाजाने का होईना पण झालेली दिसते तरीही १९७८ मधल्या जनता राजवटीमुळे पसरलेल्या आशाळभूतपणाच्या लाटेत वाहवून त्यानी गोडीगुलाबीन आणि मुसलमानाना कुरवाळून–चुचकारून भारत पुन्हा एक होऊ शकेल अस एक स्वप्न रगवले. जनता पक्षाचा आणि सपूर्ण क्रातीचा फुगा फुटल्यानतर असे अनेक बुडबुडेही आपोआप विरले, त्यामुळे त्याबद्दल अधिक काही लिहायची आवश्यकता वाटत नाही.

ज्या एका मुद्द्याबाबत फारसे मतभेद सभवत नाहीत, असा मुद्दा म्हणजे हिंदुराष्ट्रवादाला सामाजिक आणि आर्थिक समतेचं अधिष्ठान देण्याबाबतचा लेखकाचा आग्रह. या लेखसग्रहातला हा एक अखड विचार–प्रवाह आहे आणि लेखकाच्या विचारविश्वामागची ती एक महत्त्वाची आतरिक प्रेरणा आहे. सावरकरानी आग्रहानं आणि कृतिशीलतेनं पुरस्कारलेला समतेचा विचार नंतरच्या कुणा हिंदुत्ववाद्यान तेवढ्या हिरीरीन उचलून धरल्याच उदाहरण नाही. अंदमानमधले आणि लंडन – मार्सेलिसचे सावरकर जरूर स्मरायला हवेत, पण रत्नागिरीच्या सावरकराना न विसरता, त्याच्या हिंदुमहासभेनं समतावाद अनुल्लेखान बाजूला सारला तर, राष्ट्रीय स्वयसेवक सघानसुद्धा बऱ्याच उशीरा म्हणजे श्री. देवरसाच्या कारकीर्दीतच त्या दिशेनं जोमदार पावल टाकायला सुरुवात केली. या पुस्तकात मात्र राष्ट्रवादाच्या पारपरिक पद्धतीच्या विवेचनाला जागोजाग नि अचूकपणे सामाजिक व आर्थिक समतेच्या आग्रहाची जोड दिलेली आहे. 'स्वतत्त्व आणि सुतत्त्व' या लेखात 'स्वभाषा, स्वदेश याविषयीचा प्रखर अभिमान नसला, तर राष्ट्रवाद उभाच राहू शकत नाही; पण विषमतेने, जातिभेदाने पोखरलेल्या समाजाचे स्वत्वही बरेचदा पोकळ व नि.सत्त्व ठरते' असा निर्वाळा देऊन, स्वातत्र्य व समता याचा समन्वय हे आजच्या राष्ट्रवादासमोरचं एक आव्हान असल्याच प्रतिपादन केलेलं आहे. 'मीनाक्षीपुरम्' हा लेखही या दृष्टिकोनातून वाचनीय ठरतो.

'समता – विषमतेची समस्या काही फक्त हिंदुधर्मातच नाही. 'आर्थिक व सामाजिक समता हे एक नवच मूल्य आह व समाजवादी तत्त्वज्ञानामुळे ते विसाव्या शतकात मान्यता पावत आहे. सगळ्याच जुन्या धर्मात कमी–जास्त प्रमाणात, निरनिराळ्या स्वरूपात विषमता असणार हे गृहीत धरायला हवे. केवळ हिंदुधर्माला वेगळे काढून झोडपण्याचे आपल्याकडच्या डाव्याचे प्रयत्न अज्ञानमूलक आहेत,' हा एक स्वागतार्ह विचार मात्र डाव्याना अज्ञानाचा फायदा द्यावा की, मतलबीपणाचा दोष द्यावा, याविषयी मला स्वत ला शका आहे मुसलमान आणि ख्रिश्चन या दोन धर्मांचा इतिहास हिंदुधर्माच्या इतिहासाशी तोलून पाहणाऱ्या कुणाही बुद्धिमान माणसाला हिंदुधर्मच सवाधिक उदारमतवादी आणि समतेसारख्या आधुनिक विचाराला आत्मसात करण्यासाठी पुरेसा लवचिक व स्वागतशील असल्याच सहज आढळून येईल. हिंदुपुनरुज्जीवनवाद आणि इस्लामिक पुनरुज्जीवनवाद याच्यात कट्टरपणा, पूर्वगौरववृत्ती, अधश्रद्धा, स्त्रियांचं स्थान, व्यक्तिप्रतिष्ठा, नागरी स्वातत्र्य अशा निकषावर कुणी तुलना करून पाहिली तरी त्याच्याही लक्षात येईल की, स्थलकाल–स्थित्यनुसारी बदलाची अपरिहार्यता नाकारण्याकडे कल आहे, तो इस्लामचा. मग नेता खोमेनीसारखा जुनाट धर्मगुरू असो की, झियासारखा लष्करी अधिकारी. निव्वळ प्रौढमतदानाधारित लोकशाहीची तात्रिक राबवणूकसुद्धा इस्लामी जगताच्या पचनी पडत नाही, ती उगीच नाही आणि भारतातली लोकशाही धक्के–बुक्के पचवूनसुद्धा अबाधित राहते, तीही राज्यघटना फार थोर करून ठेवली म्हणून नव्हे, तर लोकशाहीचा आत्मा आणि हिंदुत्वाचा गाभा यांच्यात काही तरी जननान्तर सौहृदभाव आहे म्हणूनच !

'बलसागर' बद्दल याच सुरात आणखीही लिहीत राहून, अधिक वाचक गमावण्याचा धोका पत्करण्यापेक्षा एवढच लिहून थाबतो की, वाचकांनी ज्याचा मूळातूनच आस्वाद घ्यावा, अशी जी आणखीही विचारनिधानं या पुस्तकात आहेत, त्यात हिंदुत्वाच्या स्वरूपाचं अनेक ठिकाणी केलेल रसपूर्ण विवेचन ही एक महत्त्वाची जागा. बुद्धी आणि भावना इथं हातात हात घालून चालतात आणि कुणा एकाचाही तोल जात नाही. हिंदुधर्मातल्या कर्मकाडाबद्दल बिलकूल आस्था नसतानाही, हिंदू असल्याबद्दलचा जो दावा आपण करीत आलो आणि ज्याबद्दल कळत–नकळत अभिमान बाळगला, त्याचा भावार्थ आणि त्याची सार्थकता हे पुस्तक वाचताना, माझी मलाच उलगडत गेली, हा माझा मोठाच व्यक्तिगत फायदा ! □

बलसागर
लेखक . श्री. ग माजगावकर
राजहस प्रकाशन पुणे
मूल्य · तीस रुपये

प्र

श्री श्री. ग. माजगावकर यास
स. न. वि. वि.

'आपण आपल्या 'बलसागर' या ग्रंथातील 'खेंवर' या लेखात कै. पु. भा. भावे याच्याविषयी केलेली काही विधाने मनाला पटत नाहीत. आपण लिहिले आहे की 'पाकिस्तान जन्मले आणि भाव्यांमधला साहित्यिक तेव्हापासूनच आपल्याला दिसेनासा झाला. मुक्ती, फुलवा, १७ वे वर्ष यासारख्या कथा त्यानतर त्यानी आपल्याला दिल्या नाहीत.'

'फुलवा' ही कथा 'हस'च्या मे १९५१ च्या अकात प्रसिद्ध झाली आहे. म्हणजे ती ५१ साली मार्च, एप्रिलमध्ये लिहिली आहे. कारण त्यानी लिहिलेल्या कथा लगेच प्रसिद्ध होत

तेव्हा आपले एक विधान चुकले.

पाषाण (४८), ध्यास (४८), प्रतारणा (५१), सावल्या (५१), जोसेफ (५१), पुतळा (५५), दु ख (५५), रूप (५४), पिंपळपान (५४), एका झाडाचा मृत्यू (५४), तपस्वी (५९), वैरी (६२) या सारख्या भाव्याच्या उत्कृष्ट मानल्या गेलेल्या किती तरी कथा फाळणीनतरच्या आहेत. (वरील प्रत्येक कथेपुढे प्रसिद्धीचे वर्ष लिहिले आहे.)

१५ ऑगस्टला (४७) फाळणी झाली आणि त्यानंतर अल्पावधीतच भाव्यानी लिहिलेली 'स्वप्न' ही उत्कृष्ट कथा सत्यकथेच्या दिवाळी (४७) अकात प्रसिद्ध झाली.

महाराष्ट्र टाइम्सने 'चौदा मिनिटे' ही

भाव्याची ६५ सालातील कथा ही त्या वर्षीच्या दिवाळी अंकातील पहिल्या क्रमाकाची कथा ठरविली. 'दिपावली' वार्षिकाने ५५ साली भाव्यानी लिहिलेली 'देव्हारा' त्या वर्षीची दिवाळी अकातील उत्कृष्ट कथा ठरविली.

निर्वासितावरच्या अनेक सुदर कथा भाव्यानी फाळणीनतरच लिहिल्या आहेत.

भाव्यामधील साहित्यिक दिसेनासा झाला. या आपल्या विधानाला हे उत्तर आहे.

खरी गोष्ट अशी आहे की भावे पुढे अन्य लेखनप्रकाराकडे वळले होते.

भाव्यानी १७ कादबऱ्या लिहिल्या. हे सर्व लेखन फाळणीनंतरचे आहे. अकुलीना, वर्षाव, अंतराळसारख्या कादंबऱ्या खूप गाजल्या. 'साहित्यिक दिसेनासा झाला' याचे हे लक्षण आहे काय ?

भाव्यानी ९ पैकी ८ नाटके फाळणीनतर लिहिलेली आहेत.

भाव्याच्या १८ लेखसग्रहातील बहुसख्य लेख फाळणीनतरचे आहेत

आपण म्हणता 'भाव्याच्या कथाकामिनीने जणू जोहारच करून टाकला.' हे खरे नाही भावे शेवटपर्यंत कथा लिहीत होते मधून मधून. अर्थात त्यानी कथेवरच लक्ष केंद्रित केलेले नव्हते. कादंबरी, नाटक, ललित निबंध यात त्याचे लक्ष विखुरले गेले होते

आपण लिहिता 'त्याची नवनवोन्मेष शालिनी प्रतिभापद्मिनी फाळणीच्या आगडोबात जळून गेली.'

ज्याची प्रतिभापद्मिनी जळून गेली, तो 'महाराणी पद्मिनी'सारखे प्रभावी नाटक लिहू शकेल काय ? वर उल्लेखिलेले साहित्य लिहू शकेल काय ? माजगावकर, प्रामाणिकपणे उत्तर द्या.

भाव्याचे निबधसंग्रह वाचा— —निदान चाळून तरी पहा ! हिंदू–मुस्लिम प्रश्नाव्यतिरिक्त त्यानी अन्य कितीतरी विषय समर्थपणे हाताळले आहेत. अनेक सामाजिक विषयावर आणि साहित्यिक विषयावर त्यानी चिंतनपर लेखन केले आहे लवंग, वेलदोडे, पणत्या रांगोळी, अमरवेल, विठ्ठला पाडुरंगा, आनदसोपान यातले लेख पहा तर जरा !

मुद्रा व विलवर या सग्रहातील अनेक व्यक्तीचित्रे अव्वलदर्जाची आहेत. हे काय प्रतिभापद्मिनी नष्ट झाल्याचे लक्षण ?

आपण लिहिता 'भाव्याचे भाषाप्रभुत्व एकदेशी, एककेंद्री झाले-थबकले.' वर उल्लेखलेले निबंधसग्रह, कादबऱ्या, कथा वाचा— म्हणजे तुम्हालाच जाणवेल की आपण असे लिहायला नको होते

भावे कम्युनिस्टविरोधी होते. त्यानी कम्युनिस्टाविरुद्ध खूप लिहिले त्यामुळे त्याना नक्षलवाद्यातल्या एखाद्या वीरावर 'मुक्ती' तल्या नायकावर लिहिले तसे लिहावेसे वाटले नसेल. त्यानी लिहिले नाही, हा काय गुन्हा झाला ?

किती कम्युनिस्टानी, समाजवाद्यानी, काँग्रेसजनांनी सावरकर–हेडगेवार याच्याविषयी उचमळून लिहिले आहे, हे दाखवाल काय ? सावरकर–हेडगेवाराचे सोडा–त्यानी शिवाजीबद्दल तरी लिहिले आहे काय ?

'तिनेवली किंवा बेलछीच्या ज्वाळा त्याना दिसल्या नाहीत,' असे आपण म्हणता.

कोल्हापूरच्या ११–१२ वर्षांच्या चिमण अष्टेकर या सघस्वयसेवकाचा उघडपणे खून केला गेला होता ४५ साली. त्याच्यावर भाव्यानी 'आदेश' मध्ये हृदयस्पर्शी लेख लिहिला होता. त्यावेळी त्या हत्येविषयी सानेगुरुजी, ना. ग. गोरे वा कम्युनिस्टमडळी यानी चकार शब्दही लिहिला नव्हता ! केरळात ३ –४० सघकार्यकर्त्यांचे मुडदे कम्युनिस्टानी पाडले. हिंदुत्ववादी नसलेल्या कुणी याबद्दल लिहिले आहे ?

प्रत्येकाच्या लेखनविषयाना मर्यादा असतात. तुम्ही तरी यच्चयावत विषयावर लिहिता का ? अमुक विषयावर माजगावकरानी का लिहिले नाही, असे विचारण्यात काय अर्थ आहे ? बेलछीबद्दल भाव्यानी लिहिले नाही– तर त्याबद्दल त्याना दोष देण्यात काय अर्थ आहे ?

भाव्यांनी आपली लेखणी हिंदुत्वाला वाहिली होती. ते काम त्यानी अखेरपर्यंत केले ना ? तेथे त्याच्या लेखणीने कुचराई केली नाही ना ?

–तेव्हा हा साहित्यिक घायाळ झाला, हा जटायू वर उठला नाही वगैरे लिहिण्यात काय हशील ?

स्वातंत्र्यानतरच्या युगाचे भाव्याना भान नव्हते, हे म्हणणेही अन्यायाचे आहे सर्व गोष्टी ते उघड्या डोळ्यानी पहात होते –त्यातील जे विषय भावत त्यावर अखेरपर्यंत ते लिहीत होते

भाव्यानी उघड्या डोळ्यानी विचारपूर्वक तरुणपणी हिंदुत्ववाद स्वीकारला. त्याच्याशी ते आजन्म एकनिष्ठ राहिले आपण जाणताच की, अनेक जण चळतात, काही रस्ताही सोडतात, वाहवत जातात, पुन्हा मार्गावर येतात. भाव्याचे तसे झाले नाही !

लता–हमीद विवाहाविषयी 'लताचं लग्न' हा भाव्यानी लिहिलेला लेख त्यांच्या 'विठ्ठला पाडुरंगा' या पुस्तकात छापलेला आहे. कृपया तो वाचावा म्हणजे याविषयाकडे ते किती मूलगामी दृष्टीने पहात होते, हे लक्षात येईल.

उण्या–अधिकाची क्षमा असावी.

२६।८।८४ **वा. य. गाडगीळ**
मुबई

(फाळणीमुळे भावे जेवढे घायाळ झाले तेवढे सामाजिक विषमतेमुळे झाले नाहीत हा माझ्या लिखाणाचा आशय. आपण दिलेला तपशील बरोबरच आहे; पण त्यामुळे हा आशय चूक ठरत नाही

शिवाजी, सावरकर, हेडगेवार याच्यावर किंवा तत्सम विषयावर समाजवादी मडळीनी लिहिले नाही. नसेल. याचा अर्थ हिंदुत्ववाद्यानी आपल्या अनुभवाच्या कक्षा सकुचित ठेवाव्यात, समाजवाद्याचेच अनुकरण करावे असा नाही. शिवाय समाजवाद्यांनी लिहिले नाही किंवा द्वेषमूलक लिहिले तरी या थोर पुरुषाच्या योग्यतेत थोडाच फरक पडणार आहे ? –श्री. ग. मा.) □


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्याचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलाची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# ज्याच्या त्याच्या ठेचा

**शा**ळेत दहावी अकरावीत असताना असेल किंवा कॉलेजच्या पहिल्या दुसऱ्या वर्षाला असताना असेल. नक्की केव्हा ते आठवत नाही, पण त्या वेड्या वयात मला रहस्यकथा वाचायचा छंद जडला होता प्रचंड आकर्षण वाटायच. खरं तर मी मराठी साहित्याची विद्यार्थिनी होते. चागल काही वाचल नव्हतं अस नाही; पण ह्या नव्या प्रकाराबद्दल खूप कुतुहल होत. घरात आई-वडील रागवायचे. काय ती घाणेरडी पुस्तकं वाचत बसतेस म्हणून; पण आमचे एक सर होते ते म्हणाले, तुला वाचावसं वाटतं ना, माझ्याकडे १०० रहस्यकथा आहेत. घेऊन जा ती पुस्तके. मनसोक्त वाच मी अधाशासारखी १५–२०–२५–३० पुस्तकं वाचली. मग उत्साह कमी झाला. पुस्तक सपेना. तेव्हा जी ह्या पुस्तकाबद्दल घृणा निर्माण झाली ती अद्याप आहे. सवग रहस्यकथा म्हणजे काय ते चागल कळलेलं आहे मला.

कॉलेजमधे असताना मी आणि माझी एक मैत्रीण आम्हाला देवानदचे सिनेमे बघायचा विलक्षण नाद होता. मुवईत शिकत होतो. कुठेही देवानदचा मॅटिनी लागलाय कळल की लगेच आम्ही साडेदहाचा कपलसरी इंग्लिशचा तास बुडवून सिनेमाला जायचो. हेही सिनेमे असेच पंधरा-वीस ओळीने पाहिल्यावर 'नक्को आता' अस झाल.

साधारण ह्याच वयात रेडिओवरची चित्रपटगीतं ऐकण हेही एक वेड होत. रात्री सगळे झोपले तरी उशाशी ट्रान्झिस्टर घेऊन झोपायच. अगदी हळू तो लावायचा कित्येकदा तो रात्रभर तसाच रहायचा. झोप लागून जायची. बॅटरी किती लवकर सपते म्हणून भाऊ कुरकुरायचा.

आता या सगळ्याचा विचार करताना वाटत, ते सर आमचे फार शहाणे होते. मुलाच्या वेड्या वयात त्याना अनेक गोष्टी वेड्यासारख्या कराव्याशा वाटतात पालकाना हे वेळ घालवण, पैसा घालवण पसत नसतं. रस्सीखेच सुरू होते. मूल म्हणतं मी करणार. पालक म्हणतात नाही करायच. मूल हट्टाला पेटत पालक पण कबर कसतात बघतोच कस करतोस ते ! सरानी ही नको नाहीची रस्सीखेच थाववली घराघरातली ही रस्सीखेच कशी थाबवता येईल ?

ह्या रस्सीखेचीत आपल्याकडला ताण सोडून देणं ही पालकाना करता येण्याजोगी गोष्ट आहे. फुग्यातली हवाच निघून गेल्यासारखं होतं ना भाडणात ? मला तुझ्याशी भांडण्यात रस नाही. तुला विरोध करण्यात अर्थ नाही. फक्त मला तुला माझ्या अनुभवातून आलेल्या थोड्याशा ज्ञानाचा फायदा करून द्यायचाय मला माहीत आहे की, ह्या गोष्टीनी माणसाला काही फायदा होत नाही असं काही पालकाना मुलाना समजावून सागता येईल

पण प्रश्न इथे सपत नाही. अनेकदा वेड्या वयात वेड्यासारख्या गोष्टी कराव्याशाच वाटतात. मग ठीक आहे एवढं तुला ह्या गोष्टीच आकर्षण आहे तर त्या करून पहा आणि तुझं तू ठरव त्या करत रहायचं की, नाही अस म्हणावं लागत.

असं आकर्षण वाटणारी गोष्ट कटाळा येईपर्यंत केली तर तिच्यातून लवकर सुटका होते अनेकदा. काही वेळा ही पद्धत वापरावी असच मला वाटत.

लहान मुल आणि गोळ्या हा असाच अनेक घरामधला उगाचच वादाचा मुद्दा होऊन बसतो. आमच्या मुलाला आम्ही कधीही गोळ्या चॉकलेट घेऊन दिली नाहीत अस सांगणारे पालक भेटतात. मला त्याच कौतुक वाटत. मला हे कधी जमलं नाही दात किडतील म्हणून गोळ्या नकोत अस अनेकदा म्हणून पाहिलं; पण मुलाना त्याच प्रचड आकर्षण असत. जोडीला जाहिराती असतातच मोह पाडणाऱ्या मुलाना इतक्या जर मनापासून गोळ्या खाव्याशा वाटतात तर त्याला नाही म्हणण म्हणजे ह्या आकर्षणाला नव्या वाटा शोधायला भाग पाडणच आहे मुल मग गुपचूप गोळ्या आणून खातातच मग राजरोस उघडपणे गोळ्या आणून ठेवण काय वाईट ? घरात एकदा मोठी बरणी भरून गोळ्या आणून ठेवल्या चॉकलेटही मुलानी मनसोक्त खाल्ल्या मात्र गोळ्या-चॉकलेट खाल्ल्यावर दात घासून टाकायचे. चूळ भरून टाकायची हे सागितल. एकदाच हे करून भागत नाही पुन्हा पुन्हा अधूनमधून कराव लागत, पण त्यामुळे निदान घाईगडबडीत घरात सापडलेले ५-१० पैसे घेऊन चोरून मारून कुठल्या तरी दुकानातून घाणेरड्या गोळ्या घेऊन खायची तरी वेळ येत नाही

माझा भाऊ कॉलेजमध्ये असताना सिगरेटस् ओढायचा. वडलासमोर मात्र तो कधी ओढायचा नाही. वडील आले की, घाईघाईन सिगरेट विझवायचा, एकदा सहलीला गेले असताना त्याची अस्वस्थता पाहून वडील म्हणाले, 'सिगरेट ओढायचीय् का ? मला पण दे एक !' त्याला फारच सकोच वाटला; पण वडलानी त्याच्याबरोबर सिगरेट ओढता ओढता त्याच्याशी गप्पा मारत सागितल होत की, तेही तरुण वयात सिगरेट ओढायचे; पण आकर्षण टिकलं नाही फार काळ. ज्या गोष्टीचा काही फायदा नाही, तोटाच आहे हे कळत ती विचार करून बाद करता येते तेव्हा तुला ओढून बघायची तर बघ सिगरेट, पण व्यसन लागू देऊ नको विचार कर यावर.

याचा चागला परिणाम झाला होता आणि मुख्य म्हणजे वडलापासून आपल सिगरेट पिणं लपवून ठेवायची जरूर नाही हे कळल्यामुळ भावाच्या मनावरचा ताण गेला होता. मुलाशी असलेल्या मतभेदामधला ताण घालवता आला तर पुढे काही सवाद शक्य असतो. शातपणे विचार करण शक्य होत, नाही तर अनेकदा आईबाबा म्हणतात ना हे करू नको म्हणून मग करणारच अस म्हणून मुल स्वत ला वाईट म्हणून पटलेली गोष्टही सूड म्हणून करत रहातात. अशा वेळी आपल्या हातातली दोरी सोडून देण्यानं फायदा होतो.

वाईट काय ते टाळायला हव असेल तर

चागल काय ते मुलांना माहीत हवं, त्याचा अनुभव हवा, त्याची ओळख हवी, समज हवी. चागल वाचन असल की, सवग पुस्तक तुमच्या मेंदूचा ताबा नाही घेऊ शकत. चागले चित्रपट पाहिलेले असले, त्यात काय बघायच हे कळलेलं असलं की, गल्लाभरू चित्रपटाचं वेड नाही लागू शकत. तात्पुरतं आकर्षण वाटू शकतं.

आपण पालक अनेकदा नुसतेच नाही, नकोचा पाढा म्हणत बसतो. अस आपण का म्हणतो याचा स्वत.शीसुद्धा प्रामाणिकपणे, शुद्ध विचार आपण करू शकत नाही. कित्येकदा अशा गोष्टीबद्दल आपल्याच काही अंधश्रद्धा असतात, बागुलबुवा उभे असतात. त्याना वेगळं करून आपल्या जोमानं वाढणाऱ्या, नवे नवे अनुभव घ्यायला सळसळणार रक्त असलेल्या मुलाच्या दृष्टीनं प्रसगाकडे पहायला आपण शिकायला हव. धोके दाखवणं, तोटे स्पष्ट करण, सल्ला देणं करायला हवंच, एक मित्र म्हणून. मालक म्हणून नव्हे.

आपल्याही जगण्यात आपण नाही का शिकत की, काही गोष्टीचं शिकणं आणि नंतर ते विसरणं (learning and unlearning) हाच योग्य मार्ग असतो शिकण्याचा. जो अनुभव कधी घेतलाच नाही तो केवळ पालक म्हणतात म्हणून वाईट काय म्हणून मानावा? आपण शिकतो, चुकतो आणि त्यातून पुन्हा शिकतो म्हणूनच मोठे होतो ना ? पुढच्यास ठेच मागचा शहाणा हे थोड्या बाबतीत खरं असेल; पण प्रत्येकाच्या ठेचा वेगळ्या असतात आणि ज्याच्या ठेचा त्यानच खाव्या लागतात. आपण कितीही प्रेमळ पालक असलो, हुषार असलो तरी मुलाच्या ठेचा आपण चुकवू शकत नाही. मात्र ठेच खाल्ल्यावर कुणाजवळ जाऊन बसाव, बोलाव, मन मोकळ कराव अस मुलाना वाटल तर त्यानी आपल्याजवळ यावं इतकी आपल्या मनाची दारं आपण उघडी ठेवू शकतो. ठेवायला हवीत.

□

रंगभूमी

### एक आव्हानात्मक नाटक

# डोंगर म्हातारा झाला !

वि. भा. देशपांडे

अनिल बर्वे याची ' डोगर म्हातारा झाला ' ही कादबरी अनेकाच्या स्मरणात असेल; या कादबरीचे नाटयरूपातर अशोक समेळ यानी केले आणि प्रयोगरूपाने रगमचावर पेश केले.

एक ठाकरवस्ती आर्थिकदृष्टया दरिद्री असलेली, सतत छळ, उपेक्षा सोसणारी; पण माणुसकीला पक्की असलेली. या ठाकराचे शोषण करणारा कमराद नावाचा एक प्रतिनिधी, रतुशेठच्या निमित्ताने आहे. या रतुशेठला पर्यायाने या शोषणाला प्रतिकार करणारा कमराद नावाचा एक गाधीवादी स्वातंत्र्यसैनिक आहे. तो प्राणपणाने रतुशेठच्या अनेक स्वार्थी योजनाना सुरुग लावण्यासाठी उभा आहे. अशा अवस्थेत एक सेवानिवृत्त मेजर कामा त्या गावी येतो आणि या नाटकातील संघर्षाला वेगळीच धार यते. अनिल बर्वे याच्या एकूणच लिखाणात जे साम्यवादी विचारसरणीशी जुळणारे तत्त्वज्ञान असते, ते येथे आहेच. लिखाणातील भडक किंवा ढोबळपणही काही प्रमाणात आहे तसेच एखाद्या पात्र–प्रसगामुळे येणारे भाबडेपणही ! पण नाटयरूपातरात अधिकतेने भर आहे तो कामरादच्या मानवतावादी भूमिकेला, मेजर कामा माणूस म्हणून असण्याला, त्याच्या प्रयत्नाला ! समाज–जीवनातील महत्त्वाचे सघर्ष हे सामोपचाराने, विचारविनिमयाने सुटतील की, शस्त्राचा वापर करून सुटतील, याचर नाटकात महत्त्वपूर्ण भर दिलेला आहे शेवटी मेजर कामाने पिस्तूल वापरून रतुशेठची केलेली हत्या आपल्याला मूळ प्रश्नाचे उत्तर देऊन जाते !

अशोक समेळ यानी कादबरीचे नाटयरूपातर करताना मूळ विषयचित्रणाला धक्का न लावता आपल्याला योग्य वाटणारा आशय व्यक्त होणारे लेखन केले आहे. ते योग्य अगाने गेले आहे. मात्र त्याची खरी धावपळ झाली आहे, ती स्थलवैचित्र्यामुळे. कादंबरीकार आपल्या पद्धतीने कथानकातील प्रसंग निरनिराळ्या स्थळी अगदी सहजतेने घडवीत असतो. नाटयमाध्यमात हे स्थलातर मर्यादेपेक्षा अधिकतेने परवडत नाही. स्थलबदलाबरोबर स्वाभाविकपणाने नेपथ्यबदल येतो, तो प्रयोगदृष्टया अडचणीत टाकणारा असतो. यासाठी समेळ आणि दिग्दर्शक रणखांबे यानी अपरिहार्यपणे फिरता रंगमंच स्वीकारला त्यामुळे सोय झाली, तशीच गैरसोयही झाली. प्रवेशबदलाच्या मध्यकाळातले अतर जाणवण्याइतके झाले. सूचक असे स्तरनिविष्ट नेपथ्य स्वीकारले असते तर अधिक सोयीचे आणि परिणामकारक झाले असते !

विषय, आशयदृष्टया अगदी भिन्न असे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आणणे हे एक आव्हान आहे. ज्यामध्ये वेगळ्या विषयवातावरणाबरोबर विनोद नाही, एकही स्त्री पात्र नाही अशी अनेक आव्हाने स्वीकारून रणखाबे, समेळ मंडळीनी हे नाटक पेश केले हे अभिनंदनीय आहे. प्रयोगाचा एकूणच दर्जा चागला आहे यामध्ये डिसोझा झालेले छोटू सावत, रतुशेठ झालेले अशोक समेळ, कमराद –बाळ रणखाबे आणि मेजर कामाच्या भूमिकेतले विजयन नायर आदी कलाकाराचा अभिनय प्रयोगाची गुणवत्ता वाढवणारा होता.

प्रयोगाचे वेगळेपण जाणवत असतानाच, सतत वाटत होते की, व्यावसायिक रंगभूमीवर आल्यावर, आपला अभिनय ताकदीने पोहोचवण्यासाठी काही गोष्टीची गरज असते. तसे घडले नाही तर नाटयाशय पूर्णत्वाने प्रेक्षकापर्यंत जाण्यात अडथळे निर्माण होतात. हे अशासाठी वाटले की, यातले काही कलावत व्यावसायिक नाटकाशी परिचित आहेत. उदा. छोटू सावत, अशोक समेळ; पण बाकी सारे कलावंत हौशी–प्रायोगिक स्तरावरचे होते. त्यामुळे त्याच्यापैकी अनेकाना 'थिएटर प्रोजेक्शन' चे भान नसल्याने, प्रयोगातले चढ–उतार जाणवत होते. ही दुरुस्तीतली गोष्ट आहे अशी वेगळी नाटके लोकापर्यंत पोहोचणे अगत्याचे आहे. ह्या सर्व मडळींनी केलेली मेहनत वाया जाऊ नये म्हणून ही सूचना. ज्याना नेहमीपेक्षा वेगळया प्रकारची

नाटके पाहण्याची इच्छा असते, अशा मंडळींनी हे नाटक जरूर पाहावे.

□

## नटवर्य मास्टर दत्ताराम–स्मृति

मराठी रंगभूमीवरचे एक अभिजात नट दत्ताराम ( वळवईकर ) याचे दिनांक १९ सप्टेंबरला सायंकाळी वसई मुक्कामी निधन झाले. गेली आठ–दहा वर्षे ते निरनिराळ्या शारीरव्याधींनी ग्रस्त होते. तरीही मधूनच असे वाटायचे की, ते थोडे बरे होतील. पुन्हा एखादी भूमिका करतील; पण तसा योग आला नाही दत्तारामबापूवर विशिष्ट प्रकारच्या भूमिकाचा शिक्का नव्हता. त्यानी विविध प्रकारच्या उदंड भूमिका केल्या. त्याची यादी करणे अवघड आहे. ज्यानी त्याचा 'रायगड' मधला शिवाजी पाहिला, 'सवाई माधवराव याचा मृत्यू' मधील माधवराव पाहिला, 'भाऊबदकीतला' रामशास्त्री पाहिला त्याना दत्तारामबापूच्या अभिनयाविषयी वेगळे सागण्याचे कारण नाही. एरवी अतिशय साधासुधा दिसणारा' माणूस रंगमचावर गेल्यावर, वेगळ्याच तेजाने चमकत असे कधी कोणाच्या गटबाजीत ते भाग घेत नसत. कोणत्या वादात पडत नसत त्यामुळे एका अर्थाने ते अजातशत्रूच होते. एखाद्या नटाच्या किती भूमिका पाठ असाव्यात याची आदर्श नावे काढायची झाली तर दत्तारामबापूचा अग्रक्रम लागेल, इतक्या भूमिका त्याना मुखोद्गत होत्या असे जबरदस्त स्मरणवैभव ज्याला लाभले होते, त्या नटाला स्मृतिभ्रशाचा शाप मिळावा हे दुर्दैवच! मध्यंतरी दूरदर्शनवर त्याची जेव्हा मुलाखत पाहिली, तेव्हाच त्याच्या विकलागपणाची कल्पना आली. त्याच्या शारीरविकलतेचे जेवढे वाईट वाटत होते, त्याहीपेक्षा मनात आले की, अनेक माध्यमानी या कलाकाराला ऐन जोशात असताना का नाही टिपून ठेवला? पण हे वाईट वाटणे आता फजूल आहे. दत्तारामबापूनी 'रायगडला जाग' आणली; पण आपण अजून तसेच निद्रिस्त आहोत. केशवराव दाते, नानासाहेब फाटक, शकर घाणेकर, सतीष दुभाषी असे किती तरी गद्यमोहरे सपून गेले! त्याच्या आठवणी आणि छायाचित्राशिवाय आपल्या हाती काही उरले नाही! ध्वनि–चित्रमाध्यमातून जतन झाले, तरी ज्या प्रेक्षकानी दत्तारामबापूना अनेक भूमिकातून पाहिले आहे, त्यांच्या मनात त्याची कलाप्रतिमा दीर्घस्मरणी आहे, तीच मोलाची आहे! हा कलावत आपल्याला खूप खूप आनद देऊन गेला. म्हणूनच आपण त्याच्या स्मृतीला अभिवादन करू या! □

---

### पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा

# चाकोरीबाहेरचे विषय, चांगली हाताळणी

नेहमीच्याच, उत्साहाच्या वातावरणात दि. १७ ऑगस्ट ८४ रोजी पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकाकिकास्पर्धा भरतनाट्यमदिरात झाली.

सालाबादप्रमाणे नेहमीच्याच ईर्षेने, तयारीने निरनिराळ्या महाविद्यालयाचे सघ या स्पर्धेत उतरले होते. वास्तविक ऑगस्ट, सप्टेंबर हे महिने म्हणजे परीक्षाचा काळ विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व महाविद्यालयात मिड–सेम, सेमची तयारी चालू असते, अशा वेळी सर्वच महाविद्यालयातील विद्यार्थी परीक्षेसारख्या क्षुल्लक(?) गोष्टीकडे पाठ फिरवून पुरुषोत्तम करडक स्पर्धेत भाग घेतात. आता पुण्यातील महाविद्यालयाच्या बरोबरीने नाशिक, जळगाव, अहमदनगर वगैरे ठिकाणचे महाविद्यालयीन सघही उतरून पुणेकराची मक्तेदारी मोडण्याचा प्रयत्न करतायत. यदा या स्पर्धेत सर्वात जास्त प्रतिसाद लाभला एकूण २८ महाविद्यालयानी आपल्या ३८ एकाकिका सादर केल्या. पैकी अतिम फेरीसाठी नऊ एकाकिका निवडल्या गेल्या. या नऊ निवडक एकाकिकाबद्दल थोडेसे.

केवळ अतिम फेरीचा विचार करायचा झाला तर एकाकिकेत हाताळलेले विषय हे पूर्णपणे चाकोरीबाहेरचे असेच होते आणि विशेष म्हणजे सगळ्यानीच ते चागल्या तऱ्हेने हाताळले

प्रत्येक एकाकिकेचा स्थायीभाव सघर्ष हाच होता. मग तो कुठल्याही पातळीवर घडणारा असो उदाहरणच द्यायचे झाले तर काळी होती नकटी एक (मॉडर्न) धोटूल (स प ) मी उभा केव्हाचा (नगर)व सघर्ष (बी. एम सी. सी.)

यदा या स्पर्धेत एकदर १२ विद्यार्थी लेखकाच्या एकाकिका होत्या काही अपवाद सोडले तर या सर्वांच्याच नाट्यकृती एकसंध व परिणामकारक करण्याचा प्रयत्न केला होता.

### काळी होती नकटी एक (मॉडर्न)

आपल्या जीवनात येणारे आनदाचे क्षण आपण आपल्यापाशी कायम जपून ठेवतो. आपल्या सुखदु:खात आजूबाजूच्याना पण सामील करून घेतो. असाच एका वेश्येच्या जीवनात आलेला क्षण. हा क्षण फक्त एकदाच येतो, पण त्या क्षणाच्या आधारावर, आशेवर ती वेश्या आपले जीवन जगत असते, त्याची वाट बघत रहाते शेवटी त्या क्षणापाशी घुटमळत असतानाच वास्तवाशी तिला सामोरे जावे लागते.

एक वेश्या आणि तृतीय पथीय असा विषय असलेली ही एकाकिका सादर केली मॉडर्न वाणिज्य आणि कला महाविद्यालयाने, प्रथमत. या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे आभार मानले पाहिजेत कारण त्यानी या विषयावरील नाटक आतरमहाविद्यालयीन स्पर्धेत करण्यास परवानगी दिली. वास्तविक हा विषय असा होता की सवगपणाला भरपूर सधी होती, पण त्यातील सवगपणा पूर्णपणे टाळून त्या विषयाची विचारपूर्वक, काळजीपूर्वक हाताळणी दिग्दर्शक गगनविहारी बोराटे यानी केली. साधना शहा (वेश्या) व गगनविहारी बोराटे (मधुबाला) यानी आपल्या अभिनयाच्या ताकदीवर नाट्य जिवत केले. अर्थात त्याना इतर पात्राचीही तितकीच मदत झाली. योग्य पार्श्वसगीत, अर्थपूर्ण नेपथ्य या सर्वांमुळे या एकाकिकेने आपले वेगळेपण निश्चित केले. या एकाकिकेला स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. गगनविहारी बोराटे याला उत्कृष्ट अभिनयाचे व वाचिक अभिनयाचे पारितोषिक मिळाले. यातील शुभदा शहाला पण अभिनयातील नैपुण्याबद्दल पारितोषिक मिळाले.

### कोलाज्

बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाने राज काझी–लिखित एकाकिका सादर केली. एका अर्थाने ही एकाकिका प्रायोगिक होती.

ही एकांकिका अतुल टेंबे याने दिग्दर्शित केली होती. या एकांकिकेच्या दिग्दर्शनाबद्दल त्याला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक हे पारितोषिक मिळाले. वास्तविक या नाटकात पात्राच्या तोंडी फारसे संवाद नव्हते. त्यामुळे पात्रांना अभिनयाला असा फारसा वावच नव्हता, पण एकंदर नाटकाचे टीमवर्क वाखाणण्याजोगे होते. विविध चित्रपटात असलेले अमिताभचे डायलॉग येथे लेखकाने मोठ्या खुषीने वापरले त्यामुळे ही पद्धत एक नवा अनुभव देऊन गेली बाकी या नाटकाच्या सुरुवातीचे व शेवटचे कोलाज् दृश्य लक्षात रहाण्याजोगे होते. वास्तविक या नाटकाला फारसे कथानक नव्हते. तरीही सर्वांनी केलेल्या प्रयत्नाचे फळ म्हणूनच या नाटकाला स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळाले. अजय वाळिंबे याला 'विजय भोसले' या भूमिकेबद्दल अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## मी उभा केव्हाचा

अहमदनगरच्या 'अहमदनगर महाविद्यालयाने' श्री. संजय भणगे–लिखित 'मी उभा केव्हाचा' हे नाटक सादर केले. आपण आपल्या जीवनात रोज बघणाऱ्या, रोज अनुभवणाऱ्या दलित–उच्चवर्णीय या विषयावर आधारित एकांकिका होती. विषय तसा नवा नसला तरीही दिग्दर्शक संजय आढाव याने तो योग्य तऱ्हेने मांडला.

उच्चवर्णीयांच्यामुळे आजवर पिचत गेलेला दलित युवक व दलितांना मिळणाऱ्या सवलती, सोयी, फायदे यामुळे पिचत पडलेला उच्चवर्णीय युवक या दोघांची दुःखसमस्या मांडणारे नाट्य होते. या दोघांच्या बाजू लेखकाने समर्थपणे मांडल्या आहेत वास्तविक या दोघांची दुःखेही समान पातळीवरच असल्याने दिग्दर्शकाला हा विषय कौशल्यपूर्णपणे हाताळावा लागला स्पर्धेत या एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळाला व नाटकातील संजय आढाव (दलित युवक) याला अभिनयाचे पारितोषिक मिळाले व संजय राऊळ याला (उच्चवर्णीय युवक) उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## घोंटुल

पुण्याच्या सर परशुराम भाऊ कॉलेजने सादर केलेल्या एकांकिकेचे नाव होते 'घोंटूल' या नाटकातील संघर्ष हा जरी पारंपारिक असला तरी विषय पूर्णपणे चाकोरीबाहेरचा होता. 'घोटुल' हा एक आदिवासी जमातीत असलेला विधी आहे. तारुण्यात पदार्पण करणाऱ्या युवकांनी घोटुल पुनवेपासूनच्या पाच रात्री पाच वेगवेगळ्या साथीदारांबरोबर घालवायच्या व आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडायचा. यामध्ये संघर्ष निर्माण होतो तो झोला–लाजू या प्रेमिकांच्यामुळे. आपल्या प्रेयसीला दुसऱ्या कुणीही हात लावू नये ही त्याची इच्छा व इथेच संघर्षाला सुरुवात होते.

परंपरागत विषय असूनही मोठ्या कल्पकतेने लेखक श्रीनिवास जोशी यांनी तो मांडला आहे त्याचे संवाद व गीते ही देखील अर्थपूर्ण होती. या नाटकाच्या लेखनाबद्दल श्रीनिवास जोशी यांना सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखकाचे गो. ग. पारखी पारितोषिक मिळाले. अतुल केसकर यांनी गाण्यांना चांगल्या चाली दिल्या होत्या. या नाटकातील नृत्ये पूर्णिमा गोखले यांनी भरपूर परिश्रम घेऊन बसवल्याचे स्पष्ट जाणवत होते. या नाटकातील लाजूच्या भूमिकेबद्दल मृणाल देव हिला अभिनयाचे उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. विनायक गोगटे (झोला) सुवर्णा आपटे (बया) यांच्या भूमिकापण चांगल्या झाल्या. या नाटकात एकंदर पंचेचाळीस जण होते, पण त्यांच्या हालचालीत सूत्रबद्धता होती. ताळमेळ होता. राहूल सोलापूरकर याचे दिग्दर्शन व प्रकाशयोजना चांगली होती

## संघर्ष

बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाने श्री अविनाश धर्माधिकारी यांनी लिहिलेले 'संघर्ष' सादर केले यातील भूमिकेबद्दल सारंग जोग यांना अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. प्रयोगाच्या वेळी त्यांचा आवाज योग्य तऱ्हेने साथ देत नसल्याचे प्रकर्षाने जाणवले यातील डॉक्टरच्या भूमिकेसाठी अभिराम भडकमकर याची निवड अयोग्य वाटली. अभिनयाच्याबाबतीत ते कमी पडल्याचे जाणवले.

याव्यतिरिक्त अभियांत्रिकी महाविद्यालयाने 'डिस्टंट ड्रम्स' ही एकांकिका सादर केली. या एकांकिकेला स्पर्धेतील उत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेचे पारितोषिक मिळाले.

आतापर्यंत पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या रंगमंचावर सादर केलेल्या एकांकिकेची (प्रायोगिक) खिल्ली उडवणारी एकांकिका घोडूमामा साठे महाविद्यालयाने सादर केली. एकांकिकेचे नाव होते– 'संगीत सामाजिक आशयवाली एकांकिका.' विद्यार्थी–लेखक शंतनु अभ्यंकर विषय मांडताना कमी पडल्याचे वारंवार जाणवत होते. असे विषय हाताळताना लिखाणात जी सहजता व सजीवता असावी लागते ती येथे अभावानेच आढळली. याशिवाय थोड्याफार फरकाने हा एकपात्री प्रयोगच होता.

गरवारे महाविद्यालयाने सादर केलेली एकांकिका 'अर्थवेध' बघताना प्रश्न पडत होता की, यातील गिरीश केमकराचे किती व खुद्द इसापाचे किती? इसापाच्या अनेक चांगल्या कथा उपलब्ध असताना अशा दुर्लक्षित सामान्य कथांचाच आधार का घेतला गेला? हे न कळे.

लोकनाट्याच्या अंगाने जाणारी स्पर्धेतील एकमेव एकांकिका सादर केली शाहू महाविद्यालयाने, सतीश पुळेकर यांनी लिहिलेली 'निरोप' एकांकिका.

ही एकांकिका कोणत्या निकषावर अंतिम फेरीत निवडली गेली असा प्रश्न पडतो.

या स्पर्धेत दुसऱ्या फेरीत निवडल्या न गेलेल्या पण समाधानकारक दर्जा असलेल्या एकांकिका म्हणजे अभियांत्रिकीची (भीक मगे), स. प. ची (चार प्रश्नचिन्हे एक उद्‌गारचिन्ह), अभिनवचे (फ्रॉग्ज) व बी. जे. चे (रैनबसेरा).

या स्पर्धेचा नियम म्हणजे स्पर्धेतील एकांकिका ही त्या महाविद्यालयातील विद्यार्थी दिग्दर्शकानेच दिग्दर्शित केली असली पाहिजे; परंतु जर महाविद्यालयातील प्राध्यापकाने ती दिग्दर्शित केली असेल तर त्याप्रमाणे संयोजकाच्याकडे पूर्वसूचना द्यावी लागते; परंतु गतवर्षीप्रमाणेच कागदावरचे दिग्दर्शक व पडद्यामागचे दिग्दर्शक वेगळे असतात!

या स्पर्धेतील स्पर्धकाच्याकडून एक तक्रार दरवर्षी केली जाते ती म्हणजे भरतनाट्यमधील ध्वनियंत्रणा सदोष आहे. माईक मध्येच बंद होणे, मध्येच चालू होणे हे प्रकार वारंवार घडतात व स्पर्धकाच्या परिश्रमावर पाणी पडते.

–राजेंद्र सखदेव

# नाट्यपंढरी



## ☐ संथा – भूमिकेची

१९५६–५७ सालातली गोष्ट. चिंतामणराव कोल्हटकर 'भावबंधन'चा प्रयोग बसवीत होते. त्यात पु. ल. देशपांडे कामण्णा करणार होते. एक दिवस पु. ल. चिंतामणरावांच्या घरी गेले, तेव्हा चिंतामणराव धुंडिराजाची नक्कल म्हणण्यात गढून गेले होते. गडकऱ्यांचा शब्दन् शब्द बकुळीच्या फुलांसारखा अलगद वेचून उरी साठविणाऱ्या टिपकागदासारखा मनात टिपून ठेवणाऱ्या चिंतामणरावांनी धुंडिराजाच्या भूमिकेत नक्कल म्हणत बसावं हे पाहून पु. ल. ना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, चिंतामणराव, भाषण कशाला पाठ करायला हवं तुम्हाला? तुम्ही गडकऱ्यांची नाटकं उलटीकडून पाठ म्हणता !' त्यावर चिंतामणरावांचे उत्तर, 'मिस्टर, आम्ही धुंडिराज म्हटला नाही कधी !' चिंतामणरावांनी अनेकांना धुंडिराजची संथा दिली होती. पण स्वतः धुंडिराज म्हणून रंगभूमीवर उभे राहिले नव्हते. म्हणून त्या वयातही संथा मुखोद्गत हवी म्हणून ते धुंडिराज म्हणत होते. त्यांना धुंडिराज म्हणून रंगायचे होते.

असे सांगतात, की गणपतराव जोशी तर नटांकडून, महिम्न, पवमान, रुद्र पाठ करून घेत असत. काय बिशाद शब्द अडेल ? शब्द आपलं रूप गुण घेऊनच मुखातून बाहेर पडे. शब्द–शब्द–शब्द !! शब्द हाच अभिनयाचा आत्मा होता. नटाचं सामर्थ्य होतं. शब्दच प्रेक्षकांच्या काळजाला हात घालीत होता. त्याना रडवित होता. हसवित होता.

चिंतामणरावांच्या 'आम्ही धुंडिराज म्हटलं नाही' या उत्तरावर पु. ल. मोठे सुरेख भाष्य करतात, 'रुद्र म्हटला' नाही त्यातल्या ' 'म्हटल्या'चा त्या म्हणण्याला अर्थ होता, प्राचीन ब्राह्मण वेद वाचीत नसत, 'म्हणत,' नाटक हा त्यांच्या दृष्टीने मुख्यतः 'स्पोकनवर्ड' होता. आजही गणपतराव बोडस, केशवराव दाते त्यांच्यासारखी मंडळी हे 'म्हणणे' गेले, म्हणून हळहळतात. त्या काळातल्या परिभाषेत सांगायचे म्हणजे वेदासारखे 'ऑयर'चे वाक्य, त्यातल्या उभ्या-आडव्या आघातांसह म्हणणे त्याला निराळा अर्थ होता. त्या गद्याला स्वर होता. लय होती. ख्यालाप्रमाणे त्याची दमखम होती.'

## ☐ निरवानिरव !

नटश्रेष्ठ केशवराव दाते खूप थकले होते. दम्याने हैराण झाले होते. त्यांचे ते अखेरचेच दिवस होते म्हणाना ! मनात येतील ते विचार मुलांना नि स्नेही मंडळींना सांगवेल तसे सांगत असत. त्यात संसारापेक्षा, नाट्यसंसाराचीच त्यांना अधिक कळकळ. मुंबई मराठी साहित्यसंघाचे नि त्यांचे अगदी जिव्हाळ्याचे संबंध. एक दिवस तात्या अमोणकर नि डॉ. बाळ भालेराव ( कै. डॉ. अ. ना. भालेराव यांचे सुपुत्र ) यांना त्यांनी भेटायला बोलावले. ते नेहमी येतच असत. ते येता क्षणीच, पडल्या पडल्याच केशवराव म्हणाले, 'या उत्तरायणाची वाट पहात भीष्माचार्य शरपंजरी पडले आहेत.' मग संघाबद्दल नि इकडचे तिकडचे थोडेसे बोलणे झाल्यावर केशवराव एकदम बोलायचे थांबले. त्यांना अगदी भरून आले. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ते काही बोलणार होते; पण त्यांना बोलवत नव्हते. डॉ. बाळ नि तात्यांनी एकमेकांकडे पाहिले, तोच दाते म्हणाले, 'बाळ, तुझ्या वडिलांनी नि साहित्यसंघाने माझ्यासाठी खूप काही केले नि करीत आहे, म्हणून तुमच्याकडे मला एक मागणी करायची आहे. माझ्या मृत्यूची बातमी लोकांना कळवायची नाही. तुम्ही जे चार जण जमाल त्यांनी माझ्या देहाचे दहन विद्युतदाहिनीत करायचे. धार्मिक विधी करायचे नाहीत. शोकसभा भरवायच्या नाहीत आणि हे पहा, घरी भिंतीवर लावलेले माझ्या पत्नीचे छायाचित्र माझ्या प्रेताबरोबर दहन करायचे एवढीच माझी अखेरची इच्छा आहे '

या नंतर थोड्याच दिवसांनी केशवराव गेले.




स्नेहप्रभा ही एक श्रेष्ठ अभिनेत्री
आहे.
ही एक मत्रीणही आहे.
या बहुरंगी व्यक्तिमत्वाचा
शोध घण्याचा
एक अ-यशस्वी प्रयत्न

**जिगसॉ**

रामदास भटकळ

**माणूस दिवाळी**

# तीन हृदयस्पर्शी कथा : एक वेधक कादंबरी

जुनी दप्तरं चाळताना दाजीसाहेबांच्या हाताला आबासाहेबांची टाचणं लागली.
ती पहाताच दाजीसाहेबांना आश्चर्याचा धक्काच बसला, मन विषण्ण झालं.
एखादं रहस्य अचानकपणे उलगडावं तशी आबासाहेबांची टाचणं त्यांच्याशी बोलू लागली.

**मृगजळीं केले स्नान**

**रंगा मराठे**

■

निखिलची ओळख . . . मैत्री . . . लग्न आणि लगेच परदेशी प्रयाण. सगळं स्वप्नातल्यासारखंच झालं. पण पहिली दोन वर्ष झाल्यावर नेमकं कुठे बिनसलं गेलं कुणास ठाऊक, पण निखिलबरोबर रहायचं नाही हे ठरलं.
त्याला सोडून भारतात आले तेव्हा तरी तो आणि मी सुटलो का ?

**मुक्त**

**सुधा नरवणे**

■

विन्स्टन चर्चिलनी दिलेली स्फूर्ती घेऊन आपल्या देशापासून दूर–हिंदुस्थानात आलेल्या जिद्दी, कणखर आणि मृदु मनोवृत्तीच्या चोवीस वर्षाच्या तरुणीची प्रेरणादायी सत्यकथा–

**पेगी कॅम्बेल**

**कर्नल जाधव**

□

आईपणा अनुभवण्याची उत्कट इच्छा असलेली, तरीही आईपणाच्या ओझ्याखाली गुदमरून मुलांना थोडं दूर ठेवणारी आणि रूढ आईपणापासून मुक्त होऊ पहाणारी तरीही लांबच्या–जवळच्या प्रेमळ उभ्या–आडव्या नात्यांच्या गुंत्यातून हलकेच सुटू पहाणारी . . .

–एका प्रामाणिक व संवेदनशील स्त्रीचं हळुवार चित्रण करणारी आणि रूढ नात्यांचाही अंतर्मुख होऊन पुन्हा पुन्हा विचार करायला लावणारी वेधक कादंबरी

**निरगाठी**

**गौरी देशपांडे**

# माणूस दिवाळी अंकात

भारताला अंतराळ विज्ञानासारख्या अतिप्रगत शास्त्रात स्वयंपूर्ण बनवणाऱ्या विक्रम साराभाई स्पेस सेंटरच्या आजवरच्या यशस्वितेची गौरवगाथा सांगणारा खास लेख. रंगीत छायाचित्रांसह

**विक्रम साराभाई स्पेस सेंटर. . . . त्रिवेंद्रम**

# आकांक्षांपुढती जिथे गगन ठेंगणे....

**मेधा राजहंस**

**शिवाय तीन विशेष लेख**

☐

सह्याद्रीच्या कुशीत दडलेल्या जंगलातल्या हिरव्या रंगांच्या विविध छटा आणि या जंगलात नवीन प्रयोग करणारी तरुण मने यांचं प्रतिबिंब

# वासोटा

**प्रा. पुरुषोत्तम शेठ**

☐

राष्ट्रवादाचे प्रभावी भाष्यकार डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांच्या राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद, मार्क्सवाद, गांधीवाद, हिंदू समाज इत्यादी विषयांवरील विचारांची ओळख व पारख

# डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे : विचारदर्शन

**प्रा. स. ह. देशपांडे**

☐

अनेक वर्षं परदेशात राहून अखेर स्वेच्छेनं परत आलेल्या भारतीयांचं प्रांजळ मनोगत

# आम्ही परत आलो

**मंगला गोडबोले**

+

**पहाताच हसवणारी विजय पराडकर यांची व्यंगचित्रे**

## चाररंगी आकर्षक मुखपृष्ठाने नटलेला

# माणूस दिवाळी अंक

## किंमत १८ रु.

**ऐन दिवाळीत प्रसिद्ध होणार**